ग्रेस : गूढ इथले संपत नाही... । योद्धा साहित्यिक : अण्णा भाऊ साठे
तळपती तलवार... : नारायण सुर्वे । साहित्यातील अंगार : अमर शेख
सुरेश भट : रंग ह्यांचा वेगळा... । बा. सी. मर्ढेकर : नवकवितेचे जनक
ज्ञानपीठ विजेते : विंदा करंदीकर । साहित्यातील पारिजात : मंगेश पाडगावकर
वि. वा. शिरवाडकर - कुसुमाग्रज : मराठी-भाषा-वैभव । विदुषी : दुर्गा भागवत
नवकथा प्रणेते : गंगाधर गाडगीळ । विजय तेंडुलकर : समाजवास्तवाचे भाष्यकार
एक दुःखार्त झाड : दया पवार । मराठी साहित्यातला अढळ तारा : नामदेव ढसाळ
महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व : पु. ल. देशपांडे

## साहित्य-सरिता...

गेल्या ५०-६० वर्षांतील; विशेषकरून १९४० ते १९८०-९० पर्यंतच्या काळातील निवडक साहित्यिकांचा परिचय करून देणारी ही पुस्तकमालिका.

ह्या साहित्यिकांची ओळख करून देताना त्यावेळचा आपला मराठी समाज, १९४२ ची 'चले जाव' चळवळ, स्वातंत्र्यलढा, १९४७ चे भारताला मिळालेले स्वातंत्र्य, त्यानंतर संयुक्त महाराष्ट्र चळवळ, अशा ऐतिहासिक ठळक घटना आपल्यासमोर ओघाने येतात. तसेच मराठी साहित्यातील नवे प्रवाह; नवकविता, नवकथा, वैचारिक वाङ्मय, विनोदप्रधान साहित्य, वंचितांची अभिव्यक्ती असलेले साहित्य असे विविध प्रवाहदेखील आपल्याला ह्या पुस्तकांतून दिसतात.

परिचयात्मक अशी ही पुस्तके आहेत. त्यांच्या साहित्याची समीक्षा नाही किंवा केवळ त्या साहित्यिकांचे चरित्र नाही. त्यांच्या साहित्याचा हा परिचय आहे. तसेच ह्या लेखकांनी लिहिलेले साहित्यही संक्षिप्तपणे ओळख होण्यासाठी यामध्ये समाविष्ट केले आहे.

***ग्रेस** यांच्या कविता आणि गद्यलेखन कितीही वाचले, कितीही वेळा वाचले तरी संपूर्ण अर्थबोध होतोच असं नाही. एकसंघ अनुभवविश्वातून आपण जातोच असे नाही. ते गूढ उकलतच नाही. पारा हा जसा हातात धरता येत नाही, तसेच त्यांचे साहित्य आपल्या हातात समग्रतेने येत नाही. त्यातील गूढ संपत नाही...*

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

# ग्रेस
# गूढ इथले संपत नाही...

माधव जोशी



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

**साहित्य-सरिता**

**महाराष्ट्रातील प्रमुख निवडक साहित्यिकांचा परिचय**

# ग्रेस

## गूढ इथले संपत नाही...

माधव जोशी

साहित्य-सरिता

महाराष्ट्रातील प्रमुख निवडक साहित्यिकांचा परिचय

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

एन-२७५--१अ

➢ **पुस्तकाचे नाव :** साहित्य-सरिता : महाराष्ट्रातील प्रमुख निवडक साहित्यिकांचा परिचय
ग्रेस गूढ इथले संपत नाही...

➢ **संपादक/लेखक :** माधव जोशी

➢ **प्रथमावृत्ती :** २०२६

➢ **आयएसबीएन :** ९७८-९३-९३५९९-८१-०

➢ **प्रकाशक :**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

➢ © **प्रकाशकाधीन :**

➢ **मुद्रक :**

व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
चर्नी रोड स्टेशनजवळ,
मुंबई ४०० ००४.

➢ **किंमत :** रुपये ७२.००

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# निवेदन

नमस्कार,

प्रमुख पंधरा निवडक साहित्यिकांची ओळख पंधरा पुस्तकांद्वारे करण्यात आली आहे.

या पंधराही साहित्यिकांमुळे; कवी, कथाकार, कादंबरीकारांमुळे, त्यांच्या साहित्यामुळे मराठी साहित्य-सरितेच्या प्रवाहाला वेगळे वळण प्राप्त झाले आहे. ह्या अर्थाने ह्या पंधरा साहित्यिकांची निवड ही प्रातिनिधिक स्वरूपाची आहे तशीच ती महत्त्वाची ठरते.

ह्या पंधरा साहित्यिकांचा साहित्यिक काळ ढोबळ मानाने स्वातंत्र्यपूर्व काळापासून; १९४०च्या आसपास ते १९८५ पर्यंतचा हा ४०-५० वर्षांचा कालखंड आहे. ह्या काळामध्ये मराठी समाजाच्या विश्वात अनेक उलथापालथी झाल्या. आर्थिक, सामाजिक, राजकीय स्थित्यंतरे वेगाने घडत गेली. ह्या सर्व बाह्यपरिस्थितीचे प्रतिबिंब ह्या पंधराही साहित्यिकांच्या साहित्यामध्ये आपल्याला आढळून येते. शाहीर अमर शेख आणि अण्णाभाऊ साठे यांनी त्यावेळच्या वंचित समाजाचे विशेषकरून कामगारवर्गाचे वास्तव व भेदक चित्रण केले. तसेच ह्या कामगारवर्गाच्या, मध्यमवर्गाच्या बदलत्या जाणिवा गंगाधर गाडगीळ व बा. सी. मर्ढेकर यांच्या कृतीतून आपल्याला आढळून येतील. १९६०साली महाराष्ट्र राज्याचा उदय झाला त्याच्या आसपासच्या काळामध्ये मराठी भाषेचा अभिमान बाळगावा याचा जयजयकार कुसुमाग्रजांच्या प्रेरणादायी कृतीतून आढळतो. 'मराठीच्या दुधाची साय' खाणारे सुरेश भट यांनी आपल्या काव्यातून मराठी भाषेचा अभिमान बाळगण्यास वाचकाला उद्युक्त केले. महाराष्ट्राचा वैचारिक वारसा आपल्याला दुर्गाबाईंच्या साहित्यातून आढळतो तसेच मराठी भाषेचे लालित्य व सौंदर्य मंगेश पाडगावकर यांच्या कृतीतून आपल्याला दिसते. कामगारवर्गाचे चित्रण डाव्या विचारांनी व्यक्त होणारे साहित्य

विंदा करंदीकरांच्या काव्यातून आढळते. तसेच पंचावन्न ते साठसत्तर या काळातील गिरणगावातील भयावह चित्रण नारायण सुर्वे करताना आढळतात. मराठी भाषेतून गूढता व्यक्त करताना कवी ग्रेस आपल्या काव्याने वेगळीच उंची गाठतात. याच काळातील शहरी मध्यमवर्गीय माणसाचे, मराठी कुटुंबाचे भेदक चित्रण विजय तेंडुलकर आपल्या विविध नाटकांद्वारे करतात. पु. ल. देशपांडे यांचे साहित्य याच काळात बहरत होते आणि विनोदाची डूब असणारे त्यांचे साहित्य जनमानसावर संमोहिनी करून गेले. याच काळातील वंचितांच्या जाणिवा तीव्रपणे व्यक्त होऊ लागल्या, याचे प्रतिनिधित्व दया पवार आणि नामदेव ढसाळ हे करतात.

या निवडक पंधरा साहित्यिकांनी मराठी साहित्य-सरिता प्रवाहित ठेवत एकूण साहित्यविश्वाला अनमोल अशी देणगी दिली आहे. ह्या निवडक साहित्यिकांच्या साहित्यामुळे मराठी साहित्य विविध अंगांनी बहरले-फुलले. अभिजात अशी साहित्यपरंपरा त्यांच्या साहित्यामुळे अधिक सशक्तपणे प्रवाहित होत राहिली आहे.

ही पंधरा पुस्तके म्हणजे या साहित्यिकांची समीक्षा नव्हे तसेच त्यांचे चरित्रही नाही. त्यांच्या साहित्यातून त्यांची ओळख व्हावी आणि त्यांच्या साहित्याचा अभ्यास करावा, त्यांचे संपूर्ण साहित्य वाचावे ही प्रेरणा मिळावी या उद्देशाने सदर पुस्तके लिहिली गेली आहेत. मराठीच्या अभ्यासकापासून ते मराठी साहित्य वाचून आनंद घेणाऱ्या वाचकापर्यंत सर्वांना ही पुस्तके उपयुक्त ठरतील.

डॉ. सदानंद मोरे<br>
अध्यक्ष<br>
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

ग्रेस यांच्या कवितांना संगीत देणाऱ्या संगीतकारांना...

# मनोगत

'ग्रेस'यांच्या कविता- त्यांची गीते मराठी माणसाच्या ओठांवर आहेत. त्या शब्दांमध्ये अशी काही जादू आहे की, गीतातील शब्द व त्यामागे दडलेला अर्थ जरी रसिकाला आकळला नाही तरी ते गीत त्याला आवडते. शब्दांची ही अद्भुत किमया 'ग्रेस' यांना कशी काय जमली हा प्रश्नच आहे. याबाबतीत त्यांना विचारणा झाली होती. त्यांचे म्हणणे म्हणजे 'जसे माझे जीवन तशी माझी कविता' आणि हे खरेच आहे. त्यांचे संपूर्ण जीवन; त्यांच्या दिनक्रमापासून ते त्यांच्या कारकिर्दीपर्यंत, सर्वत्र त्यांचा मनस्वीपणा दिसून येतो. हाच मनस्वीपणा त्यांच्या कवितेतून दिसतो. त्यामुळे त्यांच्या कवितांना समीक्षाकात्म फूटपट्टी लावता येत नाही तसेच रसग्रहणही सहजी करता येत नाही. भासमान आणि आभासमान सृष्टीत ते आपल्या कवितांतून असे काही विहार करतात की, यातील नेमका भास कोणता आणि आभास कुठला हा प्रश्न वाचकाला-रसिकाला आणि मराठी साहित्याच्या अभ्यासकालाही बुचकळ्यात टाकतो.

दुर्बोध कवी म्हणूनही त्यांची एक ओळख आहे. तथापि ह्या दुर्बोधतेच्या तळाशी दुःखाची, आर्ततेची अशी व्याकूळ करणारी सृष्टी आहे. १९५८ पासून त्यांनी लेखन सुरू केले. 'इन्ग्रिड बर्गमन' या अमेरिकन अभिनेत्रीच्या अभिनयाने ते त्यावेळी प्रभावित झाले होते आणि तिच्या एका चित्रपटात तिच्या तोंडी एक संवाद होता. त्यात 'ग्रेस' असा शब्द होता आणि याच शब्दाचा त्यांच्यावर असा प्रभाव पडला की, त्यांनी स्वतःची ओळख 'ग्रेस' अशीच ठेवली, त्यांचे मूळ नाव माणिक गोडघाटे हे त्यांनी एकप्रकारे पुसून टाकले.

'ग्रेस' या नावामुळे त्यांच्याविषयी गूढता वाढली. त्यांना एक प्रकारे वलय प्राप्त झाले. अशीच गूढता, अनामिक हुरहुर त्यांच्या जवळ-जवळ प्रत्येक कवितेत दिसून येते आणि त्यामुळे कदाचित त्यांच्या कवितेचा अर्थ

प्रत्येकाला वेगळा, प्रत्येक वेळी वेगवेगळा जाणवतो. त्याचबरोबर त्यांना आलेले अनुभव; दुःखाचे वा सुखाचे, रमणीयतेचे किंवा असाह्यतेचे; अशा सगळ्या भावभावनांचे अनुभव व्यक्त करताना त्यांची काव्यशैली निराळेच वळण घेते आणि म्हणून इतर समकालीन कवींपेक्षा ते निराळे, वेगळे दिसून येतात.

अशा या अद्भुत गूढ कवीचा परिचय करून देण्याचा हा प्रयत्न.

ग्रेस यांच्यासारख्या साहित्यिकांची ओळख तीसुद्धा थोडक्यात व्हावी असा प्रस्ताव घेऊन मी साहित्य संस्कृती मंडळाकडे गेलो. त्यांनी ह्या प्रस्तावाचे स्वागत केले. ह्या लेखनकामात प्राची शिंत्रे यांचे मोलाचे साहाय्य झाले. प्रा. नितीन आरेकर आणि प्रा. अभिजित देशपांडे ह्यांनी महत्त्वाचे मार्गदर्शन केले. दिनेश वाडेकर यांनी मुद्रिते तपासली, ऑलरीचचे अतुल जोशी ह्यांनी सुरेख अक्षरजुळणी आणि मुखपृष्ठ व पृष्ठमांडणी केली; या सर्वांचे आभार!

ह्या लेखनात ग्रेस यांच्या प्रकाशित साहित्यामधले काही वेचे, उतारे घेतले आहेत, तसेच त्यांच्यावरील साहित्यातील काही उतारे, उद्‌धृते घेतली आहेत. या सर्व लेखक, प्रकाशकांचे अत्यंत ऋणी आहोत.

साहित्य संस्कृती मंडळाचे तत्कालीन अध्यक्ष श्री. बाबा भांड, सचिव आणि मंडळाचे सदस्य यांचा मी आभारी आहे. हे पुस्तक सिद्ध होण्यासाठी ज्यांनी सर्व प्रकारचे सहकार्य केले त्यांचे मनापासून आभार!

❖❖❖

- संदर्भासाठी आणि लेखकाच्या साहित्याचा परिचय होण्यासाठी घेतलेले उतारे व वाक्ये त्यांच्या मूळ मजकूर बरहुकूम राखण्याचा प्रयत्न केला आहे.

# प्रास्ताविक

गूढ इथले संपत नाही...

ग्रेस यांची सुप्रसिद्ध कविता ‘भय इथले संपत नाही... मज तुझी आठवण येते...’

या धर्तीवर ग्रेस या कवी विषयी म्हणावसं वाटतं गूढ इथले संपत नाही.

‘भय इथले संपत नाही’ या कवितेत कुठलं भय त्यांना वाटत होतं हे संपूर्ण कविता दोन-तीनदा वाचूनही कळत नाही. ह्या कवितेला पं. हृदयनाथ मंगेशकरांनी खरोखरच अप्रतिम चाल लावली आहे. लतादीदींचा सूर आणि हे शब्द जणू काही एकरूप झाले आहेत. ह्या कविता-गीताबद्दल पं. हृदयनाथ एका कार्यक्रमात म्हणाले होते की, कवी ग्रेस एका रुग्णालयात असताना, त्यांनी हृदयनाथांना फोनवर सांगितले की ‘भय इथले संपत नाही...’ त्यावर हृदयनाथांनी त्यांना म्हटले की, ही तर एक कविताच होईल. आणि मग ग्रेस यांनी संपूर्ण कविता लिहिली. आणि नंतर मंगेशकरांनी ती कविता स्वरबद्ध करून ती कविता व ते गीत अजरामर केले.

आता ही कविता जर गीत म्हणून प्रसिद्ध झाली नसती तर जनसामान्यांच्या हातात कदाचित ही कविताच राहिली असती आणि जरी अनेक जणांनी ती वाचली असती तरी त्यातला अर्थ उलगडला गेला असता काय हा प्रश्नच आहे. तथापि कविता सहजच समजली पाहिजे तरच तिला कविता म्हणता येईल किंवा येते असा काही नियम-ठोकताळा नाही. नाहीतर गद्यच लिहिले गेले असते. असे म्हटले जाते की, कविता हा एक स्वयं अनुभव आहे. अनुभूती- ‘Poetry is an event’, ‘सभोवतालच्या घटनांचे आलेले अनुभव यांचे मनावर झालेल्या सखोल परिणामांची अभिव्यक्ती म्हणजे कविता.’ असेही कवितेबद्दल म्हटले गेलेय.

ही सगळी उद्धृते ग्रेस यांच्या कवितांना लागू होतात. त्यांच्या कविता दुर्बोध असतात असे त्यांना कोणी तरी सांगितल्यावर ते म्हणाले होते

की, माझ्या अवतीभोवतीचे वातावरण व भोवताल मला दुर्बोधच वाटतो. (आणि म्हणून त्याची अभिव्यक्ती तशीच दुर्बोध आहे.)

उपजत असलेली प्रचंड-तीव्र बुद्धी आणि अफाट प्रतिभा त्यांना लाभली होती. त्यांनी आपल्या साहित्याची ओळख 'ग्रेस' यांचे साहित्य; स्वतःची ओळख 'ग्रेस' अशीच करून दिली होती. त्यांच्या कवितांवर भारतीय संतकवि, पाश्चात्य साहित्यिक-कवी यांचा प्रभाव आहे. हा प्रभाव ते अमान्य करत नाहीत.

त्यांच्या ललित गद्याबद्दलही आपल्याला असेच म्हणता येईल. त्यांना सगळ्या ललितकलांबद्दलही चांगली समज होती. हे त्यांच्या सर्व गद्य लिखाणातून आपल्याला दिसते. विपुल अशा संदर्भांमुळे ह्या सगळ्या निबंधाचे, ललित लेखनाचे अर्थ लावणे, ते समजून घेणे हे अनेक वेळा कठीण वाटते. त्यातच ते इंग्रजी भाषेत अधूनमधून त्यांचे विचार पेरत जातात. काही वेळा वेगवेगळी उद्धृते देऊन लिखाणाच्या ओघात स्वतःचेच विचार इंग्रजीमध्ये व्यक्त करतात. अर्थात अर्थ उलगडू लागल्यानंतर एकूण त्या ललितगद्याची लय आपल्याला सापडते किंवा लय जर का साधली गेली तर अर्थ उलगडणे सोपे जाते. त्यांच्या ह्या सगळ्या गद्य लिखाणाला कुठलाही विषय वर्ज्य नाही. पर्यावरण, इतिहास, भाव-भावना, विविध ऋतू, निसर्ग असे सगळे काही जे जे भोवताली त्यांना 'दिसते' ते त्यांच्या प्रचंड अशा अनुभव-संपृक्त प्रतिभेतून व्यक्त होते. काही वेळा मराठीतून, क्वचित उर्दूतून तर काही वेळा इंग्रजीतून. कविता-गद्य-कथा असे त्यांचे साहित्य कुठल्याही साहित्यिक प्रवाहाचे प्रतिनिधित्व करत नाही.

त्यांच्या कविता आणि गद्य लेखन त्यांच्या लौकिक जगण्याहून वेगळे नाही. त्यांच्या स्वतःच्याच म्हणण्यानुसार - ''माझे जीवन आणि लेखन या गप्पा नाहीत. माझे जगणे मी लेखनातून मांडतो आणि ते खूप प्रामाणिकपणे लिहितो त्याला गप्पा कशा समजाव्या? जीवन आणि लेखन यात मी समरसून जगणारा एक प्रामाणिक साहित्यिक आहे.''

त्यांची शब्दकळा कवितेतली असो किंवा गद्यलेखनातली ती शब्दरचना त्यांची स्वतःचीच उत्स्फूर्तपणे अभिव्यक्त झालेली असते. 'शब्दाचा हव्यास, मोठमोठे अर्थवाही शब्द सातत्याने वापरणे अशी कुठलीही कृत्रिमता त्यांच्या साहित्यात आढळणार नाही. जे काही कागदावर उतरले आहे ते सहजपणे

उतरले आहे. त्यांच्या सर्व संचिताचे ते ‘व्यक्त करणे’ आहे.


बौद्ध तत्त्वज्ञानाचा-परंपरेचा त्यांच्यावर काहीसा प्रभाव दिसतो. दुःखाची, आर्ततेची आवर्तने त्यांच्या काव्यातून त्यामुळे दिसून येतात. ‘‘भय इथले संपत नाही’’ हे काव्य आणि त्याचे पुढे झालेले गाणे हे जवळजवळ प्रत्येक रसिकाला माहीत आहे. त्या गीताचा मुखडा व पुढील तीन अंतरे आठवून पाहा. या आर्ततेच्या आवर्तनाचा प्रत्यय आपल्याला लगेच येईल.

त्यांच्या काव्याबरोबरच त्यांचे गद्यलेखनही अशाच गूढ पद्धतीने झाले आहे. त्यांच्या या ललित गद्याचे काहींनी विश्लेषण जरी केले असले तरी त्यातील समान धागा म्हणजे आर्तता, गूढभावना, दुःख-वेदना आणि हे सगळे व्यक्त करताना या सर्व अनुभवांकडे बघण्याची एक प्रकारे येणारी अलिप्तता.

ग्रेस यांच्या कविता आणि गद्यलेखन कितीही वाचले, कितीही वेळा वाचले तरी संपूर्ण अर्थबोध होतोच असं नाही. एकसंध अनुभवविश्वातून आपण जातोच असे नाही. ते गूढ उकलतच नाही. पारा हा जसा हातात धरता येत नाही, तसेच त्यांचे साहित्य आपल्या हातात समग्रतेने येत नाही. त्यातील गूढ संपत नाही म्हणून म्हणावेसे वाटते की, ‘गूढ इथले संपत नाही.’

❖❖❖

*कविता लयबद्ध लेखन बनते आणि*
*ललित लेखन अंतर्गत लयीमुळे कविता बनते.*



मराठी साहित्य विश्वात 'ग्रेस' यांचे नाव आदराने घेतले जाते. या कवीला अनेक आयाम आहेत. या कवीवर 'दुर्बोध कवी' म्हणून शिक्का आहे. अतिशय वेगळे लेखन व कविता करणारा हा कवी अनेकांच्या कुतूहलाचा विषय आहे. वाचकांना त्यांच्या वाङ्मयीन व लौकिक चरित्राविषयी माहिती देण्याचा इथे प्रयत्न आहे. त्यांचे लौकिक चरित्र, त्यांची ग्रंथसंपदा, त्यांची लेखन वैशिष्ट्ये, त्यांच्या प्रत्येक पुस्तकांतील अर्पण पत्रिका, त्यांच्याविषयी समीक्षकांची मत-मतांतरे यातील काही निवडक गोष्टींचे संपादन करून त्यांची ओळख आणि वेगळेपण सांगण्याचा हा प्रयत्न.

वास्तव आणि सत्य यांची बेमालूम एकरूपता म्हणजे ग्रेस. भास आभासाच्या पलीकडे जाऊन वेगळ्या प्रकारचे लेखन करणारा लेखक म्हणजे ग्रेस. एक कलंदर वृत्तीचा लेखक, कवी ज्यांनी आत्मपीडन करून घेऊन, शेवटपर्यंत हे आत्मपीडन कोणासाठी आणि कशासाठी हे कधीच कुणालाही कळू दिले नाही. कर्करोगाशी झगडा करताकरता मृत्युच्या अज्ञात प्रदेशात ग्रेस निघून गेले आणि त्यांच्या सोबत ते आत्मपीडनाचे

रहस्यही निघून गेले. उरले फक्त अंतर्मुख करणारे, सतत काही तरी शोध घेणारे, दुःखाचे पापुद्रे असणारे, दुःखाचे पापुद्रे उलगडणारे, वेदना मांडणारे, अनामिक ओढ लावणारे, अज्ञात गोष्टींचा शोध घेणारे, भावना-वेदनांचा वेध घेणारे, अतिशय अंतरस्थ, समाधी अवस्थेप्रत नेणारे, अतिशय वेगळे, वेगळ्या वळणाचे, वेगळ्या शैलीचे, वेगळ्या प्रकारचे लेखन करणारे महत्त्वाचे वेगळे साहित्यिक असे आपल्याला स्पष्ट जाणवते.

संदर्भ संपन्नता, विस्मयचकित करणाऱ्या आणि दुर्बोधतेमुळे दमवणाऱ्या काहीशा गूढ प्रतिमा, प्रतीकांचा वापर, दिङ्मूढ करणाऱ्या, घाटदार आणि डौलदार शब्दकळेसोबत समोरच्या वाचक, रसिकांना संमोहित करणारे, बुचकळ्यात टाकणारे, टीकांच्या परस्परविरोधी वर्तन करणारे अतिशय बहुपेडी असे हे व्यक्तिमत्त्व.

साहित्य हे जीवनानुभवातून निर्माण होत असते.

समाजात सहज न मिसळणारा अतिशय वेगळा, अंतर्यामी अतिशय विशुद्ध जाणीव असणारा संवेदनशील कवी म्हणजे 'ग्रेस'.

## 'ग्रेस' या नावाविषयी...

माणिक सीतारामपंत गोडघाटे असे लौकिक नाव असताना या कवीने, लेखकाने 'ग्रेस' हे नाव लेखन करताना का धारण केले? हा प्रश्न अनेक वाचकांना, अभ्यासकांना पडला होता. 'ग्रेस' हे नाव खूप वेगळ्या प्रकारचे नाव आहे. याविषयी कुतूहल होतेच. या नावाविषयी प्रत्यक्ष ग्रेस यांनी अक्षरकुमार काळे यांना दिलेल्या मुलाखतीत सांगितले की; १९५८ पासून त्यांनी लेखन सुरू केले. त्यावेळी 'इन्ग्रिड बर्गमन' या पाश्चात्त्य अभिनेत्रीच्या अभिनयाने प्रभावित होऊन 'ग्रेस' हे नाव लेखनासाठी टोपण नाव म्हणून स्वीकारले.

'दि इन ऑफ द सिक्थ हॅपिनेस' या बोलपटात 'इन्ग्रिड'च्या तोंडी वाक्य होते, त्या वाक्यातील 'ग्रेस' या शब्दाने मला आत्मसाक्षात्कार झाला आणि तिच्या ऋणात राहण्यासाठी 'ग्रेस' हे नाव धारण केले. या नावानेच त्यांनी त्यांचे संपूर्ण लेखन केले. या नावाबद्दल अनेक दंतकथा साहित्यविश्वात निर्माण झाल्या हे मात्र नक्की.

### ◆ *वास्तव आणि सत्य यांची बेमालूम एकरूपता म्हणजे ग्रेस.* ◆

'ग्रेस' या कवीच्या नावाचा उच्चार जरी केला तरी साहित्यविश्वात हा विरळा कवी आहे हे लक्षात येते. काहीसे अस्वस्थ करणारे, काहीसे हुरहुर लावणारे, गूढ, वलयांकित, अनामिक ओढ निर्माण करणारे, समजणे आणि न समजणे यातला गोंधळ अधिक गडद करणाऱ्या अनेक भावना मनात उसळतात. त्यांच्या नावापासून त्यांच्या लेखनापर्यंत अनेक प्रश्न वाचकांच्या मनात निर्माण होतात.

'दुर्बोध कवी' म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांच्या कविता व ललित लेख सर्वसामान्य वाचकांना समजत नसल्याने 'बोध न होणारी कविता व कवी' म्हणून त्यांची ओळख आहे.

त्यांचा लेखनाचा ओघ लयबद्ध असला तरी त्यातील विचारश्रृंखला अतिशय वेगळ्या पद्धतीची असल्याने ती काही अंशी क्लिष्ट वाटते.

'कठीण भाषेत सांगितले तर ते दुर्बोध आणि सोप्या भाषेत सांगितले तर हे काय नवीन सांगता?' असा लोक प्रश्न करतात. समजणे आणि न समजणे या क्रिया व्यक्तिपरत्वे भिन्न असतात. जीवनानुभव हा प्रत्येकाच्या आयुष्यातला वेगळा टप्पा आहे. प्रत्येकाचा अनुभव वेगळ्या पद्धतीचा असतो. तो वाचकांना किती समजतो किंवा समजत नाही हे व्यक्तिगणिक भिन्न आहे. म्हणून जीवनानुभव लिहिणारा आणि मांडणारा 'दुर्बोध' कसा असू शकतो? राळेगाव येथे केलेल्या भाषणात स्वतः ग्रेसनी आपल्यावरील दुर्बोधतेचा आरोप नाकारताना असे विधान केले की, ''माझी जगण्याची एक तऱ्हा आहे आणि मी आपल्याच तऱ्हेने जगणार आणि मरणार आहे. वेळेपूर्वी मला मरायचे नाही आणि मेल्यावरही जगायचे आहे. मी जे काव्य करतो ते माझे 'स्वगत' आहे समजा. स्वगतामध्ये बेभान होऊन व्यक्त व्हायचे असते. त्यामुळे कोणाचीही पर्वा करायची नसते. मी ज्ञानाचे सोंग करत नाही आणि अज्ञान मिरवत नाही. ज्ञानर्षीचा अवमान करत नाही. मी शब्दकोशांना नवे शब्द देणारा आहे.'' असे त्यांनी प्रतिपादन केले.

''मी माझ्या कवितेचा प्रियकर नाही'' असे त्यांनी अनेकदा म्हटले होते. 'माझ्या कवितेने मराठीला काय दिले आहे व काय देत आहे याचा

> ◆ *कविता लयबद्ध लेखन बनते आणि ललित लेखन अंतर्गत लयीमुळे कविता बनते.* ◆

विचार मला करण्याचे काहीच कारण नाही' असे ग्रेस यांनी 'दुर्बोधतेची बेसरबिंदी' या ललित लेखात म्हटलेले आहे. याच लेखात त्यांनी ''आपण दुर्बोधतेच्या आरोपाचे निराकरण करीत नाही असेही म्हटलेले आहे. श्रीनिवास हवालदार (निवृत्त अधिकारी, भारतीय प्रशासकीय सेवा, इंदूर, मध्यप्रदेश) यांनी कविवर्य ग्रेस यांच्या प्रातिनिधिक कवितांचे विश्लेषण करून त्या कवितांचे रसग्रहण करून कवी ग्रेस यांच्यावरील 'दुर्बोध' आणि आत्मकेंद्रित' असल्याचा समज दूर करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

हृदयनाथ मंगेशकर यांच्याबरोबरच्या कार्यक्रमात ग्रेस यांनी म्हटले आहे की, ''माझ्या भोवतीचं वास्तवच दुर्बोध आहे. त्याला मी तरी काय करू.''

१९८६ मध्ये डॉ. जयंत परांजपे यांनीही 'ग्रेस आणि दुर्बोधता' या समीक्षात्मक ग्रंथातून त्यांच्यावरील आरोपावर प्रकाश टाकला आहे. खरे तर हा आरोप, आरोप नसून एक मतप्रवाह आहे. ग्रेस यांची कविता दुर्बोध व आत्मकेंद्रित नसून ती वेगळ्या धाटणीची नेणिवेच्या पातळीवरची, नव्या शब्दांची, नव्या प्रतिमांची, नव्या कल्पनांची, वेगळ्या विचारांची वेगळी कविता आहे. ती सहज सरधोपट नसली तरी प्रवाहाच्या विरुद्ध पोहणारी कविता आहे.

## ग्रेस समजून घेताना...

ग्रेस समजून घेताना वाचक म्हणून आपला अनुभव वेगळा असतो. त्यांची कविता आणि ललित निबंध वेगळे काढणे शक्य होत नाही. कविता लयबद्ध लेखन बनते आणि ललित लेखन अंतर्गत लयीमुळे कविता बनते. साहित्यातील संदर्भ संपन्नता वेगळी व परिणामकारक असल्याने संदर्भ शोधून परिणामाचा खोलवर विचार करावा लागतो. ग्रेस यांचे लेखन वाचून झाल्यावर चिंतन ओघाने केलेच जाते. वाचनानुभवापेक्षा चिंतनानुभव विलक्षण असतो.

त्यांच्या लेखनात ज्ञानेश्वरांचे चिंतन, एकनाथांचा व्यासंग, जनाईचे

*◆ समाजात सहज न मिसळणारा अतिशय वेगळा, अंतर्यामी अतिशय विशुद्ध जाणीव असणारा संवेदनशील कवी म्हणजे 'ग्रेस' ◆*

प्रेम, नामदेवाची अभिव्यक्ती, तुकाराम, रामदासांचे वेगळेपण येते आणि याचबरोबर स्टिफन स्वाइंग, रिल्के, एमिली, बॉन्टे यांसारखे पाश्चात्त्य साहित्यिक सहज येतात. शरच्चंद्र मुक्तिबोध, रवींद्रनाथ टागोर, मर्ढेकर, कुसुमाग्रज, मीरा, कबीर असे भारतीय भक्ती परंपरेतली, साहित्य परंपरेतली अनेक मंडळी त्यांच्या गुणवैशिष्ट्यांसह ग्रेस यांच्या लेखनात सहजपणे येतात. उर्दू शायरी, शायर फैज, महानाटककार शेक्सपियर, महाकवी होमर, वर्डस्वर्थ, शेलेसारखे पाश्चात्त्य साहित्यिक त्यांच्या साहित्यिक गुणांसकट ग्रेसांच्या लेखनात सहजपणे येतात. एड्गर देगाससारखा चित्रकार, सीता, द्रौपदी, मीरा, मिथिलासारख्या पौराणिक स्त्रियांचा सहज प्रवेश लेखनात होताना दिसतो. प्रचंड विद्वत्ता आणि प्रतिभा यामुळे सगळ्याच ललितकलांबाबत त्यांची समज दांडगी होती. त्यांच्या लेखन अभिव्यक्तीसाठी मराठी, उर्दू, इंग्लिश जी भाषा त्या क्षणी हाती लागेल त्यात आपले म्हणणे व्यक्त होणे याची मांडणी झालेली दिसते.

ग्रेस यांच्या लेखनाला पर्यावरण, इतिहास, भूगोल, पौराणिक कथा, आंतरराष्ट्रीय इतिहास, पाश्चात्त्य साहित्य कला, कलाकार, समीक्षा, प्राणी, पक्षी, रंग, ऋतू, भावना, विज्ञान, तत्त्वज्ञान कुठल्याही विषयाचे वावडे नसल्याने कुठलाही संदर्भ घेऊन चिंतनाच्या पातळीवर आत्म्यातून थेट संवादपूर्ण ललित लेखन व कविता स्फुरलेली दिसते. त्यांच्या लेखनात कोणताही विषय त्याज्य नाही.

'नास्तिकाश्चित अविषयोनाम' - कोणताही विषय वर्ज्य नाही.

शब्दमाध्यमाचा उपयोग करून साहित्य निर्माण होते. त्यांच्या लेखनात अनेक अनुभव सहजपणे येतात. हे अनुभव आदिम असतात. तात्कालिकाच्या पलीकडे जाऊन चिरंतनाला जवळ करतात म्हणूनच त्यांचे कविता लेखन, ललित लेखन कोणत्याही साहित्य प्रवाहाचे प्रतिनिधित्व करत नाही. त्यांची कविता, ललित लेखन पूर्णपणे स्वतंत्र

असून भाषेच्या साहित्याच्या कुठल्याही मर्यादांचे पालन न करता थेट अंतःकरणाचा अचूक वेध घेतात. त्यांच्या कविता आणि लेखन त्यांच्या लौकिक आयुष्यापेक्षा भिन्न नाही. त्यांच्या जगण्याचाच एक भाग आहे. त्यांचे जीवन व लेखन समरसतेचा उत्तम नमुना आहे. मुंबईमध्ये पार्ले येथे आयोजित होणाऱ्या 'मॅजेस्टिक गप्पा' या कार्यक्रमात त्यांनी थेट सवाल केला, ''माझे जीवन आणि लेखन या गप्पा नाही. माझे जगणे मी लेखनातून मांडतो आणि त्या खूप प्रामाणिकपणे लिहितो त्याला गप्पा कशा समजणार? जीवन आणि लेखन यात मी समरसून जगणारा एक प्रामाणिक साहित्यिक आहे.''

ग्रेस आपल्या कवितेला 'सखी' म्हणत. ग्रेस यांची कविता ही अनुभूती असते. रोजच्या जगण्यापेक्षा वेगळी. अस्फुट, अव्यक्त, अबोध अशा आंतरमर्मांना, भावनांना, जाणिवांना अतिशय तलम, तरलपणे व्यक्त होणारी भावपूर्ण कविता वाचकाच्या प्रत्ययाला येते.

ग्रेस यांच्या साहित्य लेखनात एक्स्प्रेशनपेक्षा क्रिएशनला महत्त्व दिलेले दिसते. म्हणूनच प्रत्येक नवीन गोष्टीला अनेक कंगोरे असतात. या कंगोऱ्यांना एक प्रकारचा कैफ असतो. जेवढे वाचू तेवढे नवे नवे भाव मनात येतात. प्रत्येक वाचनात तीच कविता किंवा लेख प्रत्येक वेळी वेगवेगळी अनुभूती देतो.

ग्रेस शब्द-चित्रकार, सृजनात्मा म्हणून अधिक जवळचे वाटतात. त्यांची कविता, लेख कधी चित्रासारखे, कधी अनुभवांसारखे, कधी अनाकलनीय असतात. कधी कधी हे लेखन स्वान्तसुखाय, स्वानुभवसंपन्न कधी Suprealistic (अतिवास्तववादी) चित्रासारखे दिसते.

मंत्रमुग्ध करणारे लेखन हाही त्यांचा एक विशेष दिसतो. सूफी पंथातील गायक जसे दुःखाचे आवर्तन करतकरत जगणे गाण्यातून मांडतात, ही मांडणी करताना त्यातील फेऱ्यांत आवर्तनांतच राहणे हे जसे मंत्रमुग्ध करणारे असते; तसेच ग्रेस यांच्या लेखनात दुःखाचे, वेदनेचे आवर्तन दिसते. असे असले तरी दुःखाबद्दल कोठेही खंत किंवा किल्मिष लेखनात दिसत नाही.

*मी महाकवी दुःखाचा*
*प्राचीन दरीपरी खोल*

◆ ***ग्रेस यांची कविता दुर्बोध व आत्मकेंद्रित नसून ती वेगळ्या धाटणीची नेणिवेच्या पातळीवरची, नव्या शब्दांची, नव्या प्रतिमांची, नव्या कल्पनांची, वेगळ्या विचारांची वेगळी कविता आहे.*** ◆

*दगडाचे माझ्या हाती*
*वेगाने होते फूल.*

समग्र ग्रेस समजले, त्यांची कविता/किंवा लेख एकसंध समजला असे कधीच होत नाही. अनेक वाचकांना अनेक तुकड्या-तुकड्यांत, वेगवेगळ्या वेळी, वेगवेगळ्या संदर्भासह समजतात. वाचकांना एकसंध, एकजिनसी जाणीव कधीच होताना दिसत नाही. एक आत्ममग्न, मनस्वी, जिवंतपणीच दंतकथा बनलेला वैरागी, मौला असे त्यांचे लौकिक विशेष त्यांच्या लेखनातही जाणवतात.

ग्रेस यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे अनुभवविश्व वेगळ्या पद्धतीने मांडण्याची लेखन शैली. या लेखनात अनेक दृक् प्रतिमांचा बराच उपयोग होतो. अनेक रंगांची पखरण होते. त्यातील दृश्ये डोळ्यांसमोर नाचू लागतात, जाणवू लागतात आणि वाचक या अनुभवविश्वात पूर्णपणे गुंतून राहतो. उदा.

*थेंब उणे ऊन, गंधगार रात्र*
*सांजनिळाई, ओळख हरवून बसलेली*

काव्य आणि आस्वाद यात कलाकृती आणि वाचक श्रोता यांचे नाते महत्त्वाचे असते. कलाकृतीचे वाचन अनेक वाचक करतात. त्या वाचकांच्या आकलन क्षमतेनुसार त्यांना प्रतिबिंब वेगळे दिसत असते. एकच वाचक किंवा श्रोता निरनिराळ्या क्षणी निरनिराळ्या भूमिकेतून कलाकृतीकडे पाहतो. प्रत्येक वेळी कवितेच्या ओळींचा आशयार्थ, अन्वयार्थ आणि भावार्थ वेगळा लागतो. त्यांच्या कवितेत प्रत्येक वाचन वेगळा अनुभव देते.

त्यांच्या कवितेतील रंग आपल्याला मनःपटलावर दिसतात. श्राव्य प्रतिमा मनात ऐकू येते. चित्रे आपल्याला दिसतात. अनेक व्यक्तींचे संदर्भ जाणवतात. या लेखनातील नावीन्यपूर्ण शब्दांचा अर्थ आपल्याला

शब्दकोशात सापडत नाही. हेच ग्रेस यांचे वेगळेपण आहे. त्यांची कविता वाचाविशी वाटते आणि खोल मौनात शिरून चिंतन करावेसे वाटते.

अनुभव, संवेदना, अतिशय स्वच्छ मांडल्याने त्यांच्या कविता आणि लेखनात खूपदा 'कन्फेशन' दिसते. आत्म्यातून, मनातून, बुद्धीतून निघणाऱ्या भावना, संवेदना, विचार थेट त्यांच्या लेखनात दिसतात.

ग्रेस यांची कविता ही एकटाकी असून ती अचूकपणे दृग्गोचर रूपात जन्माला येते. त्यांच्या कवितेतील शब्द अर्थगर्भ आणि सौष्ठवपूर्ण असतात. त्यांच्या कवितेत अनाकलनीयता असली तरी सहज अशी लय आहे. उदा.

*भय इथले संपत नाही*
*मज तुझी आठवण येते*
*मी संध्याकाळी गातो*
*तू मला शिकविली गीते.*

या कवितेत यमक, अनुप्रास नसला तरी आंतरिक लयीमुळे या कवितारूपी गीताला श्रोत्यांनी सहज स्वीकारले.

'पहाट' या कवितेतील रंगच्छटा लेखनात वेगळेपणा आणतात आणि कवितेतील काळाचा प्रहर अधिक गहिरा करतात.

*आज केशरी थेंबांनी*
*जाग आणिली कोवळी*
*हाका-हाकांच्या लेण्यात*
*सूर घुमले पोवळी*
*निळ्या ओलाव्याच्या काठी*
*आज नारिंगाचें बन*
*आली तरंग...तरंग*
*स्निग्ध मेघांची पोकळी.*

ग्रेस यांच्या कवितेत, लेखनात अतिशय तरलता आहे. त्यांच्या कवितेत, ललितलेखनांत इंग्रजी शब्द, हिंदी शब्द, उर्दू शब्द इंग्रजी अवतरणे, इंग्रजी कविता, शायरी, शेर सहजपणे येतात. यात कृत्रिमपणा नसतो. सहजतेतून प्रवाहीपणा दिसून येतो. Death do not be proud असे 'डन' या इंग्लिश कवीसारखे म्हणत ग्रेस लेखन करीत राहिले. कुठलीही तडजोड केलेली नाही. त्यांची कविता ही फक्त कविता राहत

◆ *तात्कालिकाच्या पलीकडे जाऊन चिरंतनाला जवळ करतात म्हणूनच त्यांचे कविता लेखन, ललित लेखन कोणत्याही साहित्य प्रवाहाचे प्रतिनिधित्व करत नाही.* ◆

नाही. त्यांचे ललित लेखन हे ललित लेखन राहत नाही तर अनुभवाच्या पातळीवर, विदग्ध विचारांच्या पातळीवर, नव्या कल्पना, नवे विचार नव्या शैलीतून सहजपणे येतात आणि मनात रेंगाळतात.

'कळणे', 'समजणे', अनुभवणे या तीन स्वतंत्र गोष्टी असून त्या एकत्रितपणे ग्रेस यांच्या लेखनात सहजपणे येतात. म्हणूनच त्यांचे समग्र लेखन विदग्ध झालेले दिसते. सर्वसामान्य वाचकांपेक्षा विशेष वर्गातील वाचक त्यांना मिळाला. रूप, गंध, रंग, नाद, स्पर्श इ. प्रतिमांचा प्रत्ययकारी वापर पंचेंद्रियांचा ताबा घेतो. उदा.

*वाऱ्याने हलते रान*
*तुझे सुनसान...*
*हृदय गहिवरले*
*गायीचे डोळे,*
*करुण उभे की,*
*सांज निळाईतले.*

'वाऱ्याने हलते रान' या निबंधाच्या (ललित निबंधाच्या) पुस्तकातील शीर्षके जरी वाचली तरी त्यातील नावीन्य आपल्याला दिसते.

ग्रेस यांच्या ''वाऱ्याने हलते रान' या पुस्तकातील (ललित निबंध पुस्तक) प्रेमातील भातुकलीचे लटिकेपण जरी, तेचि सत्याचे कैवारी या लेखनाची सुरुवात आपल्याला या नावीन्याची जाणीव करून देते.

*... सुखदुःखाने भयाण*
*रात्र झाली जरी वैरी*
*बाई सांभाळिते त्याला,*
*देह देहाचा कैवारी...*

''रात्रीच्या उत्तरार्धातील पाऊस थेंबाच्या उत्कर्षाची अविश्रांत उतरणी-चढणी, बदामाच्या हिरव्याकंच उभारीने झेलणाऱ्या झाडाच्या साक्षीने मी

हवालदिल होऊन, माझ्या पडवीतून तपासून पाहत होतो.''

वरील उदाहरणात प्रतिमा, प्रतीके, विशेषण यात नावीन्य जाणवते. अनुभूतीच्या पातळीवर अनेक संवेदना प्रत्ययाला येतात.

ग्रेस यांचे लेखन mass पेक्षा class साठी लिहिलेले दिसते. चिंतनातून आलेले अनुभवविश्व असे याचे स्वरूप वाचकांना जाणिवेकडून नेणिवेच्या पातळीवर नेताना दिसते.

आयुष्यभर मराठी भाषा व मराठी लेखनावर प्रेम करणारा आणि आपल्या अंतर्यामी ऊर्मीने लिहीत राहणारा कवी. पण साहित्याच्या विश्वात त्यांना हवे तसे यश मिळू शकले नाही. 'I shall born after my death' असे ग्रेस स्वतःविषयी नेहमी बोलायचे आणि ते काही अंशी खरेही ठरले. त्यांच्या निधनानंतरच त्यांच्या लेखनाचा, वेगळेपणाचा ऊहापोह झालेला दिसतो. त्यांचे जगणे, वागणे, बोलणे, त्यांचे दोष, त्यांच्याविषयी असलेले प्रवाद, गुणावगुण यांच्यावर अनेक विचारवंतांची, समीक्षकांची, वाचकांची वेगवेगळी मत-मतांतरे असतील पण त्यांच्या साहित्याचे आगळेपण मात्र बहुमान्य झालेले दिसते.

वाचकांना काय आवडते यापेक्षा मला काय सांगायचे हे महत्त्वाचे वाटणारा हा कवी-लेखक होता,

''I can become small for you but not simple.''

ते नेहमी म्हणायचे, 'मी लहान होईन पण सोपा नाही. कारण सोपं काहीच नसतं जगात.' सृष्टीचा आकार केवढा? ज्याच्या त्याच्या डोक्याएवढा. आपल्याला साहित्य किती समजते? आपल्याला जेवढे आकलन होते तेवढेच साहित्य समजते. याचा अर्थ असा नाही की, जे समजत नाही ते साहित्यच नाही. साहित्य साहित्य असते. सहेतुक/हेतुपुरस्सर केलेले लेखन. यात वाचक, लेखक यांच्यात अक्षराच्या माध्यमातून, भाषेच्या माध्यमातून हा हेतू सफल. या दोन्ही क्रियांमध्ये वाचक, लेखक यात आंतरक्रिया घडतेच. यश, अपयशाची चिंता यापेक्षा वाचकांपर्यंत पोहोचणे महत्त्वाचे.

ग्रेस यांच्या लेखनात कविता व ललित निबंधात भेद धूसर होतो. लेखनात एक प्रकारचा अमूर्ततेचा ध्यास दिसतो. न कळणाऱ्या पण अनुभवलेल्या, न समजणाऱ्या पण अवतीभोवती असणाऱ्या, अस्वस्थ

◆ *समग्र ग्रेस समजले, त्यांची कविता किंवा लेख एकसंध समजला असे कधीच होत नाही.* ◆

करणाऱ्या पण नेमकी अस्वस्थता कशामुळे हे न समजणाऱ्या अनेक गोष्टी, स्रोत, भावना, स्थिती अनुभव विश्व आपल्याला त्यांच्या लेखनात दिसते. ते समजावून घेण्याची, अर्थनिर्णय न करण्याची गरज ही वाचकालाही असली की, आपोआप साहित्य निर्मिती व आकलन या दोन आंतरक्रिया या सहजसोप्या होतात. जे जे करायचे ते मनापासून असा पिंडच. मग घर आवरणे असो, भाजी करणे असो, मुलांचे संगोपन असो वा लेखन अतिशय नीटनेटके आणि मन लावून करायचे आणि ते सर्व त्यांच्या घराच्या खोल्या, रंगसंगती, कपडे या सगळ्यांतून दिसायचे.

एखाद्या गोष्टीच्या आहारी जायचे तेही अत्युच्च. परस्पर दोन विरोधी टोके गाठायची. आत्मसंयम ठेवायचा तोही अत्युच्च. यात कुठेही सुवर्णमध्य नाहीच. अर्थात त्यांच्या लेखनातही नाही. जे वाटले ते थेट व्यक्त झाले. स्वतःच्या शैलीशी, विचारांशी कधीही प्रतारणा केली नाही. हा गुण की अवगुण? यापेक्षा वैशिष्ट्य म्हणूनच स्वीकारलेले बरे.

जी. ए. कुलकर्णींबद्दल ग्रेस यांना विलक्षण आकर्षण होते. जीएंना त्यांनी अनेक पत्रे लिहिली. पत्रमैत्रीचा सुरेख संबंधांचा उत्सव उभयतांनी जोपासला. गद्य, पद्यातील भेदच लेखनातून हद्दपार झाला. ग्रेस फार संवेदनशील होते हे साहित्यातून दिसतेच पण घराबाहेरची 'ग्रेसचे घरटे' अशी लिहिलेली पाटी याचा प्रत्यय देते. त्यांचे आपल्या मुलांवर खूप प्रेम होते. त्यांच्या लेखनात अनेक वेळा त्यांची नावे सहजपणे येतात. एकाकीपणामुळे आलेली आर्तता त्यांच्या लेखनात जाणवते. याबाबत ते म्हणतात, ''मी कोणाच्या मरणाला आणि तोरणालाही जात नाही. माझी एकतारी मी घेऊन बसतो एकांतात गर्द अंधारात. मी माझ्यापुरती वाजवतो आणि डावा हात उशाला घेऊन एकटाच झोपून जातो.''

ग्रेस यांच्या लेखनात ख्रिस्ती धर्मातील तत्त्वज्ञानाचा प्रभाव जाणवतो. 'प्रोटेस्टंट' बंडखोरी, नवीन विचार, स्वीकार ही मूल्य त्यांच्या लेखनात दिसतात. घंटानाद, चर्चबेल, बेला, बाला बिशूसारख्या नावांमधून हा प्रभाव जाणवतो. कुठल्याही धर्माचा, जातीचा, पंथाचा उदोउदो नाही.

शांतपणे यातले सौंदर्य टिपून वेगळेपणा वेगळ्या पद्धतीने न्याहाळून, लेखनाची विलक्षण शैली यामुळे ग्रेस वेगळे ठरले. सर्वसमावेशक, एकजिनसी, समरसणे ही त्यांची लेखनवैशिष्ट्ये मनात घर करतात.

हृदयनाथ मंगेशकरांबरोबरच्या शेवटच्या कार्यक्रमात त्यांना खूप धाप लागली. सगळा धीर एकवटून ते म्हणाले, ''शब्बे फुर्कत का जागा हूँ फरिश्तो... अब तो सोने दो... कभी फुरसद में कर लेना हिसाब... आहिस्ता... आहिस्ता...'' हे त्यांचे श्रोत्यांसाठी निघालेले शेवटचे वाक्य. 'माझ्या श्वासांचेही उद्गार होतात' हे त्यांचे विधान खरे ठरले. मरेपर्यंत आत्ममग्न असा हा कलंदर वृत्तीचा कवी सौंदर्यात जगला. वेदनाही सौंदर्य बनली. स्थितप्रज्ञाची अवस्था, चिंतनात मग्नस्थितीतच त्यांचा मृत्यू झाला.

एकूण ५५ वर्षांच्या दीर्घ लेखनात त्यांना लोकप्रियता मिळाली. ही लोकप्रियता इतर साहित्यिकांपेक्षा थोडी उशिरा मिळाली असे आपण म्हणू शकतो. ग्रेस यांच्या एकूण १३ पुस्तकांची सगळी मुखपृष्ठे, अर्पणपत्रिका, ऋणनिर्देश, मलपृष्ठे त्यांच्या सगळ्या साहित्यगुणांनी युक्त असलेली दिसतात. मुखपृष्ठाची रंगसंगती, अर्पणपत्रिकेमधील वेगळेपणाची जाणीव, ऋणनिर्देश यातून त्यांच्या लेखनातील अमूर्त भाव-भावना, रंगांचे संदर्भ, पक्षी, प्राणी, प्रतीक, प्रतिमा ह्या सगळ्या वैशिष्ट्यांसह त्यांचे प्रत्येक पुस्तक त्यांच्या लेखनाप्रमाणे वैशिष्ट्यपूर्ण झालेले दिसते. ग्रेस यांच्या लेखनाच्या आकलनासाठी व अभ्यासासाठी या सगळ्यांचा नीट बारकाव्यांनी अभ्यास करावा लागतो.

ग्रेस यांच्या सगळ्याच पुस्तकांच्या शीर्षकासंबंधी, मुखपृष्ठ, मलपृष्ठ, अर्पणपत्रिका या प्रत्येक गोष्टीत त्यांची साहित्य वैशिष्ट्ये एकवटलेली दिसतात. अतिशय वेगळ्या प्रकारच्या अर्पणपत्रिका, वेगळ्या प्रकारची शीर्षके आणि मुखपृष्ठे आपल्या मनात खोलवर परिणाम करतात. यात कविता, शायरी, इंग्रजी वाक्य, स्वगत काहीही असू शकते हेच त्यांचे लेखन विशेष प्रथमदर्शनी शीर्षके, अर्पणपत्रिका, मुखपृष्ठात दिसतात.

## लौकिक चरित्र

१० मे १९३७ रोजी नागपूरमध्ये कर्नलबाग परिसरात एका महार कुटुंबात ग्रेस यांचा जन्म झाला. त्यांचे वडील लष्करात होते. त्यांचे वय

***एक लेखक, संपादक, समीक्षक अशा अनेक भूमिका त्यांनी उत्तम पार पाडल्याच्या आठवणी अनेकांनी लिहिलेल्या आहेत.***

लहान असताना त्यांच्या आईचा अकाली मृत्यू झाला. आईच्या मृत्युमुळे विस्कळीत झालेले घर त्यांना सांभाळावे लागले. यातच वडिलांनी दुसरे लग्न केले. त्यांचे वडिलांशी फार पटत नसे. आई जाण्याने त्यांच्या आयुष्यात जी पोकळी निर्माण झाली ती त्यांच्या लेखनात आपल्याला जाणवते. अत्यंत कष्टमय आयुष्य होते. 'कमवा आणि शिका' त्यांना अंगी बाणावे लागले. कुठलीही गोष्ट त्यांना सहज मिळाली नाही. असे असले तरी त्यांच्या लिखाणात कुठलाही कडवटपणा आपल्याला दिसत नाही. त्यांना वाचनाची अतिशय आवड होती. पाश्चात्त्य लेखन, साहित्य, कला, अभिजात साहित्य, संगीत या सगळ्यांचा त्यांचा अतिशय सखोल अभ्यास होता. दृश्यकला, सिनेमा, नाटक यांचाही अतिशय बारीक अभ्यास होता. 'नीटनेटकेपणा' या गुणांचा आग्रह त्यांच्या लौकिक आयुष्यात पदोपदी प्रत्ययाला येतो. B.A., M.A. या दोन्ही पदव्या प्राप्त करताना त्यांना सुवर्णपदक मिळाले. शैक्षणिक यशामुळे त्यांना प्राध्यापक म्हणून सहज नोकरी मिळाली.

डॉ. लीला माटे यांच्याशी त्यांचा विवाह झाला. त्या ग्रेस यांच्यापेक्षा वयाने मोठ्या होत्या. त्यांना तीन अपत्ये झाली. मिथिला, माधवी, राघव या तीन मुलांवर त्यांचा अतिशय जीव होता. त्यांच्या पत्नीचे अकस्मात निधन झाले आणि तीन मुलांच्या संगोपनाची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली. आई व वडील अशा दोन्ही भूमिका ते उत्तम निभावत होते. पत्नीच्या जाण्याने ते विलक्षण दुःखी झाले. आई नसण्याची जाणीव सतत त्यांना टोचत असे. आईची जागा कोणीच घेऊ शकत नाही. ती नसण्याची पोकळी सतत टोचते. ही टोचणी त्यांच्या अनेक कविता व लेखांमध्ये दिसते.

स्वगतासारखे झपाटून व्यक्त झालेल्या भाव-भावना त्यांच्या ललित लेखात दिसतात. याच लेखन प्रवाहात आपल्या मुलांची नावे, पत्नीचे नाव, आईचे नाव सहजपणे येते. काळ कोणासाठी थांबत नाही. कोणत्याही

गोष्टींचा एकतर अतिरेक किंवा पूर्ण अभाव या दोन टोकाच्या वर्तनामुळे एखाद्या गोष्टीच्या पूर्ण आहारी जायचे किंवा ती गोष्ट आपल्या आयुष्यातून पूर्ण हद्दपार करून टाकायची. सुवर्णमध्य नाहीच. म्हणूनच अतिशय मनस्वी कलाकार, कलंदर वृत्ती, काहीशी बेदरकार वृत्ती आपल्याला त्याच्याविषयी लिहिलेल्या अनेक लेखांमधून दिसते. कर्करोगामुळे ते आतून पोखरत गेले आणि त्यांचा मृत्यू अतिशय वेदनेत झाला.

वडील म्हणून ग्रेस अतिशय उत्तम होते. मुलांना आईचे प्रेम, वडिलांचे प्रेम एकत्रितपणे दिले. स्वतः मुलांना स्वयंपाक करून जेवायला वाढणे, संपूर्ण संगोपन त्यांनी अतिशय नेटकेपणाने, नेटाने व प्रामाणिकपणे केले.

मित्र म्हणून ग्रेस नेमकेपणाने कोणालाच उलगडले नाहीत. रामदास भटकळ, दि. भा. घुमरे, हृदयनाथ मंगेशकर यांच्याबरोबर त्यांचे खूप प्रेमाचे संबंध होते. मैत्रीत द्वेष, आकस, दुष्टपणा नसतो. ग्रेस यांचा स्वभाव काहीसा विक्षिप्त, मुडी असल्याने सगळ्यांशीच सगळ्या वेळेला पटेल असे काही नव्हते. पण जेवढ्या लोकांशी त्यांचा प्रेमभाव होता तितक्यांशी त्यांची मैत्री दिसते. अनेक प्रकाशक, वार्ताहर त्यांच्या संपर्कात होते. त्यांच्या कविता, लेख यांच्या वेगळेपणाबद्दल त्यांना कुतूहल होते.

शिक्षक, प्राध्यापक, अध्यापक म्हणून ते ख्यातनाम होते. त्यांच्या तासाला कोणीही हललेले त्यांना चालायचे नाही. संपूर्ण वर्ग एकदम शांततेत. तालबद्ध हालचाली करत त्यांची मंत्रमुग्ध करणारी शिकवण्याची शैली यामुळे त्यांचे अनेक विद्यार्थी कलावंत, साहित्यिक, चित्रकार म्हणून कला शाखा, उपयोगित कलांमध्ये नावारूपास आले. सौंदर्यवादी दृष्टी, नवता, विविध धर्मांचे तत्त्वज्ञान, लय, ताल, संगीत, रंग सादरीकरण या प्रत्येक विषयावर सविस्तर मांडणी. अभिरुची उत्पन्न करून एखाद्या वस्तू घटनेकडे बघण्याचा दृष्टिकोन कसा असावा हे सारे सारे एक शिक्षक म्हणून त्यांनी मुलांना भरभरून दिले.

सिनेमा, नाटक, संगीत, पाश्चात्त्य संगीत, पाश्चात्त्य साहित्य, साहित्यिक, प्रादेशिकता, वेगवेगळे पंथ, पंथीय प्रेरणा, प्रवृत्ती, कलादृष्टी या सगळ्या विषयांवर त्यांचा स्वतंत्र अभ्यास होता. तशीच अभ्यासाची सवय त्यांनी त्यांच्या विद्यार्थ्यांना लावली. अनेक विद्यार्थी यशस्वी झाल्याचे श्रेय ते ग्रेस सरांना दिल्याचे आपल्याला अनेक संदर्भ ग्रंथांमधून दिसते. सेवानिवृत्ती

◆ *सैरभैर झालेले मन स्थिर होण्याच्या प्रक्रियेतील कविता म्हणजे सांध्यपर्वातील वैष्णवी.* ◆

आणि सेवानिवृत्तीनंतरही पुढची काही वर्षे ते ज्ञानदानाचे काम करतच होते. व्यवसायाने शिक्षक असले तरी त्यांनी सर्व स्तरांवर आपल्या वेगळेपणाचे वैशिष्ट्य जपलेले दिसते.

एक लेखक म्हणून ते खूप वेगळे आणि साहित्यविश्वात त्यांच्या शैलीच्या वेगळेपणाबद्दल प्रसिद्ध होतेच, परंतु माणसाच्या अवतीभवती असणारा समाज, घडणाऱ्या घटना यांचा परिणाम कुठे तरी तुमच्या साहित्यावर होतो. माणसाचे लौकिक चरित्र आणि वाङ्मयीन चरित्र भिन्न असले तरी त्या दोहोंचा समन्वय साधणारा हा जिवंत मनुष्य व्यक्ती असते हे विसरून कसे चालेल? संपादक म्हणूनही ग्रेस उत्तम होते. त्यांनी 'युगवाणी'चे संपादन करताना त्यांचा नेहमीचा नेटकेपणाचा आणि जशीच्या तशीच गोष्ट घडली पाहिजे, असली पाहिजे हा ताठा सोडून, स्वतः सिद्धहस्त लेखक असताना त्यांनी अनेक नवोदितांना लिहिते केल्याच्या अनेक आठवणी अनेकांनी सांगितल्या आहेत. पण पाडीव साहित्य, घडवलेल्या साहित्याची मात्र त्यांनी कधीही दखल घेतली नाही. त्यांच्या लेखी जाणूनबुजून केलेले लेखन हे साहित्यच नसते. साहित्य हे मनाच्या अंतरंगातून सहज, उत्स्फूर्तपणे आले पाहिजे. एक लेखक, संपादक, समीक्षक अशा अनेक भूमिका त्यांनी उत्तम पार पाडल्याच्या आठवणी अनेकांनी लिहिलेल्या आहेत.

जी. ए. कुलकर्णी हे ग्रेस यांना खूप आवडणारे लेखक होते. त्यांनी अनेक सुंदर पत्रे जी. एं.ना लिहिल्याचे दिसते. न भेटता, न बोलता केलेली एक विलक्षण पत्र-मैत्री त्यांनी जोपासलेली दिसते. त्यांचे जीएंवर असलेले प्रेम अनेक लेखांमधून, अर्पणपत्रिकेतूनही दिसते. एक व्यक्ती म्हणून ग्रेस अनेकांना अनेक प्रकारे भावले, काहींना त्यांचे काहीसे नकारात्मक अनुभव आले. काहींना त्यांच्या प्रेमळपणाचा प्रत्यय आला तर काहींना विक्षिप्तपणाचा. ते स्वभावाला नेमके कसे होते हे सांगणे खरेच खूप अवघड आहे. परंतु एक लेखक म्हणून, माणूस म्हणून ते जीवन जगण्याशी खूप खूप प्रामाणिक होते हे मात्र निश्चित.

## सांध्यपर्वातील वैष्णवी (१९९५)

हा कवितासंग्रह १९९५ मध्ये आला. या कवितासंग्रहाचे मुखपृष्ठ सुभाष अवचट यांनी केलेले असून पांढऱ्या पार्श्वभूमीवर मनुष्याकृती अर्धी असून खांद्यावरून खाली आलेले वस्त्र, खडकावर बसलेला पक्षी, संथ लहरणारे भाव, ध्यानमग्नचर्या, हे सगळे लेखन-विशेष मुखपृष्ठातून व्यक्त होतात. निळ्या-जांभळ्या पार्श्वभूमीवर अशीच मनुष्याकृती व तिच्या समोरची मोकळी खुर्ची खूप काही सांगून जाते. आत्मनिवेदन मांडताना शीर्षकातील वैष्णवी कशी आहे? ती येते, जाते आणि आपण फक्त पाहतो. एकतारीवर आत्ममग्न राहतो. संध्याकाळ, कातरवेळ, एकतारी या प्रतीक, प्रतिमा याही संग्रहात अनेक वळणांवर अनेक अर्थाशयाचे पापुद्रे उलगडताना दिसतात. अर्पणपत्रिका एका कावळ्याला समर्पित केली आहे. यात आत्ममग्न भावावस्था, नदीची प्रतिमा, खारीचे अस्तित्व... आईच्या पिंडाला स्पर्शून केलेले आक्रंदन, सांध्यपर्वातील 'वैष्णवी' ह्या आत खोलवर असलेल्या 'वेदना रूपा'त आपल्याला वेगळ्याच अव्यक्त आणि अमूर्त जगात अनुभूतीनेच जाता येते. अनुभूतीचे माध्यमच या जगाचा साक्षात्कार घडवते. ऋणानुबंध हे अर्थात ग्रेस यांचे मित्र रामदास भटकळ आणि सुभाष अवचट यांच्याविषयी व्यक्त केले आहे.




सांध्यपर्वातील वैष्णवी हा कवितासंग्रह एका आत्ममग्न आणि शोधाचा प्रवास वाटतो. काहीतरी शोधण्याच्या नादात निघालेला कवी सांध्य, संध्या, संधिकाली, संध्याकाळी ध्यानमग्न स्थितीत स्थिरावलेला दिसतो. सैरभैर झालेले मन स्थिर होण्याच्या प्रक्रियेतील कविता म्हणजे सांध्यपर्वातील वैष्णवी.

प्रार्थनापर्व, सांध्यपर्व, दृष्टान्तपर्व या तीन पर्वांतून त्यांच्या मनोवस्थेचे

◆ *‘केशर’ कवितेतील घन कोवळे असतात, ते संध्याकाळच्या प्रहरी थरथरतात ही भावना अतिशय नावीन्यपूर्ण पद्धतीने येते.* ◆

टप्पे वेगवेगळ्या प्रतीक, प्रतिमा, रूपकांमधून व्यक्त होते. तीन टप्पे, तीन मनोवस्था व्यक्त करतानाचा स्थिर असा, संयमित प्रवास शांतरसाची प्रचिती देतो. जीवनात वेदना असली तरी त्याबद्दल तक्रार नाही, आकस नाही.

‘अर्थांतरन्यास’ अलंकार शास्त्रातील महत्त्वाचा अलंकार आपले लक्ष वेधून घेतो. ग्रेस यांना भारतीय अलंकारशास्त्र उत्तम माहिती होते याचा नुसता प्रत्यय येत नाही, तर त्याचे नावीन्यपूर्ण उपयोजन जास्त लक्षवेधी ठरले आहे.

या संग्रहातील अनेक कवितांना शीर्षक नाही. नुसते अंक दिसतात. हीच रचना त्यांच्या इतर कवितासंग्रहातही दिसते. या कवितांमध्ये भारतीय पुराणकथांतील पात्रे, नद्या, कावळ्याची प्रतिमा, कोसळणारा पाऊस, गाय, हत्ती, वासरू, हंबरणे, सूर्यास्त इ. अनेक गोष्टी प्रतीक, प्रतिमा, रूपके यांच्या आधारे वारंवार येताना दिसतात.

संत साहित्य, पुराणकथा, सूफी तत्त्वज्ञान, ख्रिश्चन तत्त्वज्ञान, उर्दूतील काव्य यांच्या संगमातून एक वेगळी लेखनशैली हे ग्रेस यांचे वैशिष्ट्य ठरले आहे.

* * *

## चंद्रमाधवीचे प्रदेश (१९७७)

ग्रेस यांच्या निर्मितीचीच नव्हे तर समग्र मराठी साहित्यातील Pure poetry च्या कक्षेचा परीघ विस्तीर्ण करणारी कविता म्हणजे ‘चंद्रमाधवीचे प्रदेश’; मलपृष्ठावरील हे विधान या संपूर्ण काव्यसंग्रहाचे सगळे वैशिष्ट्य, गुणधर्म, वेगळेपणा व्यक्त करणारे आहे. संगीताला जशी भाषेची, भाषा समजण्याची गरज नसते तशीच या काव्यसंग्रहातील कविता समजण्याची गरज नसते. या कविता अनुभवजन्य आहेत. या तुम्हाला जाणवतात, समजतात. मेंदूतून अंतरंगात सहज उतरतात. या कवितांचे

अर्थ आपण इतरांना सांगू शकत नाही. या कवितांचा अर्थ सांगता येत नाहीच; परंतु तो शब्दांकितही करता येत नाही. शब्दाच्या माध्यमाला मर्यादा येते. संगीताच्या भाषेच्या ताकदीचा प्रत्यय, रचनेचे नावीन्य, आवर्तन, आवर्तनातच राहण्याची धडपड आणि पुनःप्रत्ययाची वेदना, दुःख या कवितेत दिसते. सूफी पंथाचा, संगीत (सूफी), पौराणिक कथा मिथकथा, प्रतिमा, रूपके यात पुनरावृत्ती असली तरी कवितेच्या एकसंध आत्मप्रत्ययाची अनेक दालने खुली होतात. भावभावनांचे पदर, पापुद्रे उलगडत जातात. शेवटी मात्र आपण जिथून सुरुवात केली तिथेच येऊन थांबतो. आवर्तन पूर्ण होते. दुःख, उदासी, मृत्युविषयी आकर्षण श्रृंखला निर्माण झालेल्या दिसतात. नवकाव्याची सुरुवात आणि नवेपणाची देणगी मराठी कवितेला प्राप्त झाली, असे या काव्यसंग्रहाच्या निमित्ताने आपण ग्रेस यांच्याविषयी म्हणू शकतो.




सुभाष अवचटांनी हात डोक्याखाली घेऊन झोपलेला, दाढी केस वाढलेला एकाकी असलेला पुरुष रेखाटला आहे. मुखपृष्ठ पांढऱ्या पार्श्वभूमीवर असून संन्यासी वाटणारा हा एकाकी माणूस चपला सरळ न ठेवता विषण्ण भावमग्न स्थितीत उलटा झोपलेला रेखाटला आहे. हातात चंद्राची कोर पकडलेला. जिव्हाळ्याच्या माणसांचा निर्देश करत कवितासंग्रहाच्या निर्मितीचे श्रेय त्यांचे मित्र रामदास भटकळ यांना दिले आहे. गळ्यात क्रॉस घातलेला, केस वाढलेला, रिकामा ग्लास जवळ असलेला माणूस अनुक्रमणिकेत रेखाटला आहे. चर्च घंटा आणि जिझसला मृत्यू देताना वापरलेला क्रॉस यांचा ठळक वापर केलेला दिसतो. ग्रेस यांच्यावर ख्रिस्ती धर्माचा प्रभाव, शांतता, भयाण शांतता, 'स्व'चा शोध आणि यातून आलेले एकाकीपणा यांचा आपल्याला प्रत्यय येतो.

***संत साहित्य, पुराणकथा, सुफी तत्त्वज्ञान, ख्रिश्चन ◆ तत्त्वज्ञान, उर्दूतील काव्य यांच्या संगमातून एक वेगळी ◆ लेखनशैली हे ग्रेस यांचे वैशिष्ट्य ठरले आहे.***

'चंद्रमाधवीचे प्रदेश' या कवितासंग्रहातील कवितांवर जीएंच्या लेखनाचा प्रभाव जाणवतो. या कवितांवर बालकवींचा प्रभाव जाणवतो. पाश्चात्त्य साहित्यिक रिल्के आणि अस्सल मराठी साहित्यिक, संत साहित्य, आधुनिक नवकवितांच्या संमिश्रातून वेगळ्याच मुशीतल्या वेगळ्या कविता ठरतात.

'पाऊस' या कवितेची रचना दोन कडव्यातील तीन रेघा लक्षवेधी ठरतात. 'केशर' कवितेतील घन कोवळे असतात, ते संध्याकाळच्या प्रहरी थरथरतात ही भावना अतिशय नावीन्यपूर्ण पद्धतीने येते.

'चंद्रमाधवीच्या प्रदेशात' ही कविता वाचताना आपल्याला एकप्रकारचा भावनिक शोध असल्यासारखे वाटते. हा शोध अजूनही संपलेला नाही. एक अपूर्णपणाची जाणीव दिसते आणि एका बाजूला जगरहाटीला धरून राहण्याची धडपड दिसते.

'द्रौपदी' या कवितेत आलेली द्रौपदीची प्रतिमा, या कवितेत आलेले नवे शब्द लक्ष वेधून घेतात. नव्या संकल्पना जसे; कांतार शिल्प, चंदनाच्या बाभळी, रक्तगुंफा, चंद्रओटीतले चांदणे मनात वेगळे अमूर्त जग निर्माण करतात.

**चंद्रमाधवीचे प्रदेश**

*सुभाषने चित्रे काढलीच आहेत*
*राम पटवर्धन व सौ. मृदुला जोशी*
*यांचे जिव्हाळ्याचे साहाय्य*
*रामदासने हे प्रदेश जोपासले आणि*
*जर या निर्मितीला काही मूल्य असेल*
*तर त्याचे श्रेय रामदासचेच*

*...When you have finished*
*with others, that is my time*

★ ★ ★

## आत्मनिवेदन

*एका मुसळधार पावसाच्या रात्री परमुलुखात*
*Red River Valley Song ची*
*हिंस्रकरुण टेप*
*ऐकली चर्चमध्ये*
*तेव्हापासून मेंदूची एकेक पाकळी*
*गळतेच आहे*
*आठवणी तरी कशा*
*कुठल्याशा संध्याकाळी एखाद्या जीर्ण*
*मशिदीत कुराणाची शेवटची*
*प्रत उजळत असावी तशा*
*नाही तरी कसे*
*दुःखाची भर्जरी तिरीप डोळ्यांवर चालून*
*आली की मीही एखादा*
*उखाणा घालतो*
*वेदनेचे सुलभीकरण करण्यासाठी*
*तिचा अपभ्रंश करीत नाही*
*मी द्वैती*
*तपशिलाला महासिद्धान्ताचे रूप देण्याची*
*ताकद माझ्याजवळ नाही*
*मोडलेल्या प्रार्थनांची*
*वीण उसविणारा*
*एखादा फकीर*
*मला सापडेल*

* * *

## केशर

*ये माघारी*
*हो गंधारी*
*इथे कोवळे घन थरथरती*
*संध्येच्या प्रहरी.*

*पल्याडचे मन*
*त्याचा साजण*
*दिशाभुलीने विसरून गेला*
*गगनाचे अंगण.*
*पल्याडचे मन*
*त्याचा साजण*
*दिशाभुलीने विसरून गेला*
*गगनाचे अंगण.*

*तरूंत बाई*
*सळसळ होई*
*दोन घागरी घेउन गेली*
*ज्या डोहाला आई...*

*भरीत भर*
*कोसळली सर*
*तिच्या सखीने तुज मागितले*
*थोडेसे केशर...*

✶ ✶ ✶

## चंद्रमाधवीच्या प्रदेशांत

*दुर्गुण सांगितल्याने*
*माया वाढते*
*कुणी ढकलून देणार नाही*
*अशा मांडीचा*
*शोध घेत राहिलो*
*आणि आत्ता तू*
*जन्माचा अबोला धरलास*
*तुला हे प्रदेश*
*अर्पण करतो*
*बिशूला मी राघव म्हणत*

*नाही आत्ताशा*
*रघुना ऽ ऽ ऽथ अशी*
*पिकलेली हाक*
*देतो*

* * *

## द्रौपदी

*शिरे मंद अंधार फांदीमधूनी*
*पुन्हा वृक्ष त्यात रातांधळे;*
*कांतार-शिल्पातली गोठलेली*
*सुगंधी फुलांची जुनी वादळे...*

*शिरे डोंगरी, राउळी धर्मशाळी*
*धुक्याची निळी नागमोडी दरी;*
*जिथे हाक जाते तिथे कावळ्यांनी*
*उभा राजवाडा धरावा उरी?*

*मला आठवे दग्ध माध्यान्ह माझा*
*हले जन्म गाई जशा गोकुळी;*
*तुला ये रडू कोणत्या साजणाचे?*
*वनी चंदनाच्या उभ्या बाभळी...*

*तिथे द्रौपदीच्या दिठीला मिळाले*
*सुन्या अंतराळातूनी चालणे;*
*नको रक्तगुंफेत शिंपून जाऊ*
*तुझ्या चंद्रओटीतले चांदणे...*

* * *

## खेळ

*दिले अंगण खेळाया*
*खेळ मांडला मी देवा*
*माझ्या खांद्यावर एक*
*फुली फुलला पारवा...*

*वर पाहताती डोळे*
*तुझे नागवे अंबर;*
*कुण्या सागरमहाली*
*निळ्या लाटांचे झुंबर*

*खेळ तुटेल म्हणून.*
*किती पसरिल्या हाका;*
*सारी वर्जन राहाटी*
*मला समजते मुका!*

*भुली भुलला पारवा*
*गेलो बुडवाया जळी*
*तेथे नदीच्या पाण्यात*
*दिसे मेलेली मासोळी...*

*पहाडाच्यापाशी गेलो*
*तेथे तमाचा गिलावा;*
*आणि त्याच्याही पल्याड*
*उभा झाडांचा मेळावा...*

*मग थोड्याशा प्रेमाने*
*माझे कातडे सोलले;*
*अंगअंगी दाटलेत*
*रक्तचंदनाचे मळे...*

*तसे उठले आभाळ*
*मोर नाचाया लागले,*
*आणि एवढ्यासाठी*
*माझ्या डोळा पाणी आले...*

★ ★ ★

## शब्द

*जशा उडती घारी गगन तितुके उंच जाई*
*तुझ्या हंबरणाऱ्या परत फिरवी सर्व गाई*
*अरे पंखांमध्ये घरकुल कसे; गडद खाई*
*अता वृक्षांनो सोडा नगर अपुले सांज येई!*

*तिथे समईपाशी थरथर उभा मुख्य वैरी*
*तुझ्या केसांना ये विकल कुठला गंध जहरी?*
*दिशांचा बैरागी ऋतुच कुणि की एक भगवा?*
*जसा दुःखामागेही अजुन येतो मंद शिरवा?*


*धुळींचे गाभारे भयचकित मी पाय झडले*
*फुलांच्या स्पर्शने मृगजळ जसे फक्त रडले...*
*निळ्या घंटा हलती हृदयध्वनि कांतार ओले*
*तुझ्या गात्री की माझे बहर टळले स्वप्न झाले?*

*तुझी निद्रा नवखी नितळ तव अंगात येना*
*सतीच्या सरणाला रचुन अवघे रान देना!*
*कळ्या, मेंदू, पाणी हिमनग तसा शुभ्र हलला*
*कसा संध्याकाळी सहज मजला शब्द स्फुरला?*

✶ ✶ ✶

## बाई! जोगिया पुरुष (२०१२)

हा शेवटचा कवितासंग्रह. या कवितेचे मुखपृष्ठ सुभाष अवचटांनी केलेले असून केशरी लाल लांबूडका टिळा लावलेला एक मनुष्याकृती चेहरा, अवकाश, आकाश, लाल केशरी छटा या रंगसंगतीतून एक परिपक्वतेचा प्रत्यय येतो. वाटीसदृश असलेली खोल पणती कुठेतरी शेवटच्या टप्प्याविषयी सूचकपणे लक्ष वेधून घेते. या संग्रहातील कविता या अमूर्त गोंधळ निर्माण करणाऱ्या, संभ्रम निर्माण न करणाऱ्या आहेत. उलट अधिक स्थिर, शाश्वत, मृत्युपंथाच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या जाणवतात. कर्करोगाने पछाडल्यावर, सत्य उलगडल्यावर एक समेवर येण्याची प्रक्रिया या कवितांमधून जाणवते. या कवितेला अर्पणपत्रिका नाही, या कवितासंग्रहात ऋणनिर्देशही नाही. या कवितासंग्रहात अनुक्रमणिकेतील कविता, कवितांचे विषय व शीर्षके लक्षवेधी आहेत. या कवितासंग्रहातील कवितेत संत साहित्याचा प्रभाव जाणवतो. तुकाराम, ज्ञानेश्वर, जनाई, कबीर इ. संत साहित्याची उजळणी, द्वैत, अद्वैताचा भाव या कवितांमध्ये उमटतो. द्रौपदी, गांधारी, हंबरणाऱ्या गोकुळातल्या गायी इ. प्रतिमा येथेही आहे. या प्रतिमा असलेल्या कविता स्थिर, शांत, अचल वाटतात. वानप्रस्थाश्रमातली स्थिरता या कवितांमध्ये जाणवते.





* * *

## संध्याकाळच्या कविता (१९६७)

संध्याकाळी, कातरवेळी, सांजभय, संध्या, सायंकाळ असे अनेक शब्द त्यांच्या लेखनात सातत्याने येतात. संध्याकाळचा प्रहर त्यांच्या लेखनाचा अविभाज्य भाग असलेला कवितासंग्रह म्हणजे संध्याकाळच्या कविता.

◆ ***ग्रेस यांच्या शैलीचा विचार केला तर राजपुत्र आणि डार्लिंग या शीर्षकातून एक कथा किंवा कहाणी उलगडली की काय असे अनेक प्रश्न मनात येतात.*** ◆

'संध्याकाळच्या कवितां'त अनंत संध्यावेळा एकवटल्या आहेत. सगळ्या वेळांची मिळूनच झालेली आहे एक दीर्घ संध्याकाळ. या कविता संग्रहाचे मुखपृष्ठ पद्मा सहस्रबुद्धे यांनी केले आहे. यात वापरलेल्या गुलाबी केशरी रंगच्छटेतून प्रत्ययाला येणारी संध्याकाळ खूप सहजपणे प्रत्ययास येते. दिवस संपल्यावर येणारी जडत्वाची भावना, स्तब्धता, रात्रीची चाहूल, सावल्या, एकाकीपण, दुःखाची जाणीव या भावनांचा पसारा संध्याकाळीच जाणवायला लागतो. संध्याकाळच्या प्रहरी अद्भुत शक्तीचे अवतरण साऱ्या सृष्टीभर पसरते, भिनत जाते आणि एक समाधी अवस्था निर्माण होते. या अवस्थेत अनेक भावना मनात पिंगा घालतात, वारंवार उद्भवतात आणि आपण मात्र त्यात पूर्णपणे गुंतून जातो.




समर्पणाची भावना अर्थात इन्ग्रिड बर्गमन यांच्यात व्यक्त केली आहे. रामदास भटकळ व लीला गुणवर्धिनी यांचे आभार मानले आहेत. प्रस्तावनासुद्धा एक कविता आहे. विशेष म्हणजे या संग्रहाला अनुक्रमणिका नाही. कुठलेही पान कधीही उघडून कोणतीही कविता वाचू शकतो...

संध्याकाळच्या कवितेत प्रारंभी सॉमरसेट मॉमचे विधान ग्रेस यांनी उद्धृत केले आहे.

It is not a tragedy that men become old or die but cease to love........ ग्रेसची कविता समजून घेताना या विधानाचा

◆ ***या ललित निबंधांमधील ओघवती शैली ही परिपक्व आणि चिंतनगर्भ विचारातून आलेली आहे असे दिसते.*** ◆

अर्थ समजावून घ्यावा लागतो. जगण्यावर निस्सीम प्रेम करणाऱ्या आणि त्या प्रेमाचे आविष्करण करणाऱ्या कविता त्यांनी लिहिल्या. या लिहिताना कधी हे भाव पानापानांतून डोकावतात, मावळतीच्या उन्हातल्या राधेतून, पातळ अंधारातून, कृष्णाच्या बासरीतून, संधिप्रकाशातून, लिंबोणीच्या सावल्यांतून, सजलसांध्य देवळातून अशा अनेक संध्याकाळाच्या रूपात येतात. सांजेचा प्रवाह त्यांच्या कातरवेळच्या मनाच्या अवस्था व्यक्त करणारा आहे. ग्रेस यांनी घेतलेला कितीतरी क्षणांचा हा कातर अनुभव आहे. 'प्रतिमांच्या भाषेत बोलणारी कविता' असे आपण म्हणू शकतो.

विलक्षण शब्दप्रभुत्व, अफाट वाचनाचे संस्कार, भिन्न भाषा अध्ययन आणि दीर्घ चिंतनाची तरल मांडणी, आत्ममग्न अवस्था, चिंतन, आतला शुद्धस्वर ही त्यांच्या कवितेतून जाणवणारी वैशिष्ट्ये आहेत.

### संध्याकाळच्या कविता

*To Ingrid Bergman...*

*- ग्रेस*

*It is not a tragedy that men become old or die but cease to love...*

*- Somerset Maugham.*

*एखाद्या समृद्ध माणसासारखे*
*माझ्या वाट्याला आले रामदास भटकळ.*
*त्यांच्यासंबंधी काय लिहू?*
*मी आज आयुष्यात उभा आहे*
*आणि त्याचे सर्व श्रेय*
*लीला गुणवर्धिनी यांचे.*

*-ग्रेस*

★ ★ ★

*क्षितिज जसें दिसतें,*
*तशीं म्हणावीं गाणीं*
*देहावरची त्वचा आंधळी*
*छिलून घ्यावी कोणी.*
*गाय जशी हंबरते,*
*तसेंच व्याकुळ व्हावें*
*बुडतां बुडतां सांजप्रवाहीं;*
*अलगद् भरुनी यावे.*
*- ग्रेस*

✶ ✶ ✶

## पहाट

*आज केशरी थेंबांनीं*
*जाग आणिली कोवळी.*
*हाका-हाकांच्या लेण्यांत*
*सूर घुमले पोवळी.*

*निळ्या ओलाव्याच्या कांठीं*
*आज नारिंगाचें बन,*
*झाली तरंग... तरंग*
*स्निग्ध मेघांची पोकळी.*

*रित्या मुठींत झांकला*
*शुक्र प्रभेचा अनंत,*
*स्पर्शास्पर्शात गोंदलें*
*स्वप्न राधेचें हिवाळी*

✶ ✶ ✶

## आकाश

*गुंतवितां मिठी*
*गर्द झाले श्वास*
*सुजले आकाश*

*पाठीवरी.*
*अशा रंगापाशीं*
*मातीचे चांदणें*
*पल्याडचें जिणें*
*जन्माआधीं.*

✶ ✶ ✶

## हिमगंध

*नको मोजूं माझ्या*
*मुक्तीचीं अंतरें;*
*ब्रह्मांडाची दारें*
*बंद झाली.*
*माझ्या आसवांना*
*फुटे हिमगंध,*
*मागें-पुढें बंध*
*पापण्यांचे.*

✶ ✶ ✶

## निर्मिति

*कधीं पांघरावे मीहि*
*माझ्या रक्ताचे प्रपात,*
*गूढ घावांचे किनारे*
*मींच तोडावें वेगांत.*
*असा आंधळा आवेग*
*मीच टाळावी बंधनें,*
*विश्वनिर्मितीच्या रात्रीं*
*मला छेदावें श्रद्धेनें.*
*अशा लाघवी क्षणांना*
*माझ्या अहंतेचें टोंक*
*शब्द फुटण्याच्या आधी*
*ऊर दुभंगते हांक.*

✶ ✶ ✶

## वैरी

*वाऱ्यानें हलतें रान*
*तुझें सुनसान*
*हृदय गहिवरले;*
*गायीचे डोळे करुण उभे की*
*सांज निळाईतले...*
*डोळ्यांत शीण*
*हातात वीण*
*देहांत फुलांच्या वेगीं;*
*अंधार चुकावा म्हणून*
*निघे बैरागी...*
*वाळूंत पाय*
*सजतेस काय?*
*लाटान्ध समुद्राकांठीं*
*चरणांत हरवला गंध*
*तुझ्या कीं ओठीं?*
*शून्यांत गर्गरे झाड*
*तशी ओढाळ*
*दिव्यांची नगरी;*
*वक्षांत तिथीचा चांद*
*तुझा कीं वैरी?*

* * *

## इराणी संगीताच्या प्रतिमा

*आपोआप हलतात इथल्या वाळूवर इराणी*
*संगीताच्या प्रतिमा...*
*मला आलिंगनात मरण तसा रात्रीचा शृंगार,*
*तुझे चांदरातीचें अर्थनिळें मन...*
*कुठें याच्याही पलीकडे, कुठे त्याच्याही पलीकडे संपूर्ण*
*अवकाशाला टाळून फक्त वाऱ्यालाच ऐकूं येईल*
*अशी सारंगीची पिपासा*

*जशा इराणी संगीताच्या प्रतिमा...*
*वाळू पसरली देहापार, कुणाच्या नादांत?*
*कुणाच्या शोधांत?*
*स्वरसिद्ध तिचे अनंत कण; रेषाबद्ध उंटांच्या*
*मानेंत जसें चंद्रबन...*
*कुणी दिसत नाहीं; नाहीं दिसत एवढ्या प्रचंड*
*टापूंत मला, कुण्या युगांत येथे झाडें उगवलीं*
*असतील त्या डोळ्यांचा निरंगी नश्वर सुरमा,*
*जशा इराणी संगीताच्या प्रतिमा...*
*मज्जेच्या खालीं तळमळणारे फुलांचे दैवी घोस...*
*कीं कुण्या वैदेहीची पंथविराम गुणगुण?*
*शिशिराच्या मागें वाजवी सूत्रधाराची धून...*
*नभ एवढे विराट, माझें नाहीं तसें तुझेंही नाहीं या*
*वाळूच्या सप्तरंगी कणांचें अज्ञातपण*
*फक्त दुःखाच्या देखाव्यांना दिशाबद्ध*
*करणारें पिरॅमिडांचें अधांतर;*
*जशा इराणी संगीताच्या प्रतिमा...*

✶ ✶ ✶

## इन्ग्रिड बर्गमन

*आषाढांतील भर्जरी मेघांसारखे पूर्ण ऐहिक डोळे*
*घेऊन तूं आलीस; नेस्तनाबूत झालेल्या या*
*साथीच्या गांवांत*
*विश्वरचनेंतील बर्फाचा शुभ्र पहाडी अहंकार*
*या गांवांत आणून सोडलेला...*
*जशा अनेक बाबी किंवा अरण्यांतील निर्मनुष्यतेच्या*
*पारावर पडलेलीं हजारों फुलें...*
*हजारों फुले तशीं हजारों घरें या अनामिकांच्या प्रदेशांत;*
*तुझा घोडा तूं मोकळा सोडलास*
*शिशिराच्या निर्विघ्न कुरणांत...*
*तो मध्येंच दिपून पाहतो, एका नसलेल्या ध्रुवाच्या*

*दिशेंत झिजणाऱ्या तुझ्या देहास...*
*तुला वाटतात तितके सोपे नसतात तुझे अश्रू;*
*पाण्याच्या सलीलसंभ्रमांत हलतात जखमी*
*ख्रिस्ताच्या घंटा रात्रंदिवस...*
*गांवांवर सांचलेल्या बर्फांतून अज्ञात निनादांची*
*महापर्वणी जाऊं लागते;*
*तसें माझ्या झोळीत कांहीं नाही; जाण्यायेण्याच्या*
*चित्रलिपित झाडांचा एखादा संगमरवरी सांगाडा,*
*तोही चांदण्यांनी शोषून घेतलेला...*
*फक्त एवढेच : निःशब्द भासांच्या कांठाला लटकलेलें*
*हें स्टेशन आणि संवेदनांच्या आवर्तांना झुगारून,*
*कोण्या मावळत्या संताला तूं दिलेलें*
*एकाकी आलिंगन...*

✶ ✶ ✶

## माणूस

*घरांनी आपली दारे बंद केलेलीं असतात,*
*डोळ्यांना वेढून बसलेल्या अस्तित्वांच्या*
*रांगाही निवून जातात.*


*वैराण आणि एकाकी आकाशाच्या*
*पार्श्वभूमीवर संथपणानें हा जात असतो...*
*त्याच्या चेहऱ्यावर कदाचित् कमळांची*
*सरोवरें उगवली असतील...*
*परंतु इतक्या लांबून तीं दिसत नाहींत!*
*त्याच्या पावलागणिक माझ्या गीतांचीं*
*शकलें होऊन रस्तोरस्ती सुरांची*

*कारंजी उडतात, आणि तुझ्या-माझ्यापासून*
*निघालेला हा दुःखाचा काळोख, केवळ*
*त्याच्या निसटत्या स्पर्शानेंहि पैंजणांसारखा*
*रुणझुणत वाहूं लागतो...*

✶ ✶ ✶

## सांजभयाच्या साजणी (२००६)

मुखपृष्ठ व काव्यसंग्रहातील तैलचित्रे शुभा गोखले यांनी रेखाटली आहेत. चेहरा न दिसणारी, पाठमोरी, पाय पोटाशी घेऊन वेदनेत बसलेली अतिशय वेगळ्या प्रकारची ही तैलचित्रे स्त्रीत्वाचे विविध कंगोरे व्यक्त करतात. डोक्याखाली हात घेऊन निजलेली व्यक्ती मनात अनेक भावकल्लोळ निर्माण करते. स्वत्वाचा शोध तर आहेच; पण हा प्रवास, या प्रवासातली प्रक्रिया हीच कविता होते. 'सांजभयाच्या साजणी' या कवितासंग्रहातील कवितेचे विषय जरी आपण पाहिले तरी एक गोष्ट नक्की की, त्यांच्या मनातले सगळे विषय, भावना, पंथ, प्रेरणा, प्रवृत्ती, प्रभाव स्वत्वाचा प्रवास करताना झालेली दमछाक आणि अनेक आत्मभाव व्यक्त करणाऱ्या विषयांतून चिंतनाचा एक वेगळा प्रवास या कविता-संग्रहात दिसतो. या प्रत्येक कवितांना शीर्षक आहे. प्रत्येक कविता वेगळी आहे.




पौराणिक कथा, व्यक्तींचे सगळ्यात जास्त संदर्भ व प्रतिमा या कवितासंग्रहात आल्या आहे. ऊर्मिला, सीता, हिडिंबा, शूर्पणखा, सुदामा, कृष्ण, राघव, मिथिला, कंस, देवकी तसेच अनेक जागतिक स्तरावरचे तत्त्ववेत्ते, कवी, नेते, डॉ. छेदी जगन, डॉ. बर्धन, मानवेंद्र रॉय, जवाहरलाल नेहरू, लेनिन, टॉट्स्की, मायकोव्हस्की, रिल्के, ज्ञानेश्वरी, तुकाराम, संत, पंत, पंथ या सगळ्यांतून आलेली चिंतनावस्था, या चिंतनातून आलेली अनेकार्थ सूचकता हे या काव्यसंग्रहाचे वैशिष्ट्य आहे असे म्हणू शकतो.

या कवितासंग्रहात कवितांमध्ये आलेले दृश्यानुभव, नादानुभव, अर्थानुभव या तीनही अनुभवांच्या मागे असलेला जीवनानुभव अमूर्त अशा प्रतिमांमधून, शब्दांमधून व्यक्त होतो.

◆ *राग अनावर झाल्यावर माणूस जसा बेभान होऊन बोलतो तसाच काहीसा प्रकार या संग्रहाबाबत आहे असे आपण म्हणू शकतो.* ◆

**सांजभयाच्या साजणी**

*माझा प्राचीन साऊलधर्म : काव्यधर्म,*
*नव्याने उजळून दाखविणाऱ्या एका(च)*
*सांजभयाच्या साजणीस...*

**आत्मनिवेदन**

*निवेदन, मग ते आत्मनिवेदन असू देत, फार ताणले तर ते वर्णनाच्या लवचिकवादी कचाट्यात सापडण्याची शक्यता असते.*

*आणि तरीही इथे मी, अगदी सुरुवातीच्या अर्धकच्च्या (की अर्धपिकल्या?) कवितांचा समावेश केलेला आहे. माझ्या निर्मितिप्रतिक्रियेत, शब्दांसकट मी चोळामोळा होताना, क्वचित एखाद्या दिव्य क्षणाच्या अनुभूतीचा लळा, त्याच्या अंतरिचा मूल्यभाव तपासण्याचा निर्दयी मोह, मला खरोखरच नाकारावासा वाटत नाहीये!*

*तरीही माझे आत्मनिवेदन आहेच की-*
*देवापाशी दैव। दैवापाशी भाव।*
*भावावर घाव। घालू नये।*
*कवितेत शब्द। होता चोळामोळा ।*
*देवांचाही लळा। लावू।*
*मी;*
*ग्रेस*

**ऋणनिर्देश**

*'संध्याकाळच्या कविता'पासून तर या 'सांजभयाच्या साजणी'पर्यंत; माझ्या सोबतीला आहेत- रामदास भटकळ! माझ्या दृष्टीने म्हणाल तर, नव्य नव्या प्रतिमांच्या साहाय्याने जुनी जुनी कृतज्ञता व्यक्त करीत जाणे, एवढाच एक काव्यधर्म उरतो, तोच माझा जीवनधर्म आहे असे मला*

*वाटते!*

*‘सांजभयाच्या साजणी’ची संहिता केशव जोशी ह्यांनी तयार केली.*

*शुभा गोखले ह्यांची अलीकडील तैलचित्रे पाहण्याचा योग आला तेव्हा, माझ्या ‘सांजभयाच्या साजणी’ या कवितासंग्रहातील अनुभवविश्वाला, ही चित्रे बऱ्याच प्रमाणात समांतर जातात अशी मला जाणीव झाली. त्यांना मी विनंती केल्यावर, त्यांनी त्यांची ही चित्रे प्रस्तुत संग्रहासाठी वापरण्याची मला अनुमती दिली. त्या चित्रांची अनुरूप मांडणी आणि सजावट विवेक रानडे ह्यांनी केली आहे. त्यांचे कृतज्ञतापूर्वक स्मरण मी इथे करतो आहे.*

*मी;*
*ग्रेस*

*The challenger who failed to stand*
*that trial so constantly rejected*
*goes forth upright and completed.*
*Conquests no longer fascinate.*
*His growth consists in being defeated*
*by something ever-gradlier great.*

✶ ✶ ✶

## हृदयाचा हिय्या

*मंत्रात भारली झाडी*
*पक्ष्यांचे छंदहि कलते;*
*पाण्याला स्पर्श न करता*
*हे कोण चालले सरिते?*
*जळकंप सलिल रत्नांचे*
*वेशीहून आली धूळ;*
*हृदयाचा हिय्या म्हणजे*
*हृदयाच्या आतिल पीळ!*

*पुरुषाचे दुःख फुलेना*
*पाळणा हालवी मुलगी;*

*काठावर प्रियकर अंध*
*पापणीत मिटतो सलगी।*

*बांधाच नदीचा ऐसा*
*मग घाटहि चंदनगवळी!*
*सोन्याचा गळ तोडाया*
*उसळून बुडे मासोळी!*

*उकलते नदीचे वृत्त*
*तर दोन गणांची मात्रा;*
*सरणातहि दंग चिता का?*
*गात्रातून तुटता यात्रा?*

* * *

**आत्म्याचा आकांत**

*वाळूवर स्वप्न पसरले*
*लागली तांबडी रेती;*
*पणतीही चिन्मय कलिका*
*थेंबांची मोजत गळती*

*वाहणे नदीची किमया*
*उगमाचा साजण लहरी;*
*युद्धात मिसळला कृष्ण*
*तू लय भिंगर गांधारी!*

*हाकांना नेईल कोण?*
*खडकातून बोले वारा;*
*तेव्हाच ललाटी सरिते!*
*तू गोंदून घेना तारा!*

*कावळा नदीचा पिंड*
*तृष्णेत उतरला पांथ;*
*शरीराच्या काहुरवेळा*
*तो आत्म्याचा आकांत!*

*याराला भेटायला*
*चालली नदीच्या वेगी;*
*ढळताना पदर दिसे तिज*
*पाण्यावर निजला जोगी...*

## माझ्या चतुर्विध पुरुषार्थांची सारणी

*My gifts are not for mortal men,*
*neither for immortal women.*
*They are for that sufee fakir, who*
*drinks*
*nectar like poision,*
*and that too like a solitary star,*
*at the migrated evening of this*
*departing century...*

## माझा देव

*या नदीच्या गोंदणटिंबांनी निसर्गसत्तेचा*
*भयभार स्वीकारावा :*
*आणि मगच अंतराळ उल्कांनी तोलून धरावा*
*तारामंडळाचा धावा!*
*फुलामुलांनी, अंगणदारात थेट आणून उभे*
*करावे उत्खननी शहरः*
*जसे जसे ढळत जातील सूर्य तसे तसे*
*उचलावे चंद्रताऱ्यांचे प्रहर!*

★ ★ ★

## माझी आई : सुमित्रा

*परसदाराला चंदनाच्या डहाळीची सुगंधी कडी*
*लावून*
*ती केव्हाच निघाली बेभानः*
*प्रियकरांचे, यारांचे निर्घृण वध, तर डोळी त्यांचेच*
*धगधगते बेमुर्वत इमान!*
*संध्या मलूल, पांगळी, अस्तसूर्याच्या भाराने*
*वाकलेली :*

✶ ✶ ✶

## वेलांटी

*दार तोडून अंगण*
*नाही मागत पिंपळ;*
*प्रतिबिंबाचा आरसा*
*नको ठेवूस जवळ.*

*झाडाझाडांच्या झाडीत*
*दिसे सावज देखणे;*
*सूर्य थकून मागतो*
*अस्तचलाचे उखाणे.*

*बाई स्तनात खुपसे*
*जीभ कापुनिया वाणी;*
*तीर्थजळांच्या डोहात*
*यावे उगमाचे पाणी...*

*पायझांजार पाचोळा*
*देव पुरतो ललाटी;*
*एका हुंकारात शब्द*
*होतो गर्भाची वेलांटी*

✶ ✶ ✶

**जी.ए. : वन फॉर ॲरो**
**: टू फॉर सॉरो**
**: थ्री फॉर ट्वायलाइट**

*परसातल्या चिंब बिंबातली*
*काजव्यांची निळाईतली आर्द्रता*
*हले डोह पणतीप्रमाणे नदीचा,*
*नदीची निनादातली सांगता...*

*भिक्षेत, झोळीत, श्वासांत, भासांत*
*हृदयार्त घाईत संध्या दिसे;*
*किती पारध्यांनी किती पारव्यांची*
*ललाटांवरी माळली रे पिसे...*

*कशा आवराव्या कशा सावराव्या*
*भुलीभारणीच्या मनाच्या मुभा;*
*मुक्या धर्मशाळांतल्या राउळांच्या*
*तुझे मंत्र उच्चारणाऱ्या सभा?*

✶ ✶ ✶

**वीज**

*शुभंकराची हिरवी झाडी.*
*डोंगर पाणी खोल दरी;*
*दिवेलागणीमध्ये जळते*
*महावस्त्रांची कनक जरी*

*पाण्यालाही निनाद अगणित*
*खडकसांधणीतला झरा;*
*तृष्णेमधली तहान फुलवित*
*कशास येतो पुन्हा घरा?*

*घरट्यावरती डोके ठेवून*
*उडे पाखरू अधांतरी;*
*पिंपळपाने झेलून घेती*
*वाऱ्यामधल्याही लहरी.*

*ढगाढगांनी पार बनविले*
*झाड रुजविले गर्द निळे;*
*त्याच ढगांच्या हृदयामध्ये*
*तिच्या कुशीतिल वीज जळे.*

✶ ✶ ✶

## पंथाच्या कविता

### कबीर पंथ

*आईच्या हृदयफुलाचे*
*अंगाई दुखरे बीज;*
*शृंगार उतरल्यावरही*
*सजतात सतीचे साज.*

*गुणगुणते साऊलसंध्या*
*कबिराचे सोलिव गाणे;*
*कंठाचे गहिवर पिळती*
*शैलीच्या आतिल रडणे,*

*वाकून उचलता माती*
*पृथ्वीचे स्तर हादरती;*
*पाचोळा जाहीर करतो*
*झाडांची नातीगोती.*

✶ ✶ ✶

### ज्ञानेश्वरीय वर्षा

*कोणी चाळवला घनू?*
*डंख आभाळाला झाला;*

*ढग ओटीत भरता*
*तिथे वारा ओशाळला...*
*कोणी हलविला घनु?*
*स्पर्श स्पर्शाने झाकला;*
*देह पारदर्शनाने*
*लख्ख हिरकणी झाला...*

*कोणी नादावला घनु*
*झाडाझुडपांच्या गावी;*
*वीज नाही अधेमध्ये*
*तरी झांजरते ओवी...*

*कोणी ओळखिला घनु?*
*अडवुनिया पालखी;*
*पाण्यापावसाच्या आधी*
*नदी स्फुंदते सारखी...*

*कोणी मंतरला घनु?*
*गेले कावळे उडून;*
*वर्षा शकुनाची वर्षा*
*त्यांच्या पंखात झाकुन...*

*कोण देशीचा हा धनु?*
*सारे मागतो अंगण;*
*गाठी चोळीच्याही गाठी*
*तीक्ष्ण चोचीचाच व्रण...*

✶ ✶ ✶

**परिशिष्ट पहिले : अत्तरांचे ध्वनी**

*नक्षत्रांच्या कुळामध्ये*
*स्वातीसाठी शेज;*

*ढगांच्याही हुंदक्यांना*
*गोंजारते वीज.*

*पाचोळाही चिंब झाला*
*डोंगराच्या रानी;*
*फुलांनाही जाणवती*
*अत्तरांचे ध्वनी...*

*बांगड्यांच्या तुकड्यांनी*
*तडकला डोह;*
*कासाराच्या हातामध्ये*
*बांगडीचा दाह...*

*पाणियाच्या डोळियात*
*मोतियाचा थेंब;*
*पावसाने पावसाचा*
*मोजू नये थेंब!*

✶ ✶ ✶

**परिशिष्ट दुसरे : साऊल!**

*बदाम झाडे रिमझिम झेलित*
*हिरव्या पानांवरचे पाणी;*
*हिरवे पोपट त्यात मिसळले*
*चोच तेवढी लाल विराणी...*

*झाडांच्या पानांतून एकटं*
*लाल पान चोचीला धरते;*
*भेद तेवढा मिटवित जाता*
*आतिल पिवळे पान थबकते!*

*भेदांच्या रंगातून झरती*
*रंगांधांची भिरभिर गावे;*

*बदाम हिरवे चोचीत घेऊन*
*भुर्र..ऽऽऽ उडाले हिरवे रावे...*

*सुन्न बदामी चेहऱ्यावरती*
*चित्रव्यथेची उरते धून;*
*साऊल म्हणजे उधळित उधळण*
*धम्मक पिवळे हळदी ऊन...*

✶ ✶ ✶

**गणमात्रांचे गणगोत**

*सावलीस उचलुन धरता*
*देहाची लय थरथरते;*
*तळपायी डंखुन जाते*
*गवताचे झरझर पाते!*

*कवितेतून तीक्ष्ण फुलांचा*
*आंदोलत येतो वारा;*
*संताच्या सरणामधल्या*
*उल्कांच्या स्तंभित तारा...*

*बावरे भयाने पाणी*
*दो थडीत गजबज दाटे;*
*साधूंची सुन्न वसाहत*
*खिंडीत अडकली वाटे...*


*की सतीच कर्पूरगौरा?*
*करुणेवर धरिते हात;*
*माहेर मातृकांचे की*
*(गण)मात्रांचे गणगोत?*

✶ ✶ ✶

◆ *'माझ्या वृत्तरचना आणि लिरिक्स की काय म्हणतात ते - मी जाणीवपूर्वक 'राजपुत्र आणि डार्लिंग'मध्ये घेतलेल्या नाहीत.* ◆

### राजपुत्र आणि डार्लिंग

या कवितासंग्रहाचे शीर्षकच नेहमीप्रमाणे वेगळे आहे. ग्रेस यांच्या शैलीचा विचार केला तर राजपुत्र आणि डार्लिंग या शीर्षकातून एक कथा किंवा कहाणी उलगडली की, काय प्रश्न मनात येतो.




सुभाष अवचट यांनी केलेले मुखपृष्ठ त्यातली रंगसंगती खूप भिन्न आहे. मुखपृष्ठावरील राजपुत्र (मुकुट धारण केलेला) आणि डार्लिंग आपल्याला इजिप्त किंवा आदिवासी किंवा ग्रीक किंवा रोमन अशा प्राचीन संस्कृतीतील वाटतात.

आतली चित्रे सूचकपणे राजा, राजपुत्र, राजेपण मिरवणाऱ्या गोष्टी (तलवार, मोजडी, मुकुट, घोडा इ.) या कवितांमध्ये, प्रवाहात सातत्य दर्शवणाऱ्या वाटतात.

या कवितेचे वेगळेपण स्वतः ग्रेस यांनी प्रस्तावनेत सांगितले आहे. ''माझ्या वृत्तरचना आणि लिरिक्स की काय म्हणतात ते - मी जाणीवपूर्वक 'राजपुत्र आणि डार्लिंग'मध्ये घेतलेल्या नाहीत. त्या मोकळ्याच आहेत. त्यामुळे 'राजपुत्र आणि डार्लिंग'च्या अनुभवाची पातळी एकसंध राहू शकेल अशी माझी कल्पना आहे. इतर कविताही याच अनुभवव्यूहात शिरणाऱ्या आहेत असे मला वाटते.''

या काव्यसंग्रहात राजपुत्राला संबोधित करणाऱ्या १ ते १८ कविता आहेत. यालाच जोडून असलेल्या परिशिष्टात वेगवेगळी शीर्षके असलेल्या

***‘राजपुत्र आणि डार्लिंग’ या कवितासंग्रहाचे शीर्षकच नेहमीप्रमाणे वेगळे आहे. ग्रेस यांच्या शैलीचा विचार केला तर राजपुत्र आणि डार्लिंग या शीर्षकातून एक कथा किंवा कहाणी उलगडली की, काय प्रश्न मनात येतो.***

६ कविता आहेत. ‘संध्यामठ’ कवितेपासून एकूण १४ कविता आहेत. शेवटी ‘डार्लिंग’ या शीर्षकात समाविष्ट होणाऱ्या एकूण २८ कविता.

**राजपुत्र आणि डार्लिंग**

*।। केशवसुतांनी काव्यनिर्मितीतील मुख्य घटकांवर*
*श्रेष्ठ कविता लिहून, कवीच्या व्यक्तिमत्त्वाची*
*स्वानुभूत, व्रतस्थ कुंडली*
*मांडली.*
*मर्ढेकरांनी कवीच्या व्यक्तित्वातील पवित्र-गंभीर*
*सौंदर्यतत्त्वाचे, अनुभवजन्य स्रोत आपल्या*
*काव्यसरणीतून झरते केलेत;*
*तर कवीच्या व्यक्तित्वाची*
*अंतर्रचना आणि आत्म्याची अंतर्साल,*
*भेदक आत्मनिष्ठेने, इथे-राजपुत्र आणि डार्लिंगमध्ये,*
*काव्यात्मक दुर्बोधतेचा भव्य भार पेलत ग्रेस*
*तोलताहेत...*
*कलावंताच्या व्यक्तित्वातील एकान्त आणि*
*निर्मितिनाशाच्या भयात आंदोलित होत*
*जाणारी सतेज निर्मितिशीलता, इथे मुखर*
*झालेली पाहून थक्क व्हायला होते-*
*आणि ‘गुलाब वाळवण्याच्या गोष्टी’ पाशी*
*जीवही हंबरू लागतो...।।*

◆ ***काळाचे प्रहर, शहरी वातावरण, तळपणारा वैशाख वणवा, देवदास पारोची दुःखद प्रेमकथा, नदीवरचा प्रदेश, संध्याकाळची हुरहुर असे अनेक 'साहित्यविषय' बनले आहेत.*** ◆

**अर्पणपत्र**

*जी.ए. कुलकर्णींला,*

*ज्यांनी मला मित्र मानले.*

*'संध्याकाळच्या कविता' हा माझा पहिला कवितासंग्रह. रामदास भटकळने काढला. परवा त्याची दुसरी आवृत्ती निघाली. त्यात न आलेल्या आणि नंतरच्या (१९७० पर्यंतच्या) कविता 'चंद्रमाधवीच्या प्रदेशा'त आहेत. 'राजपुत्र आणि डार्लिंग' पूर्वी हा संग्रह बाहेर यायला हवा होता. मग क्रम नीट लागला असता. लवकरच रामदास 'चंद्रमाधवीचे प्रदेश' आणि 'चर्चबेल' हे ललित लेखांचे पुस्तक छापतोय.*

*आपले सहोदर अगोदरच जन्माला येऊन गेलेले असतात; काही आपल्या काळात सापडतात. त्यांच्या संकेतांनी आपल्या व्यक्तित्वाची जशी पुनर्घटना होते, तसेच आपल्या अनुभवाला नवे संकेतही मिळतात. माझ्यापुरती ही प्रक्रिया 'राजपुत्र आणि डार्लिंग'मध्ये फार ठळकपणे घडून आली असावी असा माझा अंदाज आहे. काही वस्तू, घटना, चिन्हे, प्रतिमा, प्रतीके आणि संकेत माझ्या कवितेत सतत येतच राहणार. आयुष्यभर. इंग्रजी काव्यावतरणे 'राजपुत्रात' एमिली ब्राँटेची आणि इतरत्र एमिली डिकन्सन् ची आहेत.*

*सुभाषने चित्रे काढलीत. स्वतःचे पुस्तक समजून. ही समरसता माझ्या लेखी फार मोठी आहे. माझा मित्र आहे तो. अमेयचे मनोहर पिंपळापुरे आणि श्रीपाद मुंजे हे माझ्या पिढीचे लोक. आम्ही मित्र आहोत सगळे. एक विशिष्ट ध्येय मनाशी बाळगून ही जिद्दीची पोरे या क्षेत्रात उतरली आहेत. मी त्यांच्याबरोबर आहे. केवळ हे पुस्तक त्यांना देऊनच नव्हे - एरवीही.*

*मी*

*ग्रेस*

*दि. १.१.१९७४*

***माझ्यापुरती ही प्रक्रिया 'राजपुत्र आणि डार्लिंग'मध्ये फार ठळकपणे घडून आली असावी असा माझा अंदाज आहे. काही वस्तू, घटना, चिन्हे, प्रतिमा, प्रतीके आणि संकेत माझ्या कवितेत सतत येतच राहणार.***

*।। माझे सर्व ग्रंथ 'पॉप्युलर'च्याच पडवीत यावेत*
*म्हणून 'राजपुत्र आणि डार्लिंग'ची*
*दुसरी आवृत्ती*
*रामदासने काढलीय.*
*आभार-ऋणाच्या पलीकडची*
*ही जाण आहे, असे मी*
*मानतो. असे मानताना*
*माझी कृतज्ञताच उजळतेय*
*पुन्हा ।।*
*मी*
*ग्रेस*
*१९९५*

*हाकांच्या संबंधी मला काही सांगता येणार नाही.*
*गेल्या कित्येक दिवसांपासून मी डायरी*
*लिहिणे सोडून दिले आहे.*
*माझा पायघोळ सनातन झगा, तुटलेल्या भिवया*
*पृथ्वीचा एकेक अवयव हातात घेऊन मी सध्या*
*वाचीत आहे डोस्टॉव्हस्की;*
*त्याची मृत्युघरातील टिपणे...*

❖❖❖

## घरातल्या कविता

### कॅक्ट्सची टेप

*हॉस्पिट्लमध्ये संध्याकाळ येते.*
*फक्त महत्त्वाची ऑपरेशन्स संपवून ये...*
*लीली परत येते.*
*तिचा पाचोळ्यासारखा मनस्वी थकवा*
*दरवळत असतो;*
*केवढ्या कठोर आर्जवाने मी उदास*
*आहे.*
*हॉस्पिटलसारखा विसावा नाही.*
*सावकाश मोजून घ्या लीलीच्या*
*मुखोद्गत बरगड्या...*
*तिच्या हातात सहज मावून येतात*
*बांगड्या.*
*मला खूप महत्त्वाची कविता लिहायची आहे.*

✶ ✶ ✶

*हे फुलांचे ढीग पाहून मला आठवते इथल्याच*
*एका पहाडी स्त्रीची कहाणी;*
*अतीव कोमल सुरांचे अगणित तंतू*
*अदृश्य हाताने पिंजून काढावेत तशी.*
*खडकाच्या ओंजळीतील पाण्याचा गार वारा*
*हुंगण्यासाठी ती काठावर येऊन निजली,*
*नकळत तिच्या पापण्या जड*
*झाल्यात आकाशभाराने; वाकल्यात, मिटल्यात.*
*आणि शहामृगांचा उन्मत्त कळप तिच्या*
*पिकलेल्या इंद्रियांना तुडवून पुढे*
*निघून गेला...*
*या दिव्यातले तेल कधी संपेल?*

*कधी गडद होईल हा गंधार?*
*कधी सडतील, हे फुलांचे शुभ्र, कोवळे ढीग डार्लिंग?*

✶ ✶ ✶

## बुक्क्याचे गोंधळी...

*आले बुक्क्याचे गोंधळी*
*तळ्याकाळीचा संसार;*
*झाडे झेलती झोपाळे*
*त्यात वाजताती चाळ...*

*कळवळली साऊल*
*वक्षस्थळाची चाळणी;*
*सुन्न मोकाट सोसते*
*तिच्या गोंदणाची गाणी...*

*हेच गोंधळी बुक्क्याचे*
*लाल मागती गुलाल;*
*अंबा ठेव पालखीत*
*रक्तदानाचा सवाल...*

*त्यात बुक्क्याचा गोंधळी*
*त्याची दंतकथा न्यारी;*
*कमंडलूच्या चोचीने*
*गिळे पाणियाची झारी...*

*फक्त कोवळी होऊन*
*नाही उजळत काया;*
*बाई! चोचीत घेऊन*
*पाहा पाखरांची माया...*

*एका गोंदणवार्तेत*
*शिरे मस्तकात आग;*
*त्याचे वृषण डागले*
*अग्निघोष पखवाज...*

*वार्ता कानोकानी जाता*
*निघे साऊल वेगाने;*
*पुलाखालच्या बाईशी*
*झोंबू पाहते जोमाने!*

*त्यांच्या किंकाळीच्या मागे*
*वन्ही हंबरते गाय;*
*नदी पाण्यात बुडता*
*रडे नावाड्याची माय...*

*गंजे लोखंडाची साल*
*तसा देहाचा ऐवज;*
*बाई सुईच्या टोकाने*
*धरे आपुले सावज...*

*झाले बुक्क्याचे गोंधळी*
*काळे कसाब ठिक्कर*
*त्यांच्या बाया हाकलती*
*ताटाखालचे मांजर...*

✶ ✶ ✶

## पाऊससमजावणी

*साध्याभोळ्या बाईलाही*
*कधी म्हणू नये राणी;*
*डोळ्याखालच्या डोहात*
*नको गुणगुण गाणी...*

*ढग भांडती तंडती*
*मनावर का घ्यायचे?*
*सौदामिनीने कशाला*
*फूल घट्ट खोचायचे?*

*मेघा आलंबन नाही*
*एका थेंबाच्याही साठी;*
*तरी पाऊस भरतो*
*ढगांचीच बाळवाटी...*

*आला आषाढ पाहून*
*मोरगावी गेल्या मुली;*
*लाल निखाऱ्यात मग्न*
*गावागावातल्या चुली...*

*पैगंबराच्या प्रार्थना*
*खिन्न अजानात येती;*
*पुन्हा देऊळवातींना*
*नको ओलेतीची सक्ती...*

*पाय मोरांचे कुरूप*
*नको रागिणींना बोल;*
*बाई! पावसाच्या आधी*
*उठे विश्वात कल्लोळ...*

❖❖❖

## चर्चबेल (१९७४)

'चर्चबेल' हा ग्रेस यांचा पहिला ललितसंग्रह १९७४ ला प्रकाशित झाला. या संग्रहात रवींद्रनाथ टागोरांचे एक अवतरण आले असून हा संग्रह अवलिया ताजुद्दीन आणि संगीतकार रोशन यांना समर्पित केला आहे. रवींद्रनाथ टागोर यांच्या अवतरणातील भाव त्यांच्या संपूर्ण ललित-संग्रहात उमटलेले दिसतात. 'चर्चबेल'मध्ये चित्रकारासारख्या आखीव-रेखीव चित्रांप्रमाणे आखीव लेखन दिसते. ललितनिबंधात आत्मचरित्र/आत्मकथन नसते. परंतु या ललित गद्यात ग्रेस यांच्या वैयक्तिक आयुष्यातील तपशील, आजू-बाजूचे वातावरण संग्रहात येते. वेल्होर, नागपूर येथील अनेक संदर्भ, त्यांची पत्नी लीला तिचे आजारपण, मुलांचे संदर्भ अनेक वेळा येतात. परंतु पूर्णपणे आत्मचरित्रात्मक गोष्टींसंबंधातले इतर तपशील पुरवणे ग्रेस यांनी टाळले आहे. वास्तवातले संदर्भ येतात पण तात्पुरते. ग्रेस यांच्या या ललित निबंधात अनेक गोष्टी अनुभवाच्या आकृतीच्या भोवतीचे लौकिक तपशील, हेतूपूर्वक बाजूला ठेवलेले आहेत.




एकूण छत्तीस लेखांतून केरळ, वेल्लोर, हॉस्पिटल, मिथिला आणि माधव यांनी मिळून केलेला स्वयंपाक, लीलाच्या (पत्नीच्या) आठवणी, निसर्गचित्र, कवितांची अवतरणे, भावनांचा कल्लोळ या साऱ्या गोष्टी सहजपणे येतात. या ललित निबंधाचे स्वरूप लघुनिबंधासारखे आहे. पुढच्या ललित-निबंधसंग्रहात निबंधाचा आकार वाढत गेलेला दिसतो. 'चर्चबेल' या ललित-निबंधांचा आकार मात्र अतिशय सुटसुटीत आणि नेमका परिणामकारक वाटतो.

ग्रेस यांच्या प्रतिभेच्या कक्षेत वासना आणि मृत्यू या दोन गोष्टी

केंद्रस्थानी असलेल्या दिसतात. यातून येणारे दुःख, शोक याचे आवर्तन दिसते. याविषयी खूप आकर्षण असल्याचे दिसते.

'चर्चबेल'च्या पहिल्याच निबंधात पहिल्याच वाक्यात नेपाली एलीस, नारायणी आणि फादर ग्रीन यांच्या मृत्यूचे उल्लेख येतात आणि हे मृत्यू नैसर्गिकही नाहीत. अपघात, आत्मघात, हत्या या प्रकाराच्या जीवनाच्या अखेरीचे उल्लेख या लेखांमधून पुष्कळ वेळा येतात.

'चर्चबेल'ची शीर्षके अल्पाक्षरी आहेत. शीर्षकातच व्यक्तींच्या नोंदी येतात उदा. नेपालीचे गॉड प्रॉमिस, रोशनची गाणी, डब्ल्यू. एस. लँडोरची कविता, नूरजहाँ आणि रिल्के या शीर्षकात व्यक्ती केंद्रस्थानी असल्या तरी त्यांच्या मांडणीत त्या त्या व्यक्तीशी येणारा ऋणानुबंध आणि त्या त्या व्यक्तीशी असलेले त्यांचे अंतरंग नाते व्यक्त होताना दिसते.

* * *

**मृगजळाचे बांधकाम (२००३)**

मृगजळ म्हणजे वाळवंटात निर्माण होणारा चकवा, पाण्याचा आभास. त्याचे बांधकाम फक्त निसर्गच करू शकतो.

ग्रेस यांच्या ललितबंधाचे रूप शब्दात पकडता येत नाही. परंतु सुभाष अवचट यांनी आपल्या चित्रात ते पकडले आहे. मृगजळाचे बांधकाम या पुस्तकाचे मुखपृष्ठ आणि आतली चित्रे त्यांची आहेत. कागदावर रंग ओतून तो कागद हातात धरून हलवावा म्हणजे रंगातून आकार आणि रेषा यांचे यादृच्छिक बंध तयार होतात, रूपे तयार होतात. प्रत्येक वेळी वेगवेगळे आणि विलक्षण. ग्रेस यांच्या संपूर्ण लेखनाची आकृती कशी घडत असेल ते त्यांनी अचूक पकडले आहे.

अर्पणपत्रिका; वेगळा ऋणनिर्देश आणि ऋणानुबंधात रामदास भटकळ आणि सुभाष अवचट यांची जी नावे आहेत ती नावेही कल्पकतेने लिहिलेली आहेत. आत्मनिवेदनही अतिशय वेगळे आहे.

स्वतःच्या निर्मितीप्रक्रियेचा शोध घेण्याच्या ऊर्मीतून निर्माण झालेले हे ललितबंध स्वतःच्याच आवर्तात गरगरत निर्मितीचा आदिबिंदू शोधू पाहतात.

ग्रेस यांच्या या निबंधात निर्मिती आणि निर्मिती-प्रक्रियेचे चिंतन मांडले आहे. या निमित्ताने त्यांनी देशी-विदेशी साहित्यिक, कलावंतांच्या कलाकृतींविषयी विचार आणि अभिप्राय व्यक्त केले आहेत.




मराठी संतकवी, आधुनिक कवींतील अवतरणे, युरोपियन साहित्यिक, चित्रकार, तत्त्ववेत्ते कलाकृतींसंबंधी विवेचन केले आहे.

गदिमा, बालकवी, कुसुमाग्रज, संत ज्ञानेश्वर, कबीर, मीरा, चक्रधर स्वामी, गुरुदेव रवींद्रनाथ टागोर, रिल्के फ्रॉस्ट, मिर्झा गालिब, मर्ढेकर, एमिली टॉलस्टॉय, बॉदलेयर इत्यादींबरोबर पिकासो, व्हॉन गॉगसारख्या चित्रकारांच्या कलाकृतींबद्दल विवेचन येते. कधी अवतरणे येतात. कवी ग्रेस कधी कधी स्वतःच्या कवितेची अवतरणेही देतात.

या ललित गद्याचे स्वरूप आत्मसंवादाचे आहे. निसर्गाच्या कालचक्रातील, ऋतुबदलातील घटक आणि अनवट वर्णनशैली बुद्धीचा, मनाचा ताबा घेते. निसर्गसत्ता, जीवनसत्ता याबरोबर कलांची सौंदर्यसत्ता हा मुद्दा विशेष सिद्धान्तरूपाने मांडला आहे.

## मृगजळाचे बांधकाममधील अंश

*द्रौपदी सजविते चिंधी जशी कृष्णकरंगळीसाठी पाहिला. तो मात्र निद्राजागृतीच्या झोक्यांवर झुलत झुलत म्हणाला - मोकाट, सोकाट कुरणात गाई कुणाच्याही चरू देत रेऽऽऽ! बासरीचे वेळूबन आणि परिसराचा दावणखांब, शेणगोठा माझा आणि तुझाच तर आहे ना? शिवाय गाईची एक मेख, त्यांच्या डोळ्यांतला डोह, डोहातला आब जाणतोयस तू? अस्सा असतो तो -*

***गाई तशा निनादी त्या बासरीत रमती***
***पण धूळ प्राक्तनाची प्राणामनात भरती...***

*वर मी जी कुंडली, अतार्किकाची कास धरून, मॅजिक पोएट्रीच्या कलाने, निमित्तानेही मांडली तस्सच हा आताचा पाऊसकाळ माझ्या पडवीला घेरून आलाय. काळा रंग भेदक, भयाचा पण तो सावलीची सोबतही नष्ट करून टाकतो म्हणून समभावी मायेचा! पाऊस काळातील किमयावंत, विजेचा धनी, सौदामिनीचा प्रियकर याच रंगाच्या रसनेत सदैव हिंडत असतो; आणि आपले तमाम प्रहर सूर्यास्ताच्या साक्षीने गोंजारत असतो...*

*या पाऊसकाळापासूनचे हे संवत्सर! माझे संवत्सर, माझ्या पेशी, माझ्या रक्तवाहिन्या, माझी हाडे, माझ्या प्राणांची पालखी, तिची पालखी, तिची त्वचा आणि त्वचेची साल हे अख्खेच - हे संवत्सर, त्याच्या मगदुराप्रमाणे निर्मितीच्या हाकेतील अंतर्दाबाच्या नक्षत्रटोचणीनुसार, इंचाइंचाने नष्ट करीत जाणार!*

*केशवसुत असे म्हणतात-*

***दिले हिरण्मय***
***हाती मृण्मय***
***हा हतविनिमय...***

*इंचइंच मरणाची, विदग्ध, सरणातुर हाक देत देत ते दृश्य-अदृश्याच्या इप्सितासाठी हा ज्ञानसंबोध कैफाच्या मदांध तंद्रीत हरवून.*


***त्रिखंड हिंडुनि धुंडितसे***
***परि न हरपले***
***ते गवसे...***

*असा कंठशोष करीत ते फारकतीचे फकीर होऊन जातात... या क्रमाने, अनुक्रमाने, अंगाईपणाने, इंचइंच मरणाने माझे माहेरपण पैलतटाला जाईल का असा प्रश्न मला पडतोय. बहुधा नाहीच जाणार. केशवसुती वहिवाटीला मी उत्तुंग आदराने कुर्निसात करीत असतो तरी हा पराभव, निर्मितीच्या क्षेत्रातला पराभव, माझ्यातला निर्माता, बीजधारणेचे आवश्यक गृहीतक म्हणूनही गृहीत धरायला सुतराम तयार नाहीच नाही. हे सर्व क्षणाचे, क्षणजीवी, क्षणभंगुर तर मग निर्मितीतली अजरामरता,*

*सार्वभौमत्व, साकल्याचा प्रदेश की काय, तो तरी नेमका कोणता? हे तर कळलेच पाहिजे यार! त्याचा एखादा कण, अंश गवसलाच पाहिजे. नाहीतर एमिली ब्राँटे, टॉलस्टॉय, शेक्सपीयर, मायकेल एंजलो, व्हॅनगॉग, झ्वाइग, ज्ञानेश्वर, तुकाराम यांची जशी धडगत नाही, तशीच या क्षेत्रातील त्यांची रसडोळसांनी स्वीकारलेली ठाकुरकीही अबाधित राहू शकत नाही.*

✶ ✶ ✶

## वाऱ्याने हलते रान (२००८)




या पुस्तकाचे मुखपृष्ठ व आतली तैलचित्रे शुभा गोखले यांनी रेखाटली आहेत. अर्पणपत्रिका, प्रस्तावना, ऋणनिर्देश सारे काही निसर्ग तैलचित्राच्या पार्श्वभूमीवर अधिक लक्षवेधी ठरते.

एकूण २५ लेखांची शीर्षके अतिशय दीर्घ आहेत. ह्या ललित निबंधाचा विशेष हाच की; या पुस्तकात अगम्य, अनाकलनीय असे काहीच नाही. जे जे जसजसे हाती लागले (चिंतनातून) ते ते तसे तसे लिहिले. वीणा आलासे यांनी मलपृष्ठावर जे निरीक्षण नोंदवले आहे त्यातही त्यांनी हा विशेष नोंदवला आहे. त्या म्हणतात, ''हे ललितबंध कधी पुराणकथांच्या, कधी दंतकथांच्या, कधी लोककथांच्या, कधी परीकथांच्या, कधी स्त्रीत्वाच्या आलंबन विभावांच्या, तर कधी स्मरणकथांच्या किंवा अगदी प्रहर व ऋतूंच्याही अनुषंगाने, अखेर निर्मिती व निर्मितिप्रक्रिया या घटनांचाच वेध घेताना दिसतात. पण या घटना, मुळातूनच कायम नवे नवे उखाणे घालत हुलकावण्या देणाऱ्या असल्यामुळे, या पाठलागाला ना आदी ना अंत... वेधाचीच अनंत वेधशाळा ही कवी ग्रेस ह्यांचीच.''

या ललित निबंधांमधील ओघवती शैली ही परिपक्व आणि चिंतनगर्भ विचारातून आलेली आहे. या निबंधात सीता, साऊल, द्रौपदी, गांधारी, कृष्ण इ. पौराणिक पात्रे येतातच, छोटे छोटे वातावरण निर्मिती करणारे नैसर्गिक घटक येतात आणि ग्रेस यांची आत्ममग्न स्थिती, वास्तव याचे एक सुरेख मिश्रण आपल्या समोर आणतात आणि तेही सहजच.

या ललित निबंधाच्या पुस्तकातील लेख हे मोठ्या आणि रेखीव रांगोळ्यांसारखे आहेत. अवकाश मोठे, रंग वेगवेगळे, रंगांची रसमिसळ, रंगसंगती, रेषा, रेषांचा आखीवपणा, या रंगरेषांची जुळवाजुळव आणि या पूर्ण रांगोळीचा अनुभव याप्रमाणे ग्रेस यांच्या ललितबंधाचा रूपबंध घडवणारे सर्व घटक सुटे सुटे येत नाहीत. ते सर्व घटक एका अलौकिक, अबोध अशा पातळीवर मिसळले जातात. या मिश्रणाला कुठलेही तर्क आपण लावू शकत नाही...

*''वाऱ्याने हलते रान... It is not an extension of Mrigajalache Bandhkam. (only?)!*

*इथल्या ललितबंधात ग्रेस ह्यांना मृगजळाच्या काही विलक्षण, सुलक्षण डोहांचा तळसुगावा लागतोय. या डोहांच्या भिन्न भिन्न स्तरांवरील खोलींचा अदमास घेताना, ग्रेस ह्यांना निर्मितिप्रक्रियेच्या, निर्मितिविश्वातील, स्त्रीच्या देहाची साधना, तिच्या स्वप्नांची स्वप्ननिष्ठा, तिच्या वासनेची विश्वव्यापी करुणा आणि या सर्वांनाच मध्येच, अकस्मात भेदून जाणारे तिचे अद्भुत, अकस्मात, साक्षात्कारी क्रौर्य ह्यांची बिंब प्रतिबिंब, रूपे या मृगजळाच्या डोहात हलताना दिसतात; त्यावेळी ग्रेस यांच्या सभोवतीचा परिसर, वाऱ्याने हलत्या रानाप्रमाणे लहरत लहरत दूरगामी होत जातो.*

*डोहाचे मुख छोटेसे, विहिरीसारखे असते. नदीच्या प्रारंभ उगमापेक्षा, त्याचा रचनाबंध थोडा वेगळा, पण प्रवृत्ती दोघांचीही एकच. इथे विस्तार नाही. कसला विस्तार? कुठला विस्तार? No beginning had ever came out yet, with an extension, within the extension... गंमत अशी की खोल जाणे; खोलीत जाणे आणि खोलीच्या तळाशी गेल्यावर पुन्हा खोलीचेच विस्तार झालेले दिसतात!! म्हणून भूमीच्या, पृथ्वीच्या खाली, पाताळखोलीत पाणीच पाणी असते... ते खोलीच्या*

*तळाचे की खोलीच्या विस्ताराचे? अगदी वाळवंटे खणून काढलीत तरीही ते सृजनाच्या कोणत्या टप्प्यात कळेल हे सांगता येत नाही, तीच कदाचित खोलीची पृथगात्मता असू शकते. पुन्हा इथेही डोळे लयभिंगरीने बावरतात, पुन्हा प्रश्न, पण खोलीचाच!*

***डोळ्यांआतील बाहुली***
***कशी दिसते दृष्टीला?***
***झाडाझाडांत पाचोळा***
***कुरवाळितो फुलाला?***

*ग्रेस, 'वाऱ्याने हलते रान'मधील ललितबंधाच्या सारणीला, इथे कादंबरिकेच्या चिमुकल्या पात्रव्यूहाच्या निर्मितिप्रणालीचे, अनवट कलम रुजवून देण्याचा जेव्हा प्रयत्न करतात तेव्हा, ते त्यांच्या कवितेप्रमाणेच; पुनःपुन्हा आपल्या आत्मकेंद्राच्या पाठीपोटाशी असलेल्या, विश्वकेंद्राच्या अनुभूतीचे करुणामूल्य, कलामूल्यच शोधण्याचा प्रयत्न करीत असतात.*

***डोळियांतली बाहुली***
***मागेपुढे लळामेळ;***
***तिथे वेचतो पाचोळा***
***फुलझाडांचा सोहळा...***

*असेच काहीसे; असेच काहीतरी!''*
*मी,*
*ग्रेस*

**अर्पणपत्र**

*हे तुमचे तुम्हांलाच*
*अर्पण करतोय...*
*वाऱ्याने*
*हलते रान,*
*या आभासाच्या अलीकडे,*
*भासाच्या पलीकडे,*
*वाऱ्याला गाठता*
*येईल की काय...?*

*असो.*
*द्वैत्याच्या अंतर्नादातील विलापांची*
*चीड येणे स्वाभाविक आहे!*
*पण चिडवत असाल तर*
*मी (ही) या ओळींपाशी*
*निमूट :*
*मयख़ाने की बात न कर*
*मुझसे वाइज़;*
*आना जाना तेरा भी है,*
*मेरा भी है...*
*मी ग्रेस*
*दि. ११ सप्टेंबर, २००७*
अस्तपर्वाच्या प्रारंभकाळी...

**ऋणनिर्देश**

*या रानात, शुभा गोखले ह्यांनी*
*पूर्वीच चितारून ठेवलेली, त्यांची*
*झाडे, उजागर करण्याची मला*
*परवानगी दिली, त्याबद्दल मी त्यांचा*
*ऋणी आहे; मुखपृष्ठही त्यांचेच आहे.*
*विवेक रानडे ह्यांनी पुस्तकाची*
*स्नेहापोटी मांडणी केलीय,*
*त्याच कुळातले साहाय्य*
*कुमार गोखले यांचेही*
*संजय राऊत, केशव जोशी,*
*तीर्थराज कापगते आणि*
*दिवाकर मोहिनी*
*ह्यांचे ऋण आहेच.*
*वीणा आलासे ह्यांचे मूल्यगर्भ सहकार्य,*
*आभारापलीकडचे.* ‘चंद्रमाधवी’पासून

*तर, प्रस्तुत ग्रंथापर्यंतचे, Blurbs*
*त्यांचेच आहेत.*
*रामदास भटकळ तर*
*सुरुवातीपासूनच माझ्या तथाकथित*
*लेखनात मांडामांड करीत आहेत.*
*- ग्रेस*

## वाऱ्याने हलते रानमधील उतारे

*गळ्यांमध्ये आपली अणकुचीदार नखांची बोटे कचकचून रुतवावीत असे तिला वाटले. इतकी दीर्घ रुतवावीत की गळा कुस्करून, कुस्करून त्याची भुकटीच होईल. म्हणजे गोंदण क्रियेची मंत्रधून गळ्यातून उमलणारच नाही. गोंदणाची टोचणी आणि गोंदणमंत्राची धून यांवर केवळ आपल्या गोऱ्या कातडीचा पहिला आणि शेवटचा निसर्गदत्त अधिकार आहे, अशी सुमित्रेची बलवान जीवेच्छा होती. सुमित्रेच्या विद्वेषी पावलांचा वेग वाढला.*

*या गोंदणखेळात आपल्याशिवाय दुसरे कुणीही असू नये. पहिल्या स्वप्नाच्या रुजवणीनंतर दुसरे स्वप्न गोंदणगावात रुजायलाच नको. आपणच पहिले आणि शेवटचे राहायला हवे. शरीर आत्म्याच्या जिवलग मिठीप्रमाणे स्वप्नभंगाचे आणि स्वप्नडंखाचे कुठल्याही सूक्ष्मातिसूक्ष्म आकाराचे अंतर सुमित्रेला नको होते. पौर्णिमा-अमावास्येचे प्रमाद-प्रहर जुळवून सुमित्रा राधामंथरेच्या समोर विशिष्ट देहांच्या जागा गोंदवून घ्यायची. तिच्या पश्चात् राधामंथरेनी गोंदविलेली शरीरे सुमित्रेच्या अदमासात कशी बरे उगवणार? या तालात, नादात सुमित्रेची पावले झरझर पडू लागली. आणि राधामंथरच्या गोंदणगीताचे सूर तिच्या कानांत घुसू लागले.*

*रंग उधाणाच्या सरी*
*बाई! घरंदाज पोरी;*
*केशरांच्या कातडीत*
*सुई झाली गोरीमोरी...*
*गंगाप्रवाहांचे नीळ*

*त्यांच्या डोळ्यांत काजळ;*
*तरी टोचणीची सुई*
*होइ दुःखाने व्याकूळ...*

*आज कित्येक वर्षांनी, अशी माझ्या बालपणाची उलथापालथ होते आणि केशव नेमका त्याच वेळी म्हणतोय की, बघा! हिवाळा शेवटी पानगळीच्या वैभवाचे स्थिर झालाच ना!*

*Suddenly I felt a chill in my brain and*
*Shivered from inside and felt like crying.*

*पण माझ्या गळ्यातून आवंढा निघत नव्हता आणि तोंडातून शब्द बाहेर फुटत नव्हता. मी कोणत्या आकांतविभोर पाचोळ्याच्या राशीतून हा संध्याभीतीचा प्रवेश पाहतो आहे, असा भास झाला.*

*हे भय नेहमीच्या सरावाचे नव्हते. याची जातकुळी - Is it reminding me of my basic position? My basic position is to retain my embryo pattern...*

*आत्ता मला साऊलचे पहिल्या स्वप्नाच्या पायाभरणीसाठी गोंदविलेले हात आणि नादावलेली तिची विषण्ण पावले दिसू लागलीत.*

*जर एखादा क्षण अकस्मात परिपूर्ण होऊन तुमच्यासमोर आला तर? साक्षात्कारासारखा? तर त्याला परिपूर्ण क्षणाचेच उत्तर द्यायला नको का? परिपूर्ण क्षणाचे उत्तर म्हणजे साऊलने रचलेल्या तिच्या जातिवंत, जिवंत पहिल्या स्वप्नाची जपणूक करणे. इथे दीर्घ, प्रदीर्घ युगांची भाषा कशी बरे वापरता येईल? कदाचित असे परिपूर्ण क्षण सांधूनच युगांची सृजनभाषा निर्माण होत असली पाहिजे!*

*केशवने हिवाळा स्थापित झाल्याची राजमुद्रा अग्नीतून भाजून काढलेल्या नाण्याप्रमाणे माझ्या तळहातावर जपून धरली... तरीच आत्ताशा माझ्या फोडणीत मोहरी, साध्या मंदजाळ आचेनेही तडफडून तडकते. तिच्यात परतून काढलेला भाताचा सुजाण घासही माझ्या गळ्यात अडकून पडतो...*

*आत्ता तर संध्याकाळ खरोखरच सद्गदित होऊन आली आहे. भय वाटते की, गोंदणगावच्या वृद्ध पिंपळाकडून हिवाळ्याचा एखादा जुनाट संदेश घेऊन गोंदणप्रौढांचे नवरे माझ्या दिशेने तर येत नाहीत ना?*

*सृजनभाषा गवसली तर तेवढ्याने खरोखरच सृजनाचा ठाव घेता येतो? मग गोंदण सुऱ्यांचा टिंब टिंब रक्तथेंबी जखमांच्यासाठी चटावलेल्या या देहाचे करायचे तरी काय?*

*कपाळावर चंद्रकोर, पाठीवर मोरपिसारा, स्तनांच्या पोकळीमध्ये स्वस्तिक आणि मस्तकाच्या ललाटबिंदूवर बहिरीससाण्याच्या मादीची खूण ही राधामंथरेच्या गोंदणांची चित्रे. रंग एकच हिरवा, तेजस्वी, कंच. हळदुलांना पाऊल ठेवायला सुईच्या टिंबाएवढीही जागा नाही. कारण देहच केशरगौर. फक्त गौदणाकृतीचे तसूभरही विघटन होऊ नये म्हणून औषधोपचारासाठी हळदशेकणीची फुंकर.*

*कुठलाही सृजनगंध लाभलेला अनुभव पाठीचा नसतो आणि पोटाचा नसतो. तो मुळात निरंगी आणि निराकार असतो. त्याला एखाद्या झाडाला फांद्या फुटाव्यात, सजीव गर्भाला अवयव फुटावेत त्याप्रमाणे त्या अनुभवाचे चित्र, कृती आणि आकारबंधामध्ये रूपांतर होत जाते आणि हा निरंगी अनुभव स्वतःच आकाराचा निराकार स्वामी आहे, असा भास होऊ लागतो.*

*सुमित्रेची आठवण इथे होते ती अशासाठी की, ती गोंदणतंत्राचे आणि गोंदणमंत्राचे तसूभरही विघटन होऊ देत नाही. ते झाले असे वाटते न वाटते तोच, तिच्या सर्व देहकळांचे सुईभिजणीच्या तीव्र विषांमध्ये रूपांतर होते. साऊलच्या पहिल्या स्वप्नाचा स्वीकार राधामंथरेच्या गोंदणमंत्राने करता येईल का? साऊलच्या पायाभरणीच्या स्वप्नात माझ्या असण्याचा बेमालूम साक्षात्कार तिला झाल्यासारखा वाटतो.*

*डोह या शब्दाचा उच्चारच आपल्याबरोबर भीतीच्या अर्थाची अनंत वलये घेऊन येतो. या दोन अक्षरी शब्दात अगदी वाच्यार्थापाठीच केवढी गूढ, भयाण, अर्थवत्ता दडलेली आहे. तरी अजून या शब्दाच्या हृदयात कोणतीही प्रतिमा कोरलेली नाही. लक्षणेची प्रतिमा, ती जर आपण कोरली तर व्यंग्यार्थाचे एक भयसंपन्न अंतराळच्या अंतराळ आपुल्या वीतभर अंगणात नाचू लागते, निनादू लागते. हे सृजनाचे, पेरणीचे उगमातले निनाद, एकदा आपण समजून घेतले शहाणपणाने, तर मग सगळेच कसे सुरळीत होऊन जाते. डोहाची सखोल गरगर ती भीती, तिच्या परिणामाचाच फक्त आपण विचार करतो. कारण तो*

*परिणाम आपल्यावर होत असतो. डोहाच्या विक्राळ भीतीचा परिणाम, या परिणामात आपले सर्वस्व गुंगून गेले असते. त्यामुळे डोहाच्या स्वतःच्या आकृतिबंधाचा स्वभाव आपल्याला कळतच नाही, त्याचे सूचन इतके तरल आणि सूक्ष्म असते की, ते मेंदूच्या कवटीवर आदळून तसेच परत जाते-डोहाकडेच. त्यासाठी आपण स्वतःच्याच अलवार हातांनी गोंदणाच्या सुयांची छोटी छोटी भोके आपल्या मेंदूला पाडून ठेवायची नसतात का? अशी छिद्रे असली तर डोह गुणगुणत, हलकेच या छिद्रांतून तुमच्या मेंदूच्या अनंत पाकळ्यांवर पसरत जातो. डोहाची एक स्वतःची स्वयंपूर्ण, स्वयंभू, सार्वभौम, नैतिक नीतिमत्ता आहेच की नाही?*

*डोह हळूच सांगतो-*

*माझ्या आत खोल डोकावून पहा. मी तुला कधीही माझ्या भयाण खोलीची भोवळ येऊ देणार नाही. मी तुझे समग्र व्यक्तित्व माझ्या रोखाने कलते करून घेईन आणि तुला माझ्यातील आत्मनाशाची भोवळ, कधीच देणार नाही. डोहात डोकावणाऱ्यांना, भोवळीपासून अभयदान देणारा, डोहाचा हा अलौकिक, विलक्षण आकांत, कलावंताशिवाय दुसरा कोणीही जाणत नाही. षड्रिपूंच्या दोन टोकांवरच्या, दिलाशाच्या मोहनमाळेतील चरणमेळ, हरवलेले काचतुकड्यांचे मणी हेच ना? म्हणून मी साऊलला सांगतो-*

*घन जमतिल तेव्हा जमतिल, मोकळे केस तू सोड;*
*परसात तुझ्या तरि काय? निष्पर्ण सुरूचे खोड!*

*सुरूच्या देखण्या डौलदार वृक्षाला, खोडाच्या रूपात मांडलेले, माझे सृजनशीलत्व आवडलेले नसणार! पण त्यामुळे मी दुसरेही सूत्र, तिच्या सुईमध्ये ओवून देतो. कारण या गोंदणप्रौढेने, अगोदरच आपल्या मेंदूची, प्राथमिक तयारी करून ठेवलेली आहेच, आपल्या गोंदणसुईने. म्हणून म्हणायचे-*

*पाऊस पाखरे जेव्हा*
*देशांतर करुनी येतिल;*
*मग असे सुखाने सजणे*
*मेंदूहुन रंगीत खोल...*

*आपल्यावर ज्यावेळी भय, भीती साम्राज्य गाजवीत असते, त्यावेळी*

*आपल्या चोळामोळा झालेल्या अस्तित्वाला, दृष्टान्त कहाण्यांची, दृष्टान्त कथांची केवढी नितांत गरज भासत असते. ही दृष्टान्तरूपके, कहाण्या, कथा जोपर्यंत आपण मानवी दुःखाला समांतर म्हणून वापरत नाही, तोपर्यंत आपण आपल्या स्वार्थी दुःखाच्या तन्मयतंद्रीतून बाहेरच पडत नाही, म्हणून साऊलसाठी हा दृष्टान्त.*

*आटल्या नदीच्या पात्री*
*हा उभा एकटा बगळा;*
*घन करुणाघन होताना*
*वाळूचा भांग कपाळा...*

*हे मला मान्य आहे, साऊलचे केस प्रदीर्घ नसले तरी ते घनदाट आहेतच. त्यात जर तिच्या कपाळावर वाळूचा भांग पाडला तर, या भांगेत सृजनाची चिमुकली तुळस उगवणार ना? पण तोपर्यंत साऊलने काय करावे? थोडा धीर धरून, आपल्या सहिष्णुतेला हलक्या गोंदणाची चिमुकली कलाटणी देऊ नये काय?*

*मृगजळ ऊन स्वप्नांचे*
*हे कलतेकलते पसरे;*
*पेशींचे तोवरि माझ्या*
*तू माळ वाळले गजरे...*

*मागधीच्या अविश्रांत आठवणींनी माझा जीव, या काहिलीत खरोखरच चोळामोळा होऊ लागलाय. पण ज्यावेळी जीव चोळामोळा होत असतो, त्याच वेळी मेंदूच्या कवटीला केलेल्या सूक्ष्म गोंदणदारांनी, तो आपसूक गोळाही होत असतो. निसर्गाची, शरीराची, देवाची ही केवढी आपल्यावर कृपा आहे? वारा येईल, कधी तो येतोय असा भास होईल, कधी त्या भासातून समीरसत्याची एखादी शीळही ऐकू येईल, त्यावेळी मात्र साऊलने सावध राहून, भ्रम आणि सत्याच्या सीमेवरचा संधिप्रकाश, तपासून घेतलाच पाहिजे.*

*घन जमतिल तेव्हा जमतिल*
*वाऱ्याचे अलगुज खोटे;*
*हे दुःख मिठीचे तोवर*
*हाडांना घेऊन पेटे...*

*डोहांनी, डोहातून डोकावणाऱ्यांना, भोवळीपासून मुक्त केल्याची, एक दुरातली चांदीची घंटा, केवळ मला ऐकूच येत नाही तर, जी.ए. म्हणतात त्याप्रमाणे, त्या चांदीच्या घंटेचा मंदमधुर सुवासही मला ओळखता येतो. कसे?*

★ ★ ★

## कावळे उडाले स्वामी (२०१०)

ग्रेस यांचे अतिशय वेगळे आणि मराठी साहित्यविश्वात ज्या पुस्तकाच्या मुखपृष्ठाने खळबळ माजवली असे पुस्तक म्हणजे 'कावळे उडाले स्वामी' हे पुस्तक २०१० साली प्रकाशित झाले. या पुस्तकाच्या मुखपृष्ठावरील अमूर्त आकृतिबंध, त्यातली लाल आणि तपकिरी रंगसंगती, चेहरा वाटेल




अशी वृषभाची आकृती, चंद्र (हिरव्या रंगातील) पांढऱ्या रेषा, काळे चक्र, भौमितिक आकृतिबंध यांच्या मिश्रणातून एक अमूर्त आकृतिबंध आपल्याला साक्ष देतो. पुस्तकातही अनेक आकृतिबंध रेखाटले आहेत. हे आकृतिबंध मनात रेंगाळतात आणि अस्वस्थ करतात. या ललित निबंध पुस्तकातील निबंधही वाचकाला अस्वस्थ करतात. 'बेभान होणे म्हणजे काय?' याचा अनुभव वाचकास येतो. सहन करून करून, सतत मनात साठवून, घटनांचा अर्थ लावून, एखाद्या गोष्टीवर चिंतन करून थांबून ठेवलेले विचार अचानक मोकळे होतात आणि झरझर झरझर कागदावर शब्दमाध्यमातून उतरतात. यात कुठलीही तर्कसंगती दिसत नाही. भाषेला मर्यादा नसते...

'कावळा' ही प्रतिमा अनेक वेळेला येते. ती अनेक रूपात, आकृतिबंधात आविष्कृत होताना दिसते. कदाचित या सगळ्या गोष्टी

बेभानपणे, उत्स्फूर्तपणे विषयाची मर्यादा न पाळता आल्याने हे निबंध आपल्याला (वाचकाला) काहीसे दुर्बोध वाटू शकतात. राग अनावर झाल्यावर माणूस जसा बेभान होऊन बोलतो तसाच प्रकार काहीसा या संग्रहाबाबत आहे असे आपण म्हणू शकतो. या पुस्तकाची अर्पणपत्रिका भारती मंगेशकरांना समर्पित केली असून, संस्मरणात बाळ ठाकूर, संजय राऊत, वीणा आलासे, केशव जोशी, चंद्रमोहन कुलकर्णी आणि कुमार गोखले यांचा निर्देश केला आहे.

या ललित निबंध पुस्तकात मराठी भाषाशैली वेगळ्या ग्रेसमयी रूपात येते. मराठीप्रमाणे हिंदी, इंग्रजी, उर्दू भाषाही तितक्याच हुकमतीने वापरलेल्या दिसतात. या निबंधात आपल्याला उत्स्फूर्त आवेग दिसतो. अनेक विलक्षण प्रतिमांचा संचच्या संच एकत्रितपणे या निबंधातून मांडलेला दिसतो. यात कुठलाही विषय त्याज्य नाही. या प्रतिमांचा उद्गम अनेक घटनांशी, आठवणींशी भिडलेला असतो. त्यांचा अर्थनिर्णय करताना, समजावून घेताना आपण मंत्रमुग्ध होतो. आपल्याला समजते पण समजलेले सांगता येत नाही, व्यक्त करता येत नाही. पूर्ण पुस्तक वाचल्यावर आपण सुन्न होतो, भारावून जातो, वेगळ्याच जगात असतो...

## कावळे : रहस्यशरणाची दैवी लिपी

*माझ्या खांद्यावरची फडफडती पणती, मुठीतले पाखरू आणि माथ्यावरची भिरभिरती व्याकूळ घार कुठेकुठे तरी निखळल्याची माझी जाण आता थोर होऊ लागलीय. रहस्यशरणाच्या दैवी लिपीची, रिल्केच्या तळहातावर उभी असलेली दीपस्तंभाची फिकट मंद प्रभा, माझ्या चेहऱ्यावरच्या सुरकुत्या कुरवाळीत आहे मायेने! आणि षड्रिपूंचे संधिकालातील प्रज्ञावैभव, हृदयस्पंदांचे लाघव माझ्या करुणेची देखभाल करीत आहे. दुर्बोधता रहस्यशरणाची दैवी लिपी असेल, तर ती थोडी थोडी प्रतिभेच्या दिग्दर्शनाने मला वाचता येत असली (च) पाहिजे. प्रत्येक अस्थिपंजावर मेहरबान होऊन चिकटवला गेलेला त्वचेचा, कातडीचा मुखवटा, पुनःपुन्हा प्राचीन गुंफांच्या अतीतातच शोधला पाहिजे. मानवाच्या भूतकाळातून, त्याच्या इतिहासचक्रातून या मार्गाच्या अनंत वाटा जातात. त्यांतील बहुतेक न्यूनगंडांच्या भयतापाने पछाडलेल्या*

*आहेतच. फक्त सौंदर्यसत्तेची परिपूर्ण वाटच त्याचा मागोवा घेऊ शकते. परमेश्वर आणि पापी, वेश्या आणि व्रती, गारदी आणि पारधी यांच्या डोळ्यातील संस्कृतिनिरपेक्षतेचा शोध, रहस्यशरणाची दैवी लिपी वाचता आल्याशिवाय घेताच येत नाही. निरागस, निष्पाप मानवी संस्कृतीच्या पुनर्बांधणीसाठी टी.एस. इलियेटने रहस्यशरणाची ही दैवी लिपी अश्शी वाचलीय. हिपोपोटॅमस आणि चर्च यांच्या भीषण, भाषिक, विलक्षण प्रतिमासंघातून*

*flesh and blood is weak and frail,*
*Susceptible to nervous shock;*
*while the true chruch can neaver fail*
*for it is based upon a rock*
*At mating time the hippo's voice*
*Betrays inflexions hoarse and odd*
*But every week we hear rejoice*
*The chruch, at being one with God.*

*अनेक जीवनरहस्यांना मी इथे गाठून, विनीतभावाने नव्हे तर सन्मानशीलानेच, शरण जातोय. निर्मितिविश्वातील कलावंताच्या पुरुषार्थ सिद्धीची ही वाट मला, जी रिल्केत सापडली, तीच माझ्या आनुवंशकुळाची ओळख म्हणून! आता औदुंबराच्या पक्षाघाताचे भय बाळगण्याचे कारण नाही आणि कावळ्यांच्या झुंडीचा धाकही! तो कधीच बाळगला नाही म्हणून तर श्रीज्ञानेश्वरांनी कावळ्याला, फक्त कावळ्यालाच शकुनसाम्राज्याचं एकमेव शिलेदार म्हणून मुक्रर केलंय! पैल तो गे काऊ कोकताहे। शकुन गे माये सांगताहे। ही हस्ते, परहस्ते पोचती करण्याची संदेशवाहक हाक नाहीय - तर तो कावळ्याच्या भावविश्वातील नक्षत्र उलटताना, श्रीज्ञानेश्वरांच्या कंठातून, रहस्यशरणाच्या दैवी लिपीला फुटलेला हुंदका आहे!!*

**अर्पणपत्र**

*माझ्या कॅन्सरशी*
*सौजन्यपूर्वक हातमिळवणी करून,*

*मला रूपसुखाने,*
*आपल्या दारात उभे करून,*
*माझ्यावरून भाकरतुकडा ओवाळून,*
*त्याचे औक्षण, वडपारंबीच्या दिशेने*
*प्रक्षेपित करणाऱ्या, भारती मंगेशकर*
*ह्यांच्या पडवीतून, कावळे उडाले स्वामीऽऽऽ*

*दिनांक ६ मे ते ११ जून २००८*
*वटपौर्णिमा*
*दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, पुणे*

*I take the word and go over it*
*as though it were nothing more than*
*a human shape,*
*its arrangements awe me and I find*
*my way through each variation*
*in the spoken word*
*I utter and I am and without*
*speaking I approach*
*the limit of words and the silence*

*निर्मिती, कलावंत आणि निर्मितीतील अनुभव, यांतून निर्माण होणारे कलारूप, ज्या ज्या वेळी मी मांडण्याचा आणि आठवण्याचा प्रयत्न करतो त्या त्या वेळी, मला या अनुभवाची दुसरी मांडणीही आठवून जाते. ती मांडणी मी अशी मांडून ठेवलेली आहे-*

*चल जाऊ सत्त्वशिलेला*
*उतरले पठारामागे*
*झाडीत चांदणे झरणे;*
*सजतात अशीही गावे*
*उतरणीप्रमाणे झाडे*
*बीजात मिसण्यासाठी*
*या इथेच ढगमंत्राची*

*झरझरत्या डोंगरग्रामी*
*पाऊस कुळातील स्वामी*
*हा सत्त्वशिलेचा योग*
*पृथ्वीच्या मागोमाग...*
*विणतात फुलांचे जीव*
*तू तुझी कळीही ठेव!*
*सापडते यांना हाक*

*देहास फासण्यासाठी कुंडीतील घेती राख*
*भयग्रस्त कमंडलूमधले खुपसती रत्न बुबुळात*
*सौदामिनी संभव म्हणजे संभोगसतीची रात्र...*

*आजचे हृदयनाथाचे हंबरडा फोडून गाणे, मला व्हिन्सेंट गॉगीन आणि साऊलच्या जिवंत समाधीच्या कंगोऱ्यावर आणून आदळते आहे.*

*डावा हात मोकळा आहे माझा. पण उजव्या हातातील कमंडलूतील पाणी घेऊन, माझ्याच तोंडावर शिंपडल्याशिवाय माझी मूर्च्छा जाणार नाही. हे निश्चित! तोपर्यंत गालिबची ओळ गुणगुणावी-*

*एक तमाशा हुआ। गिल्ला न हुआ...*

## कावळे उडाले स्वामी

*आठवण होते. आतून तो कळवळतो. ही मैत्रीण निद्रेच्या गुंगीसाठी अफूच्या गोळ्यांची मात्रा घेऊ लागते. त्यावेळी एक दुखऱ्या आकांताची किनार रेखित तो ओरडतो - My loving friend, instead of that, put this letter on your eyes, to serve them as eyelids.*

*वर वर पाहता, अस्तित्ववादाची झूल अंगावर वागविणारा हा महाकाय पुरुष रिल्के, कुठे तरी रोमांचवादाच्या चिमुकल्या, नखरेल मिठीत सापडला की काय, असे वाटू लागते. पण ते तसे नसते. कंदिलाची ज्योत मंद होते असा भास होऊन, अडगळीतील एखाद्या पक्ष्याने हळूच कंदिलासमोर येऊन उभे राहावे, असे आपल्याला वाटते न वाटते, तोच त्या पक्ष्याने आपले पंख फडकावून, कुठल्या तरी देशांतराच्या खंडात हरवलेली, आपली स्वतःचीच सुनसान भरारी, त्या धुरकट कंदिलाच्या प्रकाशात पिळून दाखवावी असे काहीसे रिल्केचे होत असावे.*

*I have adopted a poet! हे परशुरामीचे दत्तविधान, क्षणाक्षणाला नव्या सनातनाचे प्राचीन हुंकार माझ्या गळ्यात कोरत असते. परशुरामीच्या दत्तविधानातून, निषेध नकारांच्या दंडकांनी मी तिच्या विधानातील निर्मितीच्या आकलनाच्या, संभाव्य, असंभाव्य शक्यतांचा कौल घेत असतो. अभिमन्यू मास्तरांच्या वारकरी गळ्यातून, आतल्या आत फिरणाऱ्या त्यांच्या आवाजाचा लंबक, कितीही चिडला आणि बिथरला तरी त्याच्या आवाजाची वारकरी धून, धारकरी धून होत*

*नाही. पण आपल्या रखेलीच्या चरित्राचा निळाकाळा ढग, ज्या ज्या वेळी त्याच्या डोळ्यांसमोर तरंगून येतो, त्या त्या वेळी अभिमन्यू मास्तराच्या डोळ्यांसमोर, त्या ढगांच्या पालाणातून अनेक विजा चमकू लागतात! राजघराण्याच्या मिरवणुकीतून, त्यांच्याकडे येऊन पडलेली गंजलेली तलवार, रखेलीची गर्दन कापण्यासाठी क्रौर्याचा पुकारा करते, तर हजामत करणारा त्यांचा व्यावसायिक वस्तरा, रखेलीला अकस्मात मुक्ती देण्यासाठी, तिच्या गळ्यावर कृतज्ञ भावाने घिरट्या घालतो! In fact, Abhimanyu master wants to be grateful to his razor, but the rusted sword compells him to cut the neck of his keep. कृतज्ञ क्षणांची करुणा आणि बदफैली क्षणांचे क्रौर्य, यांतून अभिमन्यू मास्तरांची सुटका होतच नाही. मध्ये थोडासा अंतरायाचा विसावा मिळतो. त्यात अभिमन्यू मास्तर आपल्या गळ्यातून, रामकृष्णहरी या वारकरी मंत्राची मिरवणूक काढीत जातात.*

*हस्ताच्या नक्षत्राच्या तडाख्याने ज्याप्रमाणे परशुरामीच्या सज्जावरील बागेची थोडीबहुत पडझड होते; त्याचप्रमाणे कावळ्याच्या पाण्यासाठी ठेवलेली जलमात्रांची खापरी, तीही विस्कळीत झालेली असते. आपल्या सभोवतालचा हा विस्कटलेला तपशील सावरणे तिला आवश्यक असते. पण त्याच वेळी, आपल्या मेंदूतील तत्त्वांची, तत्त्वदर्शनी बुद्धीची करुणा अनावरपणे उसळून येते. ती गुणगुणते की गणमात्रांना कुरवाळते, याचा पुरेपूर उलगडा न करता, एक छोटासा पद्यबंध समोर येऊन ठाकतो -*

*घनवृत्त ढगातून सुटले गंऽऽ,*
*आढ्यावर अंबर भरले...*

*अंबराचा तपशील विशाल आणि व्यापक असला तरी परशुरामीने त्याला आपल्या घराच्या आढ्यावर आणून उभे केले आहे. राहिला प्रश्न नियमित पाऊसकाळाच्या घनवृत्ताचा! पाऊसकाळाला निरोप देण्याच्या घटकसीमेवर हस्तनक्षत्र अकस्मातपणे उभे झाले आणि त्यात, परशुरामीच्या बाह्य तपशिलाचा परिसर असा विस्कटून गेला... तत्त्वतपशिलांची अशी विस्कटता सावरताना, रिल्के अदृश्याच्या मागे मागे जातो आणि दृश्याला पुढे पुढे रेटत घेऊन जातो. पण रिल्केची ही शैलीविद्या त्यालाही अनेक ठिकाणी दगा देते. त्यावेळी तो कनवाळूपणाने*

*की करुणेने, हे नीट सांगता येणार नाही, पण आपल्या जिवलगाला अफूच्या गोळीऐवजी आपले शब्दजांभळे ओलसर पत्र, आपल्या प्रेयसीला डोळ्यांवर, पापण्यांसारखे झाकून घ्यायला सांगतो.*

### स्वप्नवेचणीचा शिलालेख : कावळे

*हिवाळ्यातील कुठल्याही संध्याकाळी माझा जीव जागेवर नसतो. एका अनामिक गार शिरशिरीने मंद झोपाळ्यासारखा हलत असतो. वरखाली होणाऱ्या अंतराच्यामध्ये जी एक छोटीशी भेग पडली असते तिथे तो अनेकदा ठणकत असतो. झोपाळ्यांची अर्धवर्तुळाकृती आंदोलित लय मलाही आवडते; विशेषतः मेंदूच्या प्रत्येक पाकळीला गुंगवणारी तिची तऱ्हा मलाही प्रिय आहेच. परंतु हिवाळी संध्येचा झोका असा कुठे असतो? नखाएवढ्या घरट्याच्या सुईएवढ्या झरोक्यातून डोकवून जरी पाहिले तरी धुक्याच्या खोल दरीत जाऊन आपण पडू असे सारखे वाटत राहते. या संध्यामायेला कोणताही साजणमंत्र दिलासा देऊ शकत नाही. की तिचे काळीजगोंदणतंत्र आत्मसात करू शकत नाही. लहानपणी हिवाळी संध्येच्या निष्पर्ण पारावर गळ्याला नख रोवून आईने माझे घेतलेले चुंबन कधीचेच पुसट झाले आहे. देहाच्या उत्तरकालीन भयाण सापळ्यावर मात्र तिने कोरलेली माझी प्रतिमा जशीच्या तशीच आहे. भिक्षा मागितली म्हणून स्वामी भिक्षेकरी का होतो?*

*हिवाळ्यात येणाऱ्या संध्याकाळच्या टपालाचीही मला फार भीती वाटते. जी.एं.ची बहुतेक पत्रे अशीच आली आहेत आणि आता मिथिलेलाही अशीच येऊ लागली आहेत... प्रत्येक पाकिटात आपल्या अंजनवाटीतले चिमूटभर काजळ त्यांनी ठेवून तर दिले नसेल ना अशी शंका अजूनही मला येत राहते. ओंजळीत मावणाऱ्या आध्यात्मिक भीतीचाही कडेलोट होऊ शकतो; परंतु हिवाळी संध्येच्या भीतीला मुळाचे तळ आणि डोईचे आभाळ नसते आणि म्हणूनच तिच्यापासून सुटका करून नाही घेता येते.*

*या नाताळातील संध्याकाळीही एक परदेशी पत्र आले आहे. विधवा मैत्रिणीचे. माझ्या पत्राला तिने उत्तर दिले होते. नोटपेपरचा रंग मंद, धुरकट, राखी डाव्या कोपऱ्यात तिरप्या टाईपात छापलेले एक अवतरण-*

*If an illusion is so beautiful, then think of the beauty*

behind it.

- सध्या माझ्या दारावर हिवाळी बहर येऊन ठेपले आहेत. कावळ्यांचे कळप समोरच्या वृक्षावर स्थिरावू लागले आहेत- Really a great and sensible bird- असे माझे विधवा मैत्रिणीला पत्र गेले होते. तिने काही ओळींतून कावळ्याचा शहाणपणा वाखाणला होता आणि I am not worried about the burst, but I am worried about the leakage असा आपल्या पत्राचा सुंदर शेवट केला होता. शेवटच्या ओळीने मी थोडासा चरकलो. स्फोटाचे भय नाही. झिरपणीचे भय? पण हे कावळ्यांच्या संदर्भात कसे लागू करावे याचा मला पेच पडला, दोन ओळीही आठवल्या.

तटस्थ हे अहंत हे
कुठे न वाकती जरा
प्रमाद पिंडस्पर्श तो
मला न वाटतो खरा

कावळ्यांच्या भीतीचे, भयाचे स्फोट आणि झिरपणी असे वर्गीकरण नाही करता येत. त्यांचे भय हिवाळी संध्येच्या जातीचेच आहे, जीवनाच्या एका मरणोत्तर धार्मिक रीतीशी त्याचा असा सरळसोट संबंध जोडून दिल्यामुळे त्याला आपण वर्गीकरणात बसविण्याचा प्रयत्न करतो. खरे तर कावळा इथेच खऱ्या अर्थाने मिस्टिक होतो. एवढेच नव्हे; कावळा हा मिस्टिसिझम अस्थींच्या पलीकडेही जाऊ देत नाही- अलीकडेही राहू देत नाही-मॅजिक पोएट्रीमधल्या अदृष्ट भीतीचा अंकुश तो सदैव या मिस्टिसिझमवर ठेवतो. ही शैली फार जीवघेणी असेल पण तिच्या ठायी ठायी केवढे मोठे बळकट शहाणपण समावले आहे! 'स्नेक' बोलपटातला सर्प-संशोधक सर्पांना कुरवाळीत कुरवाळीत व्हॉल्ट व्हिटमनची 'ॲनिमल्स' ही कविता का म्हणतो ते मला आता नीट उमगले आहे.

आमची एक आत्या होती. टपोऱ्या डोळ्यांची. गव्हाळी रंगाची. फार देखणी. लग्न होताच तिला वेड लागले. मग ती माहेरीच राहू लागली. विवाहित मंडळी आपआपल्या खोल्यांत झोपायला जायची. वृद्ध आणि सावत्र आईची मुले तळमजल्यावर मोठ्या पडवीत झोपायची. तिचे वेड एकाच प्रकारचे होते. ती ऐन मध्यरात्री उठून हळूहळू उशी उसवायची

*आणि उशीतला कापूस खाऊ लागायची! मी पांघरुणातून डोळे उघडून पाहत असे. तिची नजर खिडकीकडे. तेवढ्यात रात्रीही तिथे एखादा कावळा उभा आहे असे मला वाटायचे! ती कधीमधी जेवायची; तेव्हा याच गजाच्या खिडकीजवळ कावळा यायचा. पलीकडे चोच लांबवून तिच्या ताटातले अन्न खायचा; आणि आत्या आपल्या विशाल बुबुळांची पाखर त्याच्यावर घालायची... एक दिवस कावळा आपली चोच रक्ताने माखून आला. चोच ताटात पडताच आत्याने तिला पकडण्याचा प्रयत्न केला. तिचे बोट रक्तबंबाळ झाले. आत्याने ते रक्त चाटून घेतले... आत्याचे वेड पुढे वाढले. वैदूच्या सल्ल्याने ब्रह्मराक्षसाच्या पानांची चळत तिच्या डोक्यावर ठेवून तिला तापलेल्या लाल सळईचा डाग देण्यात आला. शॉकने ती मेली; बोटाची जखम भरली नाहीच... शहामृगांच्या एका सिम्फनीचे असे विघटन झाले...*


*हिवाळी संध्येच्या पारावर बसले आहे- आत्या आणि तिचा कावळा यांची गोष्ट आठवली. अनेकदा आत्याचा कावळा रात्रीअपरात्री माझ्या स्वप्नात येतो आणि माझ्या पायात चांदीचे चाळ घालून दे म्हणतो... देवाशपथ मी खरे सांगतो- फक्त पारव्याच्या पायातच चाळ बांधायला मी वचनबद्ध आहे- पण तरीही कावळ्याचे माझ्या स्वप्नातील येणे-जाणे अखण्ड सुरू आहे- देवजोगव्याचे हे स्वगत कधी संपेल? एकदा एका ओल्या बाळंतिणीचे मूल सारखे रडत होते. काही केल्या त्याचे रडणे थांबेचना. मग ती मध्यरात्री ओलेत्याने दहीभाताचा घास व कणकेचा दिवा घेऊन एकटीच देवीच्या देवळात गेली. दिवा व दहीभाताचा घास देवीपुढे ठेवून ती पाठमोरी होताच कुठून कोण जाणे एक कावळा आला. दिव्यावर चोच मारून त्याने तो मालविला. दहीभाताचा नैवेद्य विस्कटला आणि कणकेचा दिवा चोचीत धरून बरेच अंतर माणसाप्रमाणे दोन पायांवर चालत गेला... त्या बाईचे मूल नेहमीसाठी तर रडायचे थांबले नसेल ना अशी शंका कधीकधी अजूनही माझ्या मनाला चाटून जाते.*

*कावळ्यांच्या भीतीचे मला आणखीही एका बाबतीत फार आकर्षण आहे. अखंड कोसळणाऱ्या पानगळीने ते कधी हैराण होत नाहीत. परतीच्या वादावर ढळतीचे नाद ते जसे नाकारीत नाहीत; तसेच ते मरणलयीचे कधी वारकरीही व्हायचे नाहीत; अनाथांच्या दुःखाचीही*

*भिक्षा झोळीत घ्यायचे नाहीत. कवी ज्याप्रमाणे अनुभवांचे नवे आभास वृत्तलयीच्या आतड्यांनी बांधून पाताळघरांतील एखादीच देखणी वाट सुबोध करीत जातो तसा त्यांच्या भीतीचा आवाका आहे! आणि हे स्फोटाचे काम नव्हे. तो झाला तर एका क्षणात भग्नखिंडारे मागे ठेवून निघून जाईल. झिरपणी राहील. कावळ्यांची राहते... हे सर्व मुळातच इतके क्रूर आणि सुन्दर आहे की, त्या सौंदर्यामागचे तत्त्व आत्ताच शोधण्याची घाई करावीशी वाटत नाही-विधवा मैत्रिणीला मी कळवूनही दिले आहे.*

✶ ✶ ✶

## मितवा (१९८७)





या पुस्तकाचे मुखपृष्ठ व आतली चित्रे सुभाष अवचटांनी रेखाटली आहेत. या पुस्तकाच्या मलपृष्ठावर 'मितवा'चा विशेष नोंदवला आहे. या सुरुवातीच्या (लेखन) टप्प्यातील निबंधात आत्मपरतेमुळे त्यात आत्मचरित्रात्मक अंश प्राधान्याने आहेतच; पण चरित्रगत वास्तवात नेहमीच सत्य, स्वप्न व भास यांचे जटिल संमिश्रण होत गेल्यामुळे कविप्रतिभेचा एक खासगी आविष्कार या ललित बंधामधून जाणवत राहतो.

या निबंधात प्रीती, एकांत आणि दुःख यांचे अवगुंठन आहे. आठवणीतील, वास्तवातील, परिचित, अपरिचित व्यक्तींना घटनेत मांडून भावविश्व (मनातले, आत्माविष्कार) रेखाटले आहे.

'मितवा' या ललित निबंधाचे चार टप्प्यांत विभाजन केलेले आहे. स्वप्नवेचणीचे शिलालेख, दंतकथांचे संदर्भ, एका वैराण सूक्ताचे अधांतर

आणि भास चक्राचे तोल हे चार टप्पे. या प्रस्तावनेतच त्यांनी स्वतःच्या लेखनाला (ललित निबंध) ललितबंध या नावाने संबोधले आहे. यात अनेक स्त्रियांच्या दुःखांचे पापुद्रे मांडले आहेत. पाखराची पिसे उचलणारी बिंदी, वेडा झालेला राजय्या, घाऱ्या डोळ्याची बानी, मिथिला, माधवी, सोनुली, सेलीस याचप्रमाणे सिनेमा, नाटके, महाकाव्याचे संदर्भही सहज येतात.

काळाचे प्रहर, शहरी वातावरण, तळपणारा वैशाख वणवा, देवदास पारोची दुःखद प्रेमकथा, नदीवरचा प्रदेश, संध्याकाळची हुरहुर असे अनेक 'साहित्यविषय' बनले आहेत. परस्पर विरोधी गोष्टी एकत्रित लिहून संवाद विरोधी भयतत्त्वाचा आविष्कार सहजपणे केलेला दिसतो.

मुखपृष्ठावरील वाळलेली पाने आठवणीसारखी आहेत. आकार असलेली, रंग, रेषा, पोत असलेली, तरीही विलग, झाडापासून सुटलेली. या लेखनामध्ये (ललितबंधात) अनेक सुंदर रेखीव वर्णने येतात परंतु त्याला नेहमी तुटलेपणाची, दुःखाची झळाळी कायम असते. संवेदनशील मनाचे, विधिनिषेधाचे, नावीन्याचे अनेक पदर या ललित निबंधातून स्पष्ट होतात, गंभीर अंतर्मनातून उमटलेले भाव स्वगतासारखे झरझर कागदावर प्रवाहित होतात. भरभरून बोलणे, भरभरून लिहिणे, जगण्याचा अर्थ लावण्याचा प्रयत्न, चिंतन यातून 'मितवा' हा ललितबंधाचा आविष्कार वाचकापर्यंत सहज पोहचतो. प्रस्तावना तर 'स्वगत' असल्यासारखी भरभरून लिहिलेली. अतिशय प्रामाणिक व खरे लेखन वाचकाला भिडते. या विधानाचा याचा प्रत्यय 'मितवा' वाचताना आल्याशिवाय राहत नाही.

❖❖❖

कथा

# दंतकथांचे संदर्भ

मांगाच्या पोरीचे आयुष्य खरे म्हणजे मांगवाड्यातच उष्ट्या पत्रावळी चाटण्यातच जायचे; पण फुलबनिया इनामदारांच्या गोठ्यात वाढली. देशांतराच्या वणव्यात अडकलेली तिची आई या नदीकाठच्या रानात बाळंत झाली तेव्हा रान गुलमोहराने रणरणले होते. स्वतःच्याच मीठ-मिरचीला महाग झालेली ती मायमाऊली लेकीच्या जन्माने पुरती वैतागून गेली. नदीच्या डोहात तिने रक्ताळलेली चिरगुटे धुऊन घेतली आणि पोरीच्या नावाने पाणी सोडून ती पुढे निघून गेली. या पोरीला चक्क डोहात ढकलून द्यावे असेही वाटले होते तिला घटकाभर; पण धीर झाला नाही, इनामदारांच्या वाड्यातली वयस्क गवळण संध्याकाळच्या वेळी गाई-वासरे धुंडाळायला नदीकाठी गेली, तेव्हा तिला ही नवजात मुलगी दिसली. तिने ते लेकरू वाड्यावर आणले. घरात दोन पिढ्यांपासून मुलगीच जन्मलेली नसल्यामुळे, ही ईश्वराचीच देणगी समजून वाढवावी असा विचार वृद्ध इनामदाराच्या मनाला शिवून गेला. पण लगोलग त्यांच्या व्यवहारी मनाने भावनांवर आसूड ओढला. पोरीच्या जन्मदात्यांचा तपास करवला, तेव्हा आदल्याच दिवशी एक मांगाची टोळी या वाटेने देशांतराला गेल्याचे समजले. मांगटोळीचा थांग लागला नाही, पण या एवढ्याशा वार्तेने पोरीच्या प्रारब्धावर निवडुंग फुटला. इनामदारांनी गवळणीची इच्छा बघून गुरांच्या गोठ्याशेजारीच लहानशी झोपडी बांधून दिली; आणि तिला त्या अनाथ बालिकेची काळजी घेण्यास सांगितले. सापडली तेव्हा रान फुलांनी डवरले होते. म्हणून गवळणीने मुलीचे नाव ठेवले फुलबनिया. सारा गाव गवळणीवर चरफडला पण इनामदारांच्या पाठिंब्यामुळे बहिष्कार टाकू शकला नाही. गोठ्यातल्या गाई-वासरांइतकीच इनामदारांची फुलबनियावर गाढ माया होती. फुलबनिया वाड्याच्या परिसरातच गाईच्या दुधावर वाढली; वासरांशी वारा भरून खेळली. तिच्या कपड्यालत्त्यांकडेही इनामदारांचे लक्ष असे.

तेराव्या वर्षी फुलबनिया खरीच पुष्पवती झाली; आणि शेवटचा अचका देण्याअगोदर इनामदारांनी तिला खूप घेराचा घागरा-पोलका व झिझिरीत लाल ओढणी घेऊन दिली. पायात दोन चांदीचे तोडेही करून दिले. वाडा आता सुनसान झाला होता. इनामदारांचे सर्व वारस शहरांमध्ये जाऊन स्थायिक झाले होते. गाई-म्हशी खंगून आठवडी बाजाराच्या दाव्याला बांधल्या जात होत्या. गतवैभवाचे उदास निःश्वास टाकणारा वारा केवळ पुरेशी किंमत येत नाही म्हणून टिकला होता. इनामदारांनंतर दोनचार वर्षातच म्हातारी गवळणही मरून गेली; तेव्हा तर तिच्या मृतदेहाला अग्नी देण्यासाठी दमडीही शिल्लक नव्हती. गावाकडे काहीच मागण्यात अर्थ नव्हता. कारण असतेपणीचे सर्व सूड तिच्या नसतेपणातील देहावर लखलखून उठले होते. मांगाच्या पोरीच्या अस्तित्वाचा अस्पृश्य झाकोळ प्राणाआडची दडी सोडून उघड्यावर थयथयाट करीत होता. मग फुलबनियाने जीव जड करून डाव्या पायातला एक चांदीचा तोडा विकला व गावकऱ्यांच्या मर्जीनुसार म्हातारीच्या देहाला अग्नी देऊन टाकला. चिता विझून गेली पण फुलबनियाच्या काळजातला अंगार सुडाचे सपकारे मारीत गावाला चिरू लागला. तरणीबांड फुलबनिया गोठ्यापासच्या झोपडीत एकटीच राहू लागली. एकच एक घागरा-पोलका घालून, उजव्या पायातला एकच तोडा ठणठण वाजवीत ती गावाच्या जिवावर उठल्यासारखी बेगुमान होऊन गेली. तिचे प्राक्तन शापित करणाऱ्या नदीकाठच्या बहरलेल्या फुलवनात आता वैराण नागफणीचे तण माजले होते. त्या तणात बसून फुलबनिया दिवसभर नदीच्या डोहात दगड फेकीत बसे. कुणी हटकू गेलेच तर त्याचाच उलटा कपाळमोक्ष होण्याची भीती, म्हणून कोणीही तिला हटकत नसे. तिच्या अंगोअंगी भरलेल्या आगीने अख्खे गाव पेटून निघाले होते. संध्याकाळ झाली की, गाईवासरांच्या सांजघुंगुरघंटांबरोबरच फुलबनियाच्या एकाच पायातला चांदीचा तोडा ठकठकू लागे आणि त्या नादाने चावडीवरच्या दगडांना मोराच्या पिसाऱ्यासारखे असंख्य डोळे फुटत. विरत चाललेल्या त्या मोरपंखी घागऱ्यातील सुघड पाय एकदा दृष्टिआड झाले की, घटकाभर सोनचुऱ्यासारखी झगमगू गेलेली सायंकालीन धूळ कोळशासारखी काळीठिक्कर पडे. नदीचा डोह आणि तीरावरची नागफणी शिणून अंधारात डूब घेई. चावडीचे दगड पिसारा झडलेल्या मोराच्या

पायासारखे कुरूप दिसू लागत. तिला इनामदारांच्या वाड्याचा आधार होता तोवर चावडीवरच्या मोरांनाही आपले पिसारे आटोक्यात ठेवणे भागच होते. वाड्याला वैभव नव्हते, पण वैभवाचा इतिहास अजूनही घुमारे टाकीत होता. फुलबनियाला त्या वाड्याच्या परिसरातून बाहेर काढावे व मग तिच्या जन्माचा सूड तिच्या देखण्या देहावर उगवून घ्यावा म्हणून सारे गाव टपून बसले होते. पण फुलबनियाही कच्ची नव्हती. तिलाही प्राणपणाने या गावावर सूड उगवायचा होता.

एकंदरीत माणसांच्या दुनियेचे फुलबनियाला वावडे होते. अन्याय वगैरे गोष्टींचे अन्वय तिच्या बुद्धीच्या आवाक्यातले नव्हते. पण काटा रुतला की, आपसूक रक्त भळभळू लागावे तसे आता एकुलत्या एका घागऱ्यात न मावणारे शरीर आणि वाढून दिलेल्या घासात न भागणारी भूक फुलबनियाला आतून हादरे देऊ लागली. भर दुपारी डोहाच्या पाण्यात आपला एकुलता एक घागरा धुऊन ती नागफणीच्या तणांवर वाळत घाली. त्यावेळीही आसपासच्या झाडांना मोरपिसारे लगडल्याचा तिला भास होई. चहूकडून घेरणारे डोळे नागफणीआडून दिसले की, ती सूडाच्या कैफाने दगड मारीत सुटे. डोळे भयभीत होऊन चावडीकडे पळून जात आणि संध्याकाळच्या महाप्रयाणाची प्रतीक्षा करीत असत. पोटातली आतडी तुटत असूनही फुलबनिया शब्दानेही कुणाकडे भीक मागत नसे. फळेमुळे खाऊन दिवस काढायची. वाड्यात म्हातारा गुरव कुलदेवतांच्या पूजेसाठी येत असे. तो गोग्रासाचे ताट दुपारीच फुलबनियाच्या झोपडीत सरकवून ठेवी. रात्री ते मुंग्या लागलेले अन्न घशाखाली ढकलून ती झोपी जाई. सामाजिक अन्याय वगैरे शब्दही माहीत नसलेली ही पोरगी निर्धास्तपणे अंधारवाड्यातल्या गोठ्यापासच्या झोपडीत एकटीच निजत असे.

पण असल्या निर्धास्त निरागसतेला नेहमीच क्षणभंगुरतेचा शाप जडलेला असतो...

सारा गाव इनामदारवाड्याला भीत होता. त्या भीतीच्या बळावर फुलबनियाची जिद्दी धुंद सुडाच्या आगीत भडकत जात होती. चांदीचा तोडा ठाणठाण ठणकत होता. पण एक दिवस कुंपणानेच शेत खावे तसा परदेशी गेलेला धाकटा इनामदार गावात आला; मिळेल त्या किंमतीत वाडा विकून टाकण्यासाठी. वाड्याचे गतवैभव त्याच्या लेखी कःपदार्थ

असले तरी गोठ्यापासच्या झोपडीचे वैभव हुरळून टाकणारे होते. धाकट्या इनामदाराची नजर गावाने व्यवस्थित जोखली आणि काट्यानेच काटा निघणार या खात्रीने गाव कान टवकारून बसले. मांगाच्या कारटीला एवढा दिमाख देणारा इनामदारवाडाच आता कधी तरी तिला खरीखुरी मांगीण बनविणार म्हणून सगळेच वातावरण आतून उत्सुकतेने तंग होऊन गेले होते. तिच्या जन्माचा डाग अजूनही गावाच्या स्मृतीत ताजातवाना होता. इनामदारांची माणुसकी गावाला माणुसकीवरील शापासारखी टोचली होती. इतकी वर्षे उलटली तरीही त्या टोचणीची धग जराही कमी तर झाली नव्हतीच, उलट फुलबनियाच्या तारुण्याने जास्तच भडकून उठली होती. फुलबनियाला या हलकटपणाचा वास आलेला होता, पण इनामदारवाड्यावर तिचा नितांत विश्वास होता. त्यामुळे धाकट्या इनामदारांचे डोळे तिने चावडीवरच्या मोरांच्या पिसाऱ्यात गुंफले नाहीत. एक दिवस भर दुपारी घागरा धुऊन वाळत घातल्यावर, नदीकाठच्या पायवाटेने धाकटा इनामदार येताना दिसला, तेव्हा कुठे फुलबनियाच्या डोळ्यांपुढे त्याच्या वासनेच्या कुबड्या अन् हत्यारे चमकून गेली. ओला घागरा. कंबरेभोवती गुंडाळून ती कधी नव्हे ती भलत्याच भयाने जीव घेऊन पळू लागली. झाडांना मोरपिसाऱ्याचे डोळे सत्याच्या साक्षीने लगडले होते. नागफणीचे काटे पोटऱ्या ओरबाडीत होते. नदीचा डोह शरमेने आतल्या आत ढवळून निघत होता. अखेर प्रतिकाराच्या आवेगाने थकून गेल्यावर फुलबनिया सरळ पाठमोरी होऊन धाकट्या इनामदारापुढे कंबरेवर हात टेकून उभी राहिली नि म्हणाली - ‘मालक ! मला लुटायचं तर खुशाल लुटा, पण थोरल्या इनामदारांनी पोटची पोर समजून पायात घातलेला हा तोडा डागाळू नका. हा तोडा मला समोरच्या डोहात भिरकावू द्या. कारण हा तोडा आहे तोवर या पायांना कोणीही नागवू शकणार नाही, असा आशीर्वाद आहे त्याचा-’ असे बोलून फुलबनिया फतकल मारून खाली बसली आणि पायातला तोडा काढू लागली. धाकटा इनामदार दचकला. झाडांवर लगडलेले पिसाऱ्याचे डोळेही दिपून गेले. यापूर्वी एकदाच तिने डाव्या पायातला तोडा काढला होता. त्यावेळी गावाने दिलदार गवळणीचे प्रेत कुजविण्याचा चंग बांधला होता. यावेळी, उजव्या पायातला तोडा काढताना याच गावाने तिचेच जिवंत शरीर कुजविण्याचा कट रचलेला

होता. या दोन कारस्थानांच्या पार्श्वभूमीवरील तो चांदीच्या तोड्याचा शह म्हणजे एका निरागस पोरीने अभावितपणे साकारून दाखविलेली आसुरी वासनावर्ताचा मूर्तिमंत तमाशा होता.

फुलबनियाच्या पायात तोडा घातला तेव्हा ती अवघी तेरा वर्षाची होती. आता इतक्या वर्षांनी तिच्या गरगरलेल्या पायात तोड्याची काळमिठी बसली होती. तोडा निघता निघेना तेव्हा तोड्याचे विसर्जन करण्यासाठी फुलबनियाने डोहाला पूर्ण शरीरच देऊन टाकले ! रानफुलांच्या सहवासात जन्मलेली पोर, तोड्याच्या अब्रुसाठी डोहात गुडुप झाली. गावानेही मग एकदा जीन घेतल्यानंतर त्याच जिवाचे उदात्तीकरण करण्याची परंपरा नेकीने सांभाळली; आणि ते त्या डोहाला 'तोड्याचा डोह' म्हणू लागले. कुंवाऱ्या पोरींनी या डोहाकडे फिरकू नये अशीही एक वदंता पसरली. जीवनाकडे क्लेश मरणोत्तर विभूतिपूजनाने झळझळून दंतकथेच्या रूपाने अजरामर होऊन बसले.

आता परवा एका ओव्हरसियर मित्राशी बोलत असताना मला ही गोष्ट ऐकायला मिळाली. या नदीवर धरण बांधून आता वीज निर्माण करण्याची योजने आकारते आहे. मी ओव्हरसियरची गोष्ट शांतपणे ऐकून घेतली, पण मनातून मला कसेतरीच होत होते. ते नदीचे पात्र, भोवतालची नागफणी, काळा डोह, साक्षीचे पहाड. हे सगळे नाहीसे करण्याची कल्पनाही मला असह्य होत होती. या सृष्टिसौंदर्याला सुरुंग लावून उडविणे म्हणजे वेगळ्या प्रकारचा, पण अन्यायच आहे असे वाटत होते.

विज्ञानाशी वैर करू नये असा पुस्तकी शहाणपणा स्वतःला शिकवित मी शक्य तितका स्वतःला शांत करण्याचा प्रयत्न करीत होतो. पण अखेर मला धीर निघेना. मी कळवळून म्हणालो, 'ठीक आहे. नदीची अडचण होत असेल तर त्यावर पूल अवश्य बांधावा, पण संहाराला सृजनाचे आवरण घालू पाहणारी शैली मुद्दाम कशाला पांघरावी ? त्यापेक्षा संहाराला संहार म्हणणेच उचित नाही का?' ओव्हरसियर स्थितप्रज्ञासारख्या खोल डोळ्यांनी डोह दडविणाऱ्या जबरदस्त धरणाकडे रोखून पाहत होता. मित्रच तो माझा. माझे दंतकथांचे वेड आणि प्रेमही त्याला पुरेपूर माहीत होते. माझ्या तीव्र भावभावनांचे चढउतारही तो जाणत होता. अखेर माझी विलक्षण अस्वस्थता सहन न होऊन तो म्हणाला - 'नदीची अडचण होत नाही यार,

नदीची हाक ऐकू येते मला. दंतकथांच्या रोंगणात मढविलेल्या भीषण हत्या बोलक्या होतात. या भयाण कथांमध्ये समाजपुरुषाला जीवदान देण्यासाठी स्वतःचा जीव कंसाकरवी समर्पित करणाऱ्या असंख्य विजा लखलखताना दिसतात. नदीला थोडी घटकाभर अडवून आम्ही या विजा उचलू तर तो संहार झाला काय?'

या प्रश्नाने माझी वीज चमकली. अंधारवडावर आशेची चांदणी बसविण्याचे हे तत्त्वज्ञान मला झेपणारे नव्हते. माझ्या डोळ्यांसमोर होती फक्त नदी आणि वीज. प्राचीन अंधःकारातून चकणारे डोहातल्या पायांवरचे अग्निवलयाचे तोडे... विद्युतपैंजण घालून बिनधास्तपणे नाचणारी फुलबनिया आणि दंतकथांचे भविष्यातील संभाव्य संदर्भ, मृत्युच्या सार्वभौमतेला तत्त्वज्ञानाची तोकडी परिमाणे देऊ पाहणारे संदर्भ... मी वैर कुणाशीच केले नाही. नदीशी तर नाहीच, पण ओव्हरसियरच्या स्पष्टीकरणाशीही नाही. मी फक्त माझे संदर्भ गोळा करून शुभेच्छापूर्वक ओव्हरसियरचा निरोप घेतला, तेव्हा तळहातावर ओळी उमटल्या-

कृष्ण आठवा तुला देवकी,
मला विजेचे फूल...

*('मितवा' ग्रेस (१९८७) यांच्या पुस्तकातून साभार)*

❖❖❖

# ग्रेस यांच्या काही पुस्तकांतील अर्पणपत्रिका आणि त्यांची सुरुवातीची स्वगते/मनोगते

## ओल्या वेळूची बासरी

*मोहना, हे तिच्या अतिशय कोवळ्या वयात, स्वयंभूषणे साकारलेले समृद्ध स्त्रीत्व होते./सुमित्रेच्या - जातीचे/शिवरामपंतांच्या नीतीचे - म्हणून परकरी मुलीपासून तर देखण्या, मलूल वृद्धेपर्यंत, कोणीही माझ्या तथाकथित कवितेच्या उंबरठ्यावर आले तर प्रार्थनेचे बळ एकवटून म्हणतोय मी*

*हीच तर माझ्या प्राचीन सभ्यतेची पहिली आणि शेवटची (ही) खूण आहे. तिची पुनरावृत्ती किती वेळ होते ते मी मोजत नाही, तर पुनरावृत्तींच्या अंतर्नादातून मला कोणती प्रतिभान्तरण्याची प्रतीक परिमाणे मिळतील, तेवढेच पाहतो मी.*

*This way my queen; but show steps with lyrical spine*

*थांबतो. थकवा. आत्म्यातला.*

*माझ्या पाठीच्या कण्यातील कुंडलीत, आपल्या चरणगतीचा मोक्ष तपासून पाहणाऱ्या शहामृगास; आणि मेंदूतील चंद्रामृताच्या तळ्यात, आपल्या सुगंधतृष्णेची जोखीम सांभाळणाऱ्या कस्तुरीमृगास(ही)*

*कॅन्सरनंतरच्या माझ्या वाणीचा,*

*पहिला अशक्त, कोवळा आविष्कार;*

*श्री. चंद्रमोहन कुलकर्णी यांच्या,*

*The call of he seas या पुस्तकाचे मी प्रकाशन करताना, बाहेर उमटून पडला.*

*हा उमटलेला आविष्कार,*

*मी दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलला तात्काळच अर्पण करून टाकला.*

*'मनोविकास'चे अरविंद पाटकर यांची भेट त्यावेळी झाली.*
*'इत्यादी' या त्यांच्या गृहवार्तेच्या पत्रिकेत,*
*मला माझे गद्यलेखन मांडता येईल काय?*
*हा प्रश्न मी चंद्रमोहन कुलकर्णी यांना सुपूर्द केला*
*त्यांनी तो पाटकरांच्या हवाली केला.*
*त्यानंतर, ओल्या वेळूच्या बासरीचे, नऊ लेख त्यांनी सन्मानाने छापलेत.*
*त्यांचे कार्यकारी संपादक, श्री. प्रसाद मणेरीकर यांनी*
*जातिवंत निष्ठेने या लेखनाचे संगोपन केले.*

*माझ्या श्वासातील उद्घोषित उद्गारांची भाषामांडणी,*
*याही वेळी, प्रा. तीर्थराज कापगते यांनी केली.*
*डॉ. शशिकांत भुजाडे आणि श्रीनिवास वैद्य यांनी त्यांची*
*चोख संगणकीय व्यवस्था लावून दिली.*

*या लेखनात, चित्रकार रविमुकुल यांना, माझ्या हस्तमुद्रांचे*
*नवेच कुतूहल-आकर्षण रेषाबद्ध करावेसे वाटले.*
*या निर्मितीतील व्यूहबांधणीला, डॉ. समीर कुलकर्णी यांचाही दुजोरा मिळाला.*

**ओल्या वेळूची बासरीमधील ग्रेस यांच्या निवेदनाचा अंश...**

*बोलून जातो, Sir, he died last year! माधवीची प्रक्षेपणरीत, मला नेहमीच चांभारबंधूंच्या या घरंदाज कुळासारखी वाटतेय!*

*वाळल्या वेळूचीच बासरी वाजत असते! ओल्या, भरलेल्या हिरव्याकंच वेळूची बासरी वाजत नाही. त्यासाठी श्रीचक्रधरांनी 'वेळुवाचा दृष्टान्त' सांगितला आहे.*

*सूत्र - हृदयशून्या धर्मी (काव्याधर्मी?) अधिकारू नाही.*
*दृष्टान्त - चंदनाचिया जवळिका आरी : बोरी : टाकळ : वेहंकळी :*
*पाडळी वेधाति : परि वेळु न वेधे : कां : तो अंतरसारू नव्हे :*
*तथा भीतरी पोकळु असे ।।*

*चंदनाच्या अवतीभवतीच्या आरी, बोरी, टाकळी, वेहंकळी, पाडळी यांना चंदनाच्या सुगंधाची दिव्य बाधा जडते. वेळूला नाही. त्यावर श्रीचक्रधर म्हणतात, तो 'अंतरसारू' नव्हे. तथा 'भीतरी पोकळु' असे; परंतु भीतर पोकळु असलेल्या वेळूतूनच, श्वासांच्या प्रक्षेपणाने बासरीचे सूर बाहेर पडतात. श्रीचक्रधरांच्या द्वैतातील आर्त, तडफडणी, उत्कटता यांची जपणूक करताना, अनेकदा स्वतः श्रीचक्रधरांची तारांबळ उडते आहे. समजा, वेळू भरलेला आहे, हिरवाकंच आहे, तर मग चंदनाने सुगंध देताना, दुस्वासाने, त्याला दूर का ठेवावे? चंदनाशी जर वेळू एकजीव झाला तर, श्रीचक्रधरांच्या द्वैती तत्त्वज्ञानावर कुऱ्हाड पडते. आर्तता, उत्कटता आणि तडफड, ही सरावसहवासाच्या माध्यमातूनच प्राप्त करावी, ही श्रीचक्रधरांची द्वैती प्रतिज्ञा आहे! ओला वेळू, त्याच्या आतील, अंतर्गत ओलावा कोरडा, ठणठणीत, संन्यस्थ झाल्याशिवाय तो पोकळ होणार नाही, आणि त्याच्याशिवाय, त्या पोकळीत श्वासांचे प्रक्षेपणही करता येणार नाही; आणि इथे तर, त्याच्या या अवस्थेमुळे तो चंदनाच्या सहवास-सुगंधापासून वर्ज्य झालेला आहे. अशा पेचात सापडले म्हणजे काय करायचे असते? When I find that my flower is crying for dew, I at once cut his throat and release the dew... पण ही तर ग्रेसमय गुंतवणूकच झाली! वेळूची सोडवणूक नव्हे!*

*कवीला चिडवणे, त्याची विटंबना करणे ही शोकांतिका आहे. कवीवर प्रेम करणे हीही शोकांतिकाच. कवी असणे ही महाशोकांतिका आहे! या त्रिवेणीतील पेच आणि वरच्या त्रिवेणीतील पेच, यांची जातिधर्मव्यवस्था कशी बरे तपासून पाहता येईल? हिरव्याकंच वेळूची बासरी वाजत नाही, वाजणारच नाही, हा सिद्धान्त त्या बळावरच मांडता येणार नाही. पोकळ वेळूतून श्वास जाणार; नंतर वेळू आपल्या सुरांची रांगोळी काढणार. रांगोळीसाठी मातीच्या हाडामांसाचे अंगण लागणार. ते वेळूसारखे पोकळ, कोरडे आणि निरस असून चालणार नाही. हे अंगण जर ओलसर नसले तर- त्यावर रांगोळीचे टिंब उमटणारच नाही; अंगण जर पाण्याने चिखलासारखे झाले तर रांगोळीचा चिखलच होणार! पोकळ वेळूच्या स्वरांना, त्यातून बाहेर पडणाऱ्या, समीरसाधनेला हिरवेपणाचा गच्च ओलावा लागणारच! एखाद्या प्रतिभावंताचे श्वास जर अटीतटीने*

*समग्र अस्तित्वाची फुंकर मारून, वेळूचा ओलावा स्वतःच आत्मसात करून, आपल्या फुंकरीतील वारा, वेळूच्या रिकाम्या पोकळीत जर प्रक्षेपित करू शकले तर, ओल्या वेळूची बासरी वाजण्याचा चमत्कार घडू शकतो! वेळूतील ओलसरपणा, हिरवा गच्चपणा, त्यातून काढून बाहेर न फेकता, श्वासांच्या अवरोहाने, तो प्रतिभावंताच्या कुडीने शोषून घ्यायचा आणि दुसऱ्या बाजूने आरोहातून ओलसरपणाचा तरंगश्वास, त्या वेळूतून प्रक्षेपित करायचा, म्हणजे माधवीचा दिवा विकणारा म्हातारा, तिचे ते खेडे, रस्त्यावरील त्याचा सामान-वस्तूंचा चौक, मिथिलेचा देवदूत, दाराशी लंगडणाऱ्या मुलाची खेळणी, स्वप्नसामग्री यांतील प्रश्न-उपप्रश्नांची वेगळ्या वर्गीकरणाने सोडवणूक करण्याऐवजी, या घटकांची सार्वजनिक सभा न घेता आपल्या आत्म्याच्या तळघरात, जर गुप्तपणे बैठक बोलावून, हा प्रश्न मिटवता आला तर? त्यामुळे कवी असणे, कवीला चिडवणे, कवीवर प्रेम करणे हा जी. ए. कुलकर्ण्यांचा त्रिवेणी त्रागा-त्यामागील आच, निष्ठावंत असूनही, त्याचा उपशम होण्याची शक्यता आहे. कलाकृतीचे मूळ रूप आणि त्याचा कलाकृतीतील आविष्कार यांच्यामधल्या अवस्थेतील टप्प्याटप्प्यांवर, आपले काहूरग्रस्त प्रश्न उपस्थित होत असतात.*

* * *

**हृदय सजविणारा**

*हिमवर्षा आणि एक बाई, आपल्या जुनेरांचे वाकळकाम मग्नतेने करीत असताना, माझ्या ओळी गुणगुणत होती-*

***किरमिजी वळणाचा धुंद पाऊस येतो***
***निळसर कनकाचे दीप हातात देतो;***
***हृदय सजविणारा मित्र नाही उशाशी***
***घरभर घन झाले आत ये ना जराशी...***

*अजिता काळे is no more. I heard about her suicide. A woman, who is dealing with a rehabilitation of the lesbian, has always to cut her threads of the skin, from the main current of her soul! अजिता काळेच्या समग्र व्यक्तिमत्त्वाभोवती मला नेहमीच एलिझाबेथ जेनिंग्जच्या सभ्य सतीत्वाचा पारदर्शी मोक्षाधार वावरताना दिसला आहे. त्यांच्या लेखनामागील, त्यांच्या भावविश्वाचे*

*काहूरबोल हे असे जेनिंग्जच्या पडशाळाशोधांचे प्रतीकसंकेत झालेले आहेत!*

*But every season is a kind*
*Of rich nostalgia. We give names-*
*Autumn and summer, winter, spring-*
*As though to unfasten from the mind*
*Our moods and give them outward forms.*
*We want the certain, solid thing.*
*But I am carried back against*
*My will into a childhood where*
*Autumn is bonfires, marbles, smoke;*
*I lean against my window fenced*
*From evocations in the air.*
*When I said autumn, autumn broke.*

*जेनिंग्जची Autumn ही प्रतिमा, अजिता काळ्यांचे, हृदयस्थ*

*मित्रशोधाच्या अभावाशी भिरभिरणे, या प्रतिमांची सांधेजोड भोगताना मर्ढेकर आणि करंदीकर यांनी, 'अचानक' आणि 'आगन्तुक' या निव्वळ अभिधावेधी शब्दांच्या आशयात, बंदिस्त केलेल्या या दोन प्रतिमांच्या आशयातून कसे नव्या अनुभवाचे, मर्यादित आणि अमर्यादित सृजनविश्व उभे होते, याचाही हृदयसंबोध हाती लागून जातो.*

***सुरात भरली टिटवीच्या कुणी***
***मृत्युंजयता भोळी भगवी;***
***आणि अचानक शिवली गेली***
***ध्रुवाध्रुवातील काही कडवी...***

*या निव्वळ भाषिक शब्दांची, चैतन्यपुरीत प्रतिमासंवेदना जागविताना मर्ढेकर, चुकूनही आपल्या दुर्बिणीच्या लेन्स कमीअधिक करीत नाहीत. त्यांचा आपल्या अलंकारशाळेतील सर्जिकल बाणा, अभिधाशक्तीला विस्तारात न अडकविता फार निष्कलंक सद्गतीच्या लयीने... टिटवीच्या चोचीतील सुरात प्रक्षेपित करतात. जणू मर्ढेकर स्त्रीपुरुषातील प्रेमाचा अंगांगी भाव, टिटवीच्या चोचीत भरून, तिच्या अहेवपंखालाच निर्वाण*

*नूपुरांची माळ शिवून टाकतात!*

***आज आगन्तुक तुझी दिवाळी***
***उंबरठ्यावर सजली गंऽ***
***आज घराची फुटकी कौले***
***अंधाराला हसली गंऽ***

*Here Vindaji definitely dreaming about the range of Mardhekar; but could not become the King of the dream of this experience. हेसुद्धा मोठेच वरदान आहे. This is also the grace of the God on Vinda Karandikar! But the range in creativity does not open every gate, because opening the gate is the rank of the experience. Here gates are automatically being opened for an original experience and the creator instantly become its ranger.*

*स्पष्ट बोलावयाचे झाले तर, निर्वाणप्रक्रियेच्या अवस्थेचे चार प्रकार मुक्रर केलेले आहेत. समीपता देवाशी जवळीक, सलोकता देवासमान संतमंडळींचा सहवास, सरूपता देवाशी साधर्म्य आणि सायुज्यता म्हणजे या तिन्ही प्रकारांपासून, पूर्णपणे मुक्त होऊन परम आत्म्यात संपूर्णपणे एकजीव होऊन मिसळून जाणे. निर्वाणाच्या पहिल्या तीन अवस्थांतील जीवन, हे संपूर्णपणे पंचसंवेदनांपैकी प्रत्यक्ष स्पर्शसंवेदनेवरच अवलंबून असते. (प्रत्यक्ष संवेदनांवर आधारित ललितकलांपैकी, चित्र आणि शिल्पकलेने या स्पर्शसंवेदनेला, प्रदूषणाचा धोका पत्करूनही, आपल्या दृक्संवेदनावधूची करवली म्हणून, सतत आपल्या जवळच बोलावून ठेवले आहे!) दृश्य-स्पर्श या दोन्हीही एकत्रित संवेदनांचा आत्मप्रत्यय देणारी कविता, जेव्हा जेव्हा प्रतिभाबलाने अवतरलेली आहे, तेव्हा तेव्हा तिने शब्दब्रह्माच्या उगमशक्तीचे असे काही दिग्दर्शन घडविले आहे की, साक्षात पंचसंवेदनांवर आधारलेल्या सर्व ललितकलांपेक्षा, भौगोलिक भाषांच्या मर्यादेत अडकलेल्या अप्रत्यक्ष संवेदनांच्या, त्या त्या भाषेतील प्रत्यक्ष शब्दसंवेदनांच्या प्रतिमांवर आधारलेली काव्यकला, ही कुठलाही वेगळा तिरकस प्रयत्न न करता सर्वश्रेष्ठ कला होऊन बसली! ॲरिस्टॉटल, प्लेटोपासून तर पॉल क्ली, देगास, मायकेल ॲन्जेलो, हेन्री*

*मूरपर्यंतचे सर्व कलादर्शनशास्त्रातील, राजकारणातील (युनोचे सेक्रेटरी जनरल डाग हॅमरशोल्ड ह्यांचे, प्रतिभावान कवी ऑडेनने संपादित केलेले, Markings हे काव्यार्थबोधांच्या संकल्पनांचे निराळेच पुस्तक आठवतेय.) आणि कलाशास्त्रातील महर्षी, कवितेच्या मोहात पडून गेलेले आहेतच. तिरकस डोक्याच्या पिकासोनेही तिच्याशी नको इतकी लाडीगोडी केलीच. अशा लाडीगोडीतून मात्र या दिव्य चित्रकाराने कवितेच्या माध्यमातून, कलेसंबंधी एक स्वयंदंडकाचे अजरामर विधान करून ठेवलेले आहे- Poetry is never obscure, so-called reality around her, is an obstinate, shameless, obscurity. (मूळ विधानाच्या, माझ्यावर पडलेल्या प्रतिबिंबाचे हे आत्मरूप उद्गार आहेत.)*

*प्रज्ञा साधवीच्या, आत्महत्येला मी अशा प्रकारे जबाबदार आणि बेजबाबदार नसतानाही मात्र catalytic agent होऊन गेलेलो आहे. I thought that I closed my account in my blood bank, but her suicide, came by an exit and reopened an account in my name again! आत्म्याला गोंजारणाऱ्या, प्राण्यांच्या ललकारीतून हाकारणाऱ्या, आत्म्याच्या भोवती रिंगण घालणाऱ्याही अनेक हाका, जवळदूरच्या पहाडकपारींतून येऊ शकतात; परंतु निद्रिस्त ज्वालामुखीचा जिरेटोप धडाड फेकून देणारी, एखादी ज्वालाग्राही हाक मात्र आत्म्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडवून टाकते, तशी माझी अवस्था झाली आहे. मी चालत नाही. मी रेंगाळतही नाही. माझी क्रिया थांबलेली नाही किंवा ती प्रतिक्रियेकडे आशाळभूतपणे पाहतही नाही. मेंदू एक क्षणभर थबकला म्हणजे कसे होत असेल किंवा एखाद्या बेगुमान अनुभवात, आत्मा ओशाळला म्हणजे कसे होत असेल, तसे काहीसे माझे झालेले आहे. अभिव्यक्ती, आविष्कार शब्दावलीच्या मांडणीतून मुखर करता येतात. निर्मिती, अशा माध्यम-द्रव्यांच्या साधनातून पूर्णपणे मांडता येईल काय? लोकगीताची एक चिरडलेली धून ओकणारे, रेडिओतील गाणे माझ्या श्रुतीवर येऊन आदळले आहे-*

***मन के मतपर मत चलियो रे ऽऽऽ***
***जीते जी मरवा देगा ...***

*या गीतातील हा फुपाट्याचा भोवळवारा खरोखरच काय आहे? हा*

*कोणत्या मूळवृक्षाचा फलभार आहे, की डोळ्यांवर ताडकन पडणारे देववृक्षाचे मोक्षफळ आहे, याचा थांगच लागत नाही. या गद्यखंडाच्या अनुभवाच्या पूर्वी, काव्य आणि सत्य या दोन प्रतिमांच्या एका तहनाम्यावर आधारलेल्या, मनाच्या लढाईत मी गुंतलो होतो. माझ्याच जुन्या चरणाचा नवा ऐवज दृष्टांत म्हणून पुढे केला-*

***चौखूर उधळल्या गाई***
***चालले सत्य धूळधाण;***
***श्वासात हवा गोठावी***
***मुरलीवर येता ताण...***

* * *

## ससा आणि स्यमंतक मणी

*Where is she vanishing?*

*या निर्मितिप्रदेशातील सुरुंग प्रश्नातून कोणत्या नव्या ललाटबंधांचा अश्वत्थामीय शूळ, कोणती द्रौपदीय जखम खुणावत असते? याचे उत्तर शक्य आहे? प्रत्येक पात्राची पाठवणी, निगराणी, तत्त्वानुमानित वर्गीकरण व्यासांना शक्य झाले. पण ते मात्र युधिष्ठिराला एका साध्या हुंदक्याच्या, सोप्या अश्रूच्या दूरदूरच्या पेचात आणि प्रदेशात मात्र कधीही पकडू शकले नाहीतच नाही! तसेच याही प्रश्नाचे उत्तर शोधीत राहायचे आणि नरो वा कुंजरो वा या आत्मभुलीच्या उत्तराने प्रत्येक झाडाच्या सालीलाच वल्कल म्हणत जायचे!*

*रिल्केच्या Spanish Dancer या अद्भुत, विलक्षण कवितेची अवयवबांधणी निरखून पाहताना, माझ्या मस्तकातून, माझ्या आत्म्यातून भासभासांची, सत्यासत्यांची, स्वप्नास्वप्नांची एक प्रदीर्घ लाटच्या लाटच उसळून आली! रिल्केच्या अक्षरबंधांची प्रतिमासृष्टी, आशयजागृतीचे प्रतीकतोल माझ्या अस्तित्वाच्या निर्मितिकेंद्राशी झुंज देताच, मला या प्रदेशातील कधीही न गवसलेली एक बेगुमान वाट खुणावू लागली. रिल्के हा काही माझा अभ्यासविषय नव्हे आणि कवी दुसऱ्या कोणत्याही, एखाद्या कवीचा (माझ्यासारख्याही!) अभ्यासविषय(?)असतो असे म्हणणे म्हणजे - त्यांच्यातील निर्मितिबंधांच्या रहस्यांची कुठलीही अपार्थिव जाण नसल्याचे अतिशय लौकिक, नाठाळ आणि मट्ठ लक्षण वाटते*

*मला! खरे तर या कवीचा माझा अनुबंधशोध, माझ्या निर्मितिविश्वातील सहोदरधर्माचे, पापणीवरील तिळाएवढे चिमुकले आणि आत्म्यावरील बीजकळीएवढे मजबूत अनुसंधान आहे, असेच मला या प्रतीतिधर्माच्या मार्गाने चालताना वाटत आले आहे.*

*स्पॅनिश नर्तिकीच्या देहाला घट्ट आदिबंधाने बांधणारी अग्निज्वाळेची प्रतिमा उसवतोय समोरचा हिवाळा! अवतीभवतीच्या सर्व वृक्षपरिवारात धुक्याचा सायंकालीन शोक भिरभिरत भिरभिरत शिरू लागलाय. यातून मला दिसतेय अस्तकालीन सूर्यबिंबाची मावळती, मेघशून्य यात्रा, देव जाणे, कदाचित रिल्केच्या स्पॅनिश नर्तकीच्या गर्भाशयातील पाचोळ्याचा अतर्क्य नाद इथेही, या वेळी परतून आला असेल, झाडांचे काहीही असू देत यार, पण त्यांची नातीगोती, त्यांच्या संगनमताचे सूत्र जाहीर करण्याचा एकमेवाद्वितीय अधिकार फक्त आणि फक्त पाचोळ्याचाच असतो. तेवढाच तो गाजवतोही. साली-वल्कलांच्या वृक्षपरगण्यात तो कधीही शिरतच नाही! To always attend the basic only, is not a joke!!*

*अशा हिवाळी संध्याकाळी, नादिरा आपल्या वाळलेल्या केसांचे गवत खुशाल खांद्यावर झोकून, फकिराच्या रुद्राक्ष माळेतील एखाद्या स्फुल्लिंग मण्याप्रमाणे, लकाकी शोधत शोधत एका कानात चाफ्याचे तर दुसऱ्या कानात प्राजक्ताचे फूल टोचायची! चाफ्याचे फूल बळकट, थोडेच. प्राजक्ताचे देखणे पण अशक्त! शेंदरी देठाच्या किमयेने म्हणून रुक्मिणीभामेच्या मायेचा अभिसार त्याला कदाचित लाभला असावा, दुसरे काय! पण या फुलांना अतीव लगबगीने झटकत जाणारे पारिजाताचे खोड मात्र बरेच ताकदीचे, चांगले सशक्त! चाफा त्यापेक्षा विशाल पण खोडात मात्र कच्चा, म्हणजे नशीब कच्चे ललाट पक्के; ललाट कच्चे नशीब पक्के की काय! चाफा, पारिजात, खोडफुलांचा स्वभावक्रम! एकाचे फूल कच्चे तर खोड पक्के! दुसऱ्याचे खोड कच्चे तर फूल पक्के! या कच्चे-पक्केपणासाठी नादिराने जसा आपल्या केसांचा गवती भार खांद्यावरून मुळीच झुगारून दिला नाही, तसेच तिने प्राजक्त, चाफ्याच्या कानाच्या पाळ्यांच्या जागांची अदलाबदलही केली नाहीच! नादिराने स्थलभंग होऊ दिला नाहीत. तंद्रीसंग ढळला नाही आणि हृदयभंगही! सर्पदंशाने ती*

*हृदयकाहूर हिवाळ्यात मरून गेली! पण ते प्राजक्तामुळे की चाफ्यामुळे हे मात्र रुद्राक्षाच्या वळीवळीत दडलेल्या धुक्याप्रमाणे अज्ञातच राहून गेले!*

*या हिवाळ्यात माझ्यावर चाल करून आलेली माझी प्रेयसी सरळ म्हणाली - कविराज! अहो, काचेचे तुकडे दिसतात, काचेचा चुरा दिसत नाही! या तिच्या विदारक, शहाण्या वाक्याने मी अंतर्बाह्य उन्मळून, उन्मळून पडलो. मग काचेचा चुरा जातो कुठे? पृथ्वीवरची धूळ आणि अंतरिक्षातील खऱ्या अढळपदाचे नक्षत्रबीज तरी कोणते? हे अवतरण तर नाही ना? अढळपद तरी केवढे? मांडीवरच्या बालहट्टाएवढेच की नाही? त्याच्या अढळपदाला अगणित अंतरिक्षातील खऱ्या अढळपदाचे नक्षत्रबीज तरी कोणते? हे अवतरण तर नाही ना? निर्मितीत अवतरणे तर यायचीच! कधी तुकडे होऊन तर कधी चुरा होऊन! कधी बीजसंभवाचा आदिम हक्क मिरवीत, तर कधी संभवपूर्ण बीजाची छबेली जमीन होऊन... अनेक कवितांत हा पक्षीकळप, संधिकालाच्या पालखीतील राजकन्येच्या सख्यांप्रमाणे आसमंतलहर जोजवीत येतो! लहर, लहर लहरतच जाते! हिवाळी प्रेयसीच्या उद्गाराचा मी असाही अन्वययोग जुळविण्याचा प्रयत्न करतोय. Spanish Dancer मध्ये राजकन्येच्या पालखीतील धुक्यामुळे, संधिकालाचा आसमंत जोजविणारी पक्षीकळपाची लहर सर्वत्र विखुरली आहे.*

★ ★ ★

**अग्नी नाही घेत बाभळीचा मक्ता। चंदनाची चिता जाळतोची**

*शब्द सापडत नाहीत आणि ज्या भाषेचे आपण आख्यान लावले आहे ती भाषा मदतीला धावूनही येत नाही. याच अर्थाने कदाचित पिकासोसारखा कलावंत, व्याकरण, भाषा आणि विरामचिन्हे यांना आपल्या कवितेत फिरकूही देत नाही.*

*दुपेडी, दाट केसांची, वेणी घालता येते, तिपेडी, दाट केसांचा अंबाडा घालता येतो पण खडतर बुरुजावर तपश्चर्या करणाऱ्या योग्याच्या जटेतील एक बटही सोडविता येत नाही. कारण एकाच जटेमध्ये मानवी आविष्काराच्या अनंत रीती दडलेल्या असतात. मांडीतील रक्ताने माखलेले हात, जोपर्यंत मोकळे केस वेणीबद्ध करणार नाहीत, तोपर्यंत हा वैराण शोक वाहत राहील असे, कोणीतरी समग्र महाभारतात आक्रंदून आक्रंदून*

*सांगते. या शोकाला प्रश्न नाही, त्याचे उत्तर तर व्यासांजवळही नाही. जणू काही ही जीवनाची सच्ची अवखात हीच विश्वाची बुनियाद आहे असे वाटत राहावे. अशा अवखातीच्या बुनियाद आहे असे वाटत राहावे. अशा अवखातीच्या बुनियादी किती म्हणून सांगाव्यात?*

*मॉस्कोच्या स्टेशनवर रुळांखाली आत्महत्या करणारी ॲना आणखी काय वेगळे सांगते? बंदुकीचा चाप ओढून स्वतःचा जीव घेणारा हेमिंग्वे? आणि दोन डबल आत्महत्या की द्विदल आत्महत्या? आर्थर कोस्लर आणि त्याची पत्नी, स्टफन् झ्वाइग आणि त्याची पत्नी? सिंगल आत्महत्यांची अनेक उदाहरणे आहेतच.*

*ज्ञानेश्वरांची समाधी, तुकोबांचे वैकुंठगमन इत्यादी, इत्यादी. मी कुठल्या बळावर आणि कशासाठी गुलमोहरांच्या बहरांची हैसियत मोडून, त्यात दडलेल्या मठाच्या गुपिताला डिवचण्यासाठी जावे? एक तर पाऊसकाळातील गुलमोहरी बहारात मी धारवाड पाहिले आणि जी.ए. तिथे नव्हते. ते वर गेले होते. त्यामुळे माझ्यापुढे दोन पेच पडलेत. बाहेरच्या पावसाला थोपवावे की आतला पावसाळा आवरून धरावा?*

*एक गंमत आठवली - एका लेखकाने एका लेखात असा उल्लेख केला आहे - (प्रस्तुत लेखकाच्या मते जर ग्रेसची कविता भाषांतराच्या सुखरूप सेतूवरून, फ्रेंचमध्ये पिकासोप्रत पोहचली असती तर कदाचित ते वाचून, उठत असता; अशा नाजूक सामानाची सुखरूप ने-आण करता यावी, असा पूल दोन भाषांमध्ये असू तरी शकतो का? अशी त्यास शंकाही आहे!) या लेखकमित्राच्या या तुलनेने मी लाजून हादरून गेलेलो आहे.*

*आणखी दुसरी गोष्ट, काव्यकलेला भाषेच्या मर्यादेच्या अडचणी आहेतच. त्यामुळे भाषेचे रूपांतर होऊ शकते पण हृदयांतर नाही होऊ शकत. कारण भाषा ही जिवंत मानवी समूहांची संघटना आहे. आता या माझ्या मित्राच्या म्हणण्याप्रमाणे जर माझी, माझी तथाकथित कविता, अनुवादिली तर काय होईल? पराभव! तात्पर्य, भाषांतर हेच मुळी पराभूताचे कार्य असते. तरीही त्याची इज्जत एवढ्यासाठीच करावयाची की, पराभूताने शस्त्र खाली ठेवायचे नसते! आता आमच्या आणखी एका मित्राला आमच्या तथाकथित कवितेचा संबंध तुकारामाशी जोडावासा*

*वाटला. हे दोन्ही मित्र भाबडे असले तरी मूर्ख नाहीत. आणि तारतम्याचा पूर्ण वापर करणारे आहेत. तरीही आम्ही हुरळून लिहिलेच-*

***अग्नी नाही घेत बाभळीचा मक्ता।***
***चंदनाची चिता जाळतोची।।***

*अहो! हा अभंग तुकारामाच्या तोडीचा नाही हे तर ठीक! जोडीचा नाही हे तर आलेच पण त्याच्या कुळीचा तर नक्कीच आहे ना? म्हणून तर ती फकिरी प्रार्थना-*

***और कुछ भी नही दरकार तुझसे लेकिन***
***मेरी चादर मेरे पैरों के बराबर कर दें।***

*ढग विस्कळीत झाले होते. कोसळले नव्हते. संधिप्रकाश रेंगाळत होता. वारा किंचित स्तब्ध झाल्याचा भास झाला आणि पाठीमागून कुणी तरी गुलमोहराच्या फळाफुलांची पाठवणी, माझ्या सोबत करते आहे असा मला भास झाला. त्यामुळेच बाहेरचा पाऊस मला सावरता आला आणि धारवाडातील जी.एं.चा हुंदका आतल्या आत गिळता आला.*

* * *

## चंद्रऊदयिनी वेळा

*पुन्हा इथे हे करत असताना, आपल्या स्वतःच्या आतल्या ऊर्जेने थोडा करपला असेल, थोडा पोळला असेल, थोडा झिजला असेल. आणि त्या घर्षणातून जी ऊर्जा निर्माण झाली, त्यामुळेच त्याच्या प्रकाशाचा वेगही तुफान झाला असला पाहिजे. कलावंताची ही आतून देह झिजवून छंदावण्याची जी प्रक्रिया आहे, त्यात दीपकलिकांच्या अग्निदिव्याबरोबरच, कवीच्या विशेषनामाचेही अगत्य तेवढेच सामावलेले असते. म्हणून बाईचे रूप, पोषाख, परिवेश या सर्वांतून देहाच्या घर्षणाने देहाची लय निर्माण करण्याचा रास्त पवित्रा, रिल्केची काव्यभाषा आणि रिल्केचा काव्यानुभव नेहमीच धारण करतो.*

*साऊलच्या संदेशवाहिनीवरून जो वृत्तविशेष आला यातून तिच्या घरासमोरील बदामाच्या झाडाची संध्याकाळ मीसुद्धा माझ्या पडवीत उतरवून घेतलीच आहे. संदेशवाहिनीवरील वृत्तविशेषाला, मी साऊलच्या निरीक्षणातून सुटलेला एक छोटासा विशेष जोडू पाहतोय. बदामाच्या हिरव्याकंच पानांत पोपटांचे हिरवेकंच थवे सामावून गेल्याने, भेदाभेदाचे*

*रंगातले अमंगळ, साऊलच्या संदेशाने तात्पुरते शमविले असले, तरी हिरवा रंग आणि हिरवी बदामाची पाने, शिवाय हिरवे बदामही, या तीन घटकांत भेदाभेदाचा प्रश्नच येत नाही.*

*माझ्या छोट्या कहाणीचा विशेष असा की, या हिरव्या सार्वभौम छोट्या कांतारात, आपल्या पोपटराजाची चोच ही लालचुटूक आहे. या रंगविसंगतीचे काय करायचे? रंगातील भेदाभेद नष्ट करण्यासाठी, साऊलने पोपटाची लाल चोच मुद्दाम बाजूला तर काढून ठेवली नसेल ना? हिरव्या पर्णसंभारात, पिवळे होण्याअगोदर पार्श्वभागाने लाल झालेली तुरळक पाने, या हिरव्या संभारात तुरळकपणे उपलब्ध आहेत. पोपटाच्या लाल चोचीचा या तुरळक पानांशी संबंध जोडून दिला, तर देह घासून छंदावता येईल काय?*

*बदाम झाडे रिमझिम झेलित*
*हिरव्या पानांवरचे पाणी;*
*हिरवे पोपट त्यात मिसळले*
*चोच तेवढी लाल विराणी?*
*झाडांच्या पानांतून एकट*
*लाल पान चोचीला धरते*
*भेद तेवढा मिटवित जाता*
*आतिल पिवळे पान थबकते!*
*भेदांच्या रंगातून झरती*
*रंगांधांची भिरभिर गावे;*
*बदाम हिरवे चोचित घेऊन*
*भुऽऽर्र उडाले हिरवे रावे...*
*सुन्न बदामी चेहऱ्यावरती*
*चित्रव्यथेची उरते धून;*
*साऊल म्हणजे धम्मक पिवळे*
*उधळण... उधळित हळदी ऊन...*

*देह घासून छंदावण्याचा क्रमविक्रम उभयपक्षी म्हणायचा, तो एवढ्याचसाठी की, देणारा राजा असेल, तर घेणाऱ्यानेही फकीर असता कामा नये; राजेच झाले पाहिजे.*

## गणमात्रांचे गणगोत

*श्रीज्ञानेश्वरांनी याच प्रतिमाविश्वातील तडफडीच्या तारणमारणाला लवणाची मासोळी तर म्हटले नसेल ना? देऊळथडग्यांच्या स्मशानभूमीत, मध्यरात्री अंबारीच्या हत्तीशिवाय आणलेल्या राजघराण्यातील गुप्त प्रेताची, घाईघाईने विल्हेवाट लावल्याची दाट बोलवा माझ्या कानावर त्याच वेळी पडली होती. पण समोरच्या डोंगरघळीतून पिचलेल्या सनईचे सूर माझ्यापर्यंत नंतर कधीही आले नाहीत, तसाच मध्यरात्री डोंगरघळींच्या सुळक्यांतून, निळाईचा धूर, कधीही निघताना दिसलाच नाही मला! याच पडवीत माझ्या शब्दांना, शुभाशुभ प्रतिमांची अनेक अवतरणे सापडलेली आहेतच. परशुरामीच्या हळदगौर साक्षात्काराने मला मूर्च्छा येते, आलीही! अंजनीसुताला रामधून आठवली आणि संजीवनी बुटीच्या शोधात, ते वैभवी माकड आकाशगामी झाले. मला शुद्ध येईल, येणारही नाही, माझी शुद्ध नव्या जोमाने विशुद्ध होणारही नाही. हे होकार-नकार जिवाला पैलथडी जाऊ देत नाहीत, ऐलथडीवरून हाकांची गुंफणही करू देत नाहीत. फुलांचा जाड फ्रॉक आणि पाऊसहुलकावणीचा काळा रेनकोट घातलेली, दत्तविधानाचा ऐवज नाचविणारी परशुरामी, एखाद्या हिरव्याकंच झाडीमागच्या चंद्राला जर कडकडून बिलगली, तर तिच्या दत्तविधानाची मी पुनर्मांडणी, अशा विव्हळ, बैरागी तोलाने करायलाच पाहिजे, असे मला जराजर्जर संध्यामाईचा, पणतीपुढचा हात खुणावून सांगतो आहे -*

*तुझी निद्रा नवखी नितळ अंगात ये ना,*
*सतीच्या सरणाला रचुन अवघे रान दे ना!*
*कळ्या मेंदू पाणी हिमनग तसा शुभ्र हलला*
*कसा संध्याकाळी सहज मजला शब्द स्फुरला?*

*आता मात्र या माझ्या सुनसान पडवीत, श्रीज्ञानेश्वरांची लवणाची मासोळी तडफडते आहे. अपुऱ्या अश्रूंमुळे मी तिला तगवू शकणार नाही की, जगवू शकत नाही! एक पांढरा बगळा या कावऱ्याबावऱ्या संधिकालात, फडफडून गेलाय. देवाच्या निर्माणाला पडव्यांची, पाडावांची गरज नसेल, पण तसेच पुनर्निर्माणाच्या प्रत्येक घरबांधणीला मी निश्चयानेच असावी काय, अशा प्रश्नांची शंका माझ्या मनात मूळ धरू*

*पाहतेय. अभिमन्यू मास्तर, करुणेच्या काठाकाठाने पाय ओले करून, आपल्या किन्नर गळ्यातूनच - घातआघात निवारी । छाया पितांबरे करी ।। अशी आपल्या घराच्या पडवीची पुनर्बांधणी करताच, पुनःपुन्हा अभिमन्यू मास्तराच्याच पेचात अडकून पडतोय मी आरी गंजलेल्या तलवारीची मूठ संतापाने आवळून पाहतोय. डॉ. एडवर्डला सुरमाच्या गँगरीनची करुणा, हाकांचे हाहाकार नेमाने धाडत असते! कोणत्या नव्या गोधनातून एखादी लालतांबड्या पट्ट्यांची कपिला माझ्या अंगावर चालून तर येणार नाही ना? तेव्हा माझी पडवी कोणत्या तालाच्या तालावर, ही अंगभर पसरत जाणारी भीती गोळा करीत जाईल?*

*संध्यामाझ्या पणतीची तडतड मला इथेही पडवीत ऐकूच येते आहे. पणतीच्या खापराने पणतीतील सगळेच तेल तर शोषून घेतले नसेल ना? कुणाला विचारावे? अंजनीसुताच्या परतीचा संजीवनी सुगावा, अजून माझ्या दृष्टिपथात येत नाहीचय. परशुरामीच्या साक्षात्कार भेटीनंतर एका नव्या काडीचा मला शोध लागलाय. ती खरेच परशुरामीच्या दत्त-विधानातीलच कडी आहे किंवा नाही, याचा अंदाज घेतोय मी. पडवीचे काऽय?*

*We walk with lowered eyelids there*
*and silent go-behind the blinds?*

*हे पडवीसत्य समोर ठेवून, हरवलेल्या दोन कड्या, या पडवीच्या धूसर अंधारात माझ्यासमोर येऊन पडल्यात. एका फार जुन्या अभंगातून, माझे दोन अभंग सरमिसळीच्या गोंधळाने आतापर्यंत मधे पडून राहिलेले आहेत. त्यांचा पडताळा आता मला इथे सापडतोय!*

❖❖❖

# मित्रांच्या नजरेतून...

## दि. भा. घुमरे

ग्रेस यांचा माझा प्रथम परिचय १९६०-६१ च्या दरम्यान झाला. 'तरुण भारत'च्या संपादक मंडळातील (स्व.) श्री. बापूसाहेब महाशब्दे यांच्या मध्यस्थीने ते 'तरुण भारत'मध्ये आले, अशी माझी माहिती आहे. ग्रेस यांनी 'लोकमत'च्या २००७ च्या दीपोत्सव अंकातील संपादकीयात- 'माझ्या आयुष्याची संपादकीय कारकीर्द ही कै. ग. त्र्यं. माडखोलकरांच्या कृपेने साठ-एकसष्टमध्ये सुरू झाली... माझ्या संपादकीय कारकिर्दीचा हा प्रारंभ कै. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या आकर्षणाने सुरू झाला. तो दि. भा. घुमरे आणि वामन तेलंग यांच्यापर्यंत टिकला' असे लिहिले आहे. ते भाऊसाहेबांना भेटले, त्यांच्याशी त्यांचे बोलणे झाले आणि नंतर त्यांची नियुक्ती झाली, असा समज माडखोलकरांच्या 'कृपेने' या शब्दांमुळे निर्माण होऊ शकतो. पण माझी माहिती वेगळी आहे. ग्रेस त्या वेळी अडचणीत होते आणि बापू महाशब्दे यांनी नवयुग शाळेतील आपल्या या विद्यार्थ्याला 'तरुण भारत'च्या संपादक खात्यात अधूनमधून जे अंशकालीन उमेदवार नियुक्त व्हावयाचे त्या व्यवस्थेत त्यांची सोय करून दिली. ते सायंकाळी ६ ते रात्री ८/१० या वेळात यायचे आणि रात्रपाळीच्या उपसंपादकाला सहकार्य करायचे. हे काम त्यांनी फार काळ केले नाही. त्यांनी लिहिल्याप्रमाणे तो काळ काही त्यांच्या 'संपादकीय कारकिर्दी'चा नव्हता.

## मित्र आणि कवी : रामदास भटकळ

ग्रेस यांचा पहिला परिचय झाला तो त्यांच्या कवितांतून. पु. शि. रेगे यांच्या 'छंद' मासिकाच्या एका अंकात - मला वाटते १९५८ अखेरच्या - त्यांच्या तेरा कविता एकदम प्रसिद्ध झाल्या. तोवर त्यांचा मुंबईच्या साहित्यिक वर्तुळातील कोणाशीही प्रत्यक्ष परिचय नव्हता. ग्रेस स्त्री की

पुरुष यांविषयीदेखील कुतूहल होते. रेगे त्यांना स्त्री समजून पत्रव्यवहार करायचे अशी वदंता होती. मी नुकताच ‘छंद’च्या साहित्यिक वर्तुळात हिंडू लागलो होतो. बहुतेकांना ह्या कवितांनी लोभावले होते. निरनिराळ्या कारणांनी, त्यापैकी तीन मुक्तछंदात होत्या आणि बाकीच्या छंदोबद्ध. त्यांतील ‘आषाढ वनातील कविता’ त्यांच्या पुढील लेखनाइतक्या चकवणाऱ्या नव्हत्या. तरी कवीचे अनुभवविश्व फार वेगळे आहे हे जाणवले होते. अनेक रंगांची पखरण होती. कविता वाचता वाचता डोळ्यांसमोर शब्दांबरोबर रंगही फेर धरायचे. ह्या कवितांत फार नाही तरी ‘थेंब-उणे ऊन’, ‘गंधगार रात्र’ किंवा ‘ओळख हरवून बसलेली छायावेळ’ असे शब्दप्रयोग होते.

त्यानंतरची एक आठवण : दूरदर्शनच्या मुंबई केंद्राची सुरुवात होऊन दोन-तीन वर्षेच झाली होती. ‘प्रतिभा आणि प्रतिमा’ शीर्षकाचा साहित्यिक मुलाखतींचा कार्यक्रम केशव केळकर यांनी सुरू केला होता. माझी मैत्रीण सुहासिनी मुळगांवकर तो कार्यक्रम सांभाळत होती. त्या कार्यक्रमात ग्रेसची मुलाखत ठरली. मुलाखत घेणार होते चिं. त्र्यं. खानोलकर (आरती प्रभू) आणि हृदयनाथ मंगेशकर. म्हणजे तीन श्रेष्ठ कलावंतांची ती गुंफण होती. दूरचित्रवाणी हे माध्यमच बहुतेकांना नवीन होते. म्हणून उगीचच काळजी. मुलाखत पंचेचाळीस मिनिटांची असावी. तेव्हा जाहिराती दिल्या जात नसत. आकाशवाणीवरील कार्यक्रमाची ह्या सर्वांना सवय होती. खानोलकर काही दिवस तिथे नोकरीही करायचे. परंतु दूरदर्शनचा दरारा वेगळा होता. ते बोलताना सगळे पाहणार ना!

त्या तिघांनी एकत्र जमून तालीम करायचे ठरवले. माझ्या माहीमच्या घरी आम्ही बसलो. त्या तिघांनी, जणू कॅमेरा पाहतो आहे अशा थाटात, चर्चा करायला सुरुवात केली. सहसा अशा मुलाखती व्यक्तिगत स्वरूपाच्या होतात. ‘तुम्ही कुठे जन्माला आलात, शिक्षण कुठे झाले?’ पासून ‘काय काय लिहिले आहे, त्यापुढील लेखनाचे संकल्प कोणते?’ पर्यंत. परंतु ही त्रिमूर्ती त्यापलीकडे जाऊन साहित्यासंबंधी वाङ्मयनिर्मितीच्या संदर्भातले मूलभूत प्रश्न श्रोत्यांसमोर ठेवत होती. बोलता बोलता कोणा एकाची विचारधारा तुटली किंवा कोणाला नवा प्रश्न सुचला तर पुन्हा चर्चा सुरू करताना ग्रेस, विचार तोच असला

तरी, अगदी वेगळ्या शब्दांत मांडत. पहिल्या निवेदनातील विचारसौंदर्य रिचवण्याआधीच नव्याने शब्दसौष्ठवाचा भडिमार व्हायचा. हे सारे सुचते कसे याचा अचंबा वाटायचा. प्रत्यक्ष कार्यक्रमात हे निसटून जाणार नाही ना? हे आत्ताच खरोखर ध्वनिचित्रमुद्रित करायला हवे होते असे वाटत राहिले.

हा कवी ग्रेसचा शब्दचमत्कार; पण ग्रेस हे काही माझ्या दृष्टीने फक्त कवी ग्रेस नव्हते. ते माझे जिवलग मित्र होते. ग्रेस माझ्याहून वयाने दोन-तीन वर्षांनी लहान. मी माझ्या कुमारवयातच पुस्तक प्रकाशनाच्या छंदाची सुरुवात केल्यामुळे माझे बहुतेक सगळे लेखक माझ्याहून बरेच मोठे असायचे-काही तर वीस-तीस वर्षांनी. त्यांच्यापैकी अनेकांशी जवळीक निर्माण झाली तरी एखादा सदू रेगे सोडला तर बाकीचे अहो-जाहोच्या अंतरावरच राहिले. माझ्याहून वयाने लहान असे पहिले लेखक कदाचित ग्रेसच असावेत. सुरुवातीपासूनच आम्ही दोघेही अंतर ठेवून वागलो. मला वाटते, त्यांच्या ग्रेस ह्या नावाने घोटाळा झाला असावा. त्यांना माणिक म्हणणे मला शक्य होते. तसे म्हणायला हवे होते. ग्रेस हे काही त्यांचे पाळण्यातले नाव नव्हते. त्यांनी माणिक गोडघाटे ह्या नावाने कविता लिहिल्या होत्या हे त्यांच्या नागपुरातील मित्रांना ठाऊक आहे. जयंत परांजपे म्हणतात त्याप्रमाणे- 'लावण्याच्या नव्हाळी' सांगणाऱ्या त्या कविता माझ्या पाहण्यात आल्या नव्हत्या. त्यांचे नागपुरातील बरेचसे स्नेही त्यांना माणिकच म्हणत. पुण्याचा चित्रकार सुभाष अवचटदेखील 'आमचा माणिक कसा आहे?' असेच विचारायचा. मला खिजवायचे झाले की मग, 'तुमचा ग्रेस काय लिहितो आहे?' असे विचारणार. मी नुसते माणिकच नव्हे तर 'माणक्या' म्हणू शकलो असतो. परंतु ओळख झाली तीच मुळी ग्रेसची; तेव्हा कधी शाब्दिक पातळीवर अरे-तुरेवर आलोच नाही.

धुक्यावरून आठवले, माझ्या ग्रेसविषयीच्या बऱ्याचशा हकिकती धूसर आहेत. त्यांच्या कविता पावसात भिजलेल्या तर माझ्या आठवणी धुक्यात गुरफटलेल्या. कालक्रमानुसार काही आठवणे जड जाते. मुद्दाम संगती लावायची झाली तरी गोंधळल्यासारखे होते. एक नक्की की आधी त्यांच्या कवितांची भुरळ, नंतर ग्रेसची.

## तो गेला तेव्हा... : आशुतोष शेवाळकर

सोडून दिली तर आयुष्यात पुन्हा तिला हातसुद्धा लावला नाही! सिगारेट सोडतानाही असेच. एके दिवशी सिगारेट सोडायची असे त्याने ठरवले. त्यावेळी घरात पाचसहा पाकिटे पडली होती. कष्टाच्या कमाईने विकत घेतलेली पाकिटे वाया कशाला घालवायची म्हणून त्याने एक सिगारेट पेटवली आणि एकावर दुसरी पेटवत त्या दिवशी संध्याकाळपर्यंत सिगारेट पीत राहिला. शेवटची सिगारेट विझवली आणि त्यानंतर आयुष्यभर सिगारेटला हातही लावला नाही!

हा आस्तिकही होता; पण याची आस्तिकता विचारपूर्वक काढलेल्या काही निष्कर्षांनी किंवा काही प्रत्यंतरांतून आलेली आहे की केवळ असुरक्षिततेपोटी, हे मला कधीच समजले नाही. लहानपणी आईसोबत ताजुद्दीनबाबांकडे गेला असताना बाबांनी आपला झगा याच्या आईच्या अंगावर फेकला होता, ही आठवण तो नेहमी सांगत असे. ताजुद्दीनबाबा व दत्त ही त्याची श्रद्धास्थाने होती. मृत्युच्या पंधरा दिवस आधी हॉस्पिटलमधून अचानक गायब होऊन तो तीन-चार दिवस नरसोबाच्या वाडीला जाऊन राहून आला होता. शेवटी शेवटी चेहरावटीवरून तो शंकर महाराजांशी स्वतःला 'आयडेंटिफाय' करायचा. त्याच्या गाडीला ॲक्सिडेंट झाला त्या दिवशी नेमकी शंकर महाराजांची मृत्युतिथी होती! शेवटी शेवटी तर शंकर महाराजांचा फोटो हॉस्पिटलमध्ये त्याने आपल्या उशाशीच ठेवला होता!

शिक्षण म्हणूनही त्याने नावलौकिक कमावला. त्याच्या वर्गात विद्यार्थी तासभर पाठीचा कणा ताठ करून, तोंडाचा 'आ' वासून, अवाक् होऊन बसलेले असत, अशा आख्यायिका होत्या. 'मॉरीस' हे सरकारी कॉलेज होते. त्या काळी अनेक नामवंतांनी, साहित्यिकांनी कॉलेजची खास परवानगी काढून त्याचा एखाददुसरा क्लास अटेंड करून पाहिला आहे; पण त्याचा प्रोफेसर म्हणूनही तऱ्हेवाईकपणा हा होताच. एखादी कविता पूर्ण तासभर समजावून सांगितल्यावर शेवटी तो म्हणे, ''परीक्षेत लिहिताना गाईडमधलेच वाचून अर्थ लिहा. मी जो आत्ता तुम्हाला सांगितला तो अर्थ तुम्हाला ती कविता समजावी म्हणून. परीक्षेत तुम्ही परीक्षकांना जो समजतो तोच अर्थ लिहा, नाहीतर नापास व्हाल!''

ग्रेस याचे संपादक म्हणून कार्य फारसे उल्लेखिले गेलेले नाही; पण तो उत्तम संपादकही होता. 'युगवाणी'चे संपादन करताना त्याचा नेहमीचा ताठा सोडून, स्वतः एवढा मोठा लेखक असतानाही नमते घेऊन त्याने अनेक नवोदितांना लिहिते केल्याच्या आठवणी अनेक लोक सांगतात.

'दीपोत्सव' दिवाळी अंकाचे त्याने चार वर्षांपूर्वी संपादन केले ते मला वाटते त्याचे शेवटचे संपादनकार्य. तेव्हा मला स्वतःलाही हा अनुभव आला. आळसामुळे मी टाळाटाळ करीत होतो तेव्हा अत्यंत मारकुंड्या शिक्षकासारखा त्याने माझा पाठपुरावा केला आणि एकदा कबूल केल्यावर मग ग्रेस संपादित करणार असा ऐतिहासिक महत्त्वाचा अंक, त्यात असणारे थोरामोठ्यांचे लेखन आणि लेखनाविषयी आधीपासूनच असलेला न्यूनगंड या सर्वांमुळे 'डीफिडन्स' येऊन माझ्या हातून काही उतरेना. वडील ज्या क्षेत्रात मोठे असतील त्या क्षेत्रात मोठे होणे ही मुलांसाठी अत्यंत कठीण गोष्ट असते. एकतर सावलीतल्या बीजाला अंकुर हळूहळू फुटत असतो आणि नुकताच अंकुर धरायला येतो तोपर्यंत याला फळ धरत नाही म्हणून लोकांनी त्याला मोडीतही काढून टाकलेले असते. ग्रेसची मिथिला आणि सुरेश भटांचा चित्तरंजन यांनी सुरुवातीच्या काळात चांगले लेखन केले. स्वतःला दुसऱ्या कुठल्या क्षेत्रात चांगले उभे करू शकले नसते तर ते लेखक म्हणूनही पुढे मोठे झाले असते, असे मला वाटते. मला आलेला 'डीफिडन्स' अत्यंत समंजसपणे ओळखून तेव्हा त्यांनी मायाळूपणे 'तू नुसते बोल, मी लिहून घेतो' अशी तयारीही दाखवली. ग्रेससारख्या माणसाला आपल्यासाठी लेखनिकासारखे काम करायचे म्हणावे लागते आहे याची मला इतकी लाज वाटली की, त्या लाजेखातरच मग माझ्याकडून तेव्हा लिहून झाले.

लोकांना काय समजते, काय आवडते याची त्याला जाण नव्हती असे नाही. उलट, ती जाणपण त्याची अत्यंत प्रगल्भ होती. संपादनात ती दिसून यायची; पण लोकांना आवडावे, समजावे म्हणून आपल्या कलाकृतीत काही बदल करणे त्याला मान्य नव्हते. तो म्हणायचा, 'I can become small for you but not simple !' मी या वर्षीच्या १ जानेवारीला नवीन वर्षाचा नमस्कार करायला फोन केला आणि या वर्षीपासून 'सकाळ' वृत्तपत्रात सदर लिहायचा संकल्पही सांगितला.

'जगता जगता' आणि 'आत्मसंवाद' अशी दोन नावे त्या सदरासाठी माझ्या मनात होती. कठीण नाव ठेवले तर लोक खालचे वाचतच नाहीत, असे म्हणून त्याने मला 'जगता जगता' नाव नक्की करायला सांगितले.

त्याला सिनेमाची प्रचंड आवड होती. जुने हिंदी, इंग्लिश सिनेमे तर त्याने त्या काळी आवडीने पाहिलेच; पण तो आताआत्तापर्यंतही मूड आला की, कुठल्याही सिनेमाला जाऊन बसत असे. तसेच जुन्या हिंदी सिनेमांची गाणीही त्याच्यावर पगडा धरून होती. साध्या बोलण्यात वा भाषणातही तो कुठल्या तरी गाण्याच्या मधल्या ओळी अचानक 'कोट' करत असे. साधं होटेलला जेवायला गेले असताना भाजी तिखट आली तर तो 'हमने मांगी थी सुरमेदानी, जालीम ले आया बनारस का जर्दा...' असे म्हणत असे.

इन्ग्रिड बर्गमन ही त्याची प्रचंड आवडती नायिका. तिच्या या १९५८ साली आलेल्या सिनेमाने तो त्या काळात पछाडला गेला होता. या सिनेमात तिचे नाव 'ग्रेस' होते म्हणून याने मग स्वतःसाठी 'ग्रेस' हे नाव निवडले. त्याआधी तो 'माणिक' नावाने कविता लिहीत असे. 'संध्याकाळच्या कविता' हे पुस्तकही त्याने तिलाच अर्पण केलेले आहे.

देखणा म्हणता येईल असे याच्या चेहऱ्यात काहीच नव्हते. अत्यंत बोलके डोळे सोडले तर चेहऱ्यात विशेष असे काहीच नव्हते; पण तरीही हा प्रचंड 'फोटोजेनिक' होता. याच्याइतका 'फोटोजेनिक' जगभरातल्या साहित्यिकांपैकी कुठलाही दुसरा साहित्यिक माझ्या पाहण्यात नाही! म्हणूनच बहुतेक सगळेच फोटोग्राफर्स, चित्रकार, शिल्पकार यांना याचे फोटो, चित्रे, स्केचेस काढण्याचे, शिल्प करण्याचे वेडच लागलेले असायचे आणि याच्या घरी फोटोज् आणि पेंटिंग्जचा खच पडत असे.

याचा 'ड्रेसिंग सेन्स'ही जबरदस्त होता. साधेच कपडे पण त्यांची निवड अशी काही असे की, हा नेहमी अत्यंत 'ग्रेसफुल'च दिसायचा. शेवटच्या दिवसात 'केमोथेरेपीने' याचे केस व दाढी गेल्यावर हा आयाळ कापलेल्या सिंहासारखा बोडका दिसायचा; पण त्याही स्थितीत गोल फेल्ट हॅटसारखी टोपी आणि इंग्लिशमनसारखा ओव्हरकोट घालून हा 'ग्रेसफुल'च दिसे. अगदी शेवटच्या आठवड्यात बेशुद्धीतून एक दिवस शुद्धीत आला तेव्हाही त्याने गुलजारच्या भेटीसाठी अक्षरे असलेला

बिनाकॉलरचा शर्ट घातला होता. त्या खस्तावलेल्या स्थितीतही तो 'ग्रेसफुल'च दिसला!

पिणे सोडल्यावर त्याची जागरणे बंद झाली. मग तो पहाटे तीन वाजता उठत असे आणि डिसेंबरच्या कडाक्याच्या थंडीतही बरोबर चारच्या ठोक्याला त्याची उडी शासकीय स्वीमिंग पूलच्या थंड पाण्यात पडत असे. दुसरे कुणी पोहायला यायच्या आत तो बाहेर पडायचा. पूर्ण 'पूल'मध्ये एकट्याला पोहायला त्याला आवडायचे आणि या शिरस्त्यात एक दिवसही खंड पडत नसे.

अशा अपरात्री तीन वाजता पोहायला जाण्यामुळे एके दिवशी रिझर्व्ह बँक चौकात त्याला एका हवालदाराने अडवले. त्याच्या प्रश्नांना उत्तरेही याच्या नेहमीच्या तऱ्हेवाईकपणे मिळाल्यामुळे हवालदाराचा संशय आणखी वाढला. समोरच असलेल्या मॉरिस कॉलेजमध्ये आपण शिकवतो या बोलण्यावरही मग त्याचा विश्वास बसेना. त्याने याला बर्डी ठाण्यात नेऊन सकाळपर्यंत बसवले. सुदैवाने अरविंद इनामदार तेव्हा नागपूरचे पोलीस कमिशनर होते. सकाळी नऊनंतर ड्युटीवर आलेल्या तिथल्या इन्स्पेक्टरने फोन लावून दिल्यावर मग याची सुटका झाली. त्या हवालदाराची मग इतकी कानउघाडणी झाली की, तो हवालदिल झाला! त्यानंतर तो हवालदार दोन-तीन दिवसांनी याला भेटायला घरी आला व त्याच्या मुलाची पोलीस भरतीसाठी इनामदारांकडे शिफारस करायला विनंती करू लागला. याने तशी शिफारस करून त्याच्या मुलाला नोकरीला लावूनही दिले!

त्यानंतर याने अरविंद इनामदारांसोबत स्वतःचा एक फोटो काढून घेतला व तो नेहमी खिशात बाळगत असे. पुन्हा कुणी हवालदाराने अडवले तर त्याला तो दाखवून स्वतःची सुटका करून घ्यायला म्हणून!

त्याचे आणि माझे नाते काय होते, हा प्रश्न मला बऱ्याचदा पडला आहे. १९८८-८९ साली आमची पहिली प्रत्यक्ष ओळख झाली. तसा वयाने मी त्याच्या मुलांपेक्षा पाच-सहा वर्षांनी मोठा आणि तो बाबांपेक्षा पाच-सहा वर्षांनी लहान; पण मला तो पहिल्यांदा भेटला तेव्हापासून मित्रासारखाच भेटत आला. कधी कधी तर मला त्याचा बाप व्हावे लागले. गेली पंचवीस वर्षे हे संबंध सलग कायम राहिलेत असे नाही.

मध्ये दुरावा, रुसव्या-फुगव्यांचाही काळ आला; पण उभयपक्षी पुढाकाराने पुन्हा आम्ही जवळ येत गेलो. ९०-९१ सालानंतर एकदा तर तो सलग दोन-तीन वर्षे माझ्याशी बोललाच नव्हता. अचानक एक दिवशी एका रेस्टॉरंटमध्ये थोड्या दूरवरच्या टेबलावरून मला त्याचा आवाजही ऐकू आला. नंतर मला पाहूनही दुर्लक्ष करून तो जातानाही दिसला. अचानक काही तरी वाटून मीच त्याला मोठ्याने 'राम राऽऽम गुरुजी' असा आवाज दिला. त्याला बरे वाटल्यासारखे दिसले. तो माझ्या टेबलापाशी आला; पण माझ्याशी प्रत्यक्ष बोलणे टाळून आमच्या टेबलावरच्या सगळ्यांशी बोलावे तसे औपचारिक, स्वतःच्या नवीन कविता ऐकवणे वगैरे असे काही तरी बोलू लागला. त्याला मध्येच थांबवून ''अरे हट! इसको क्या कविता बोलते क्या? ये मेरी नयी सुनो.'' असे मी म्हणालो. तो एकदम हबकलाच. मग स्तब्ध झाला. मग ''सुनाओ'' म्हणाला. मी त्याला 'दूर कुठून तरी किरमिजी रंगाचा पाऊस येतो...' या त्याच्याच कवितेतल्या ओळी ऐकवल्या! त्या ओळींचा शेवट 'हृदय सजविणारा मित्र नाही रे उशाशी... घरभर घन आले आत ये ना जराशी' असा होता. एका क्षणासाठी तो सुन्न झाला. मग त्याने मला एकदम मिठीच मारली आणि क्षणार्धात आमच्यातला दुरावा संपला!

❖❖❖

# केरळीय कलामंडलाच्या टिपणातील आर्त!!

*शेवटी नक्षत्रलोकाची हुलकावणी देत, एकदाचा मान्सून केरळीय कलामंडलातून उसासत, धापा टाकत आपल्या भूमीवर येऊन आदळलाच. केशव! या केरळीय कलामंडलातील पावसाचे एक गुपितरहस्य मला बालपणापासून ठाऊक आहे. हो, केरळीय कलामंडलातील पाऊस, हजारो वर्षांपासून इथे, तिथे, या भूमीला पाऊस पाण्याचे संदेश पोहचवीत आलेला आहे. आणि तरीही आपल्या अंतर्यामातील गुपिताची गाणी, त्याने ना ढगांसमोर उघड केलीत, की प्राचीन प्रेयसी, सौदामिनी हिलाही, या गुपित गाण्यांचा कानमंत्र दिला नाही. रहस्ये जरूर उघडी करावीत पण त्यांच्या उगमांचा बांधील देठ मात्र कधीही तोडू नये. दुसऱ्या कुठल्याही देशीच्या पाऊसपाण्याचे फूल केरळीय कलामंडलातील पावसाच्या या उगम देठाला जोडून देऊ नये. An eye for eye only ends up making the whole world blind! हा हिंसेच्या निषेधाचा मंत्र गांधींनी आपल्या स्मितरेषेवर गुणगुणत, गुणगुणत साकार केला आहे. तर केशव, गांधींच्या या निषेधमंत्राने मी जर या पाऊसपाण्यावर, असे चिमुकले भाष्य केले तर?*

*An eye for eye, is not my vision. An eye into the eye is my creative conviction. केरळीय भूमीचा एक विशेष असा आहे की, she has wonderful boundaries nearer to the sun. Let the sun be rising, let it be descending or let it stand in between, the sky is always over our heads. त्याच्या जवळिकेचा भास, केरळीय कलामंडलाच्या सुसज्ज क्षितिजाच्या भिंती, थोडाही कमी होऊ देत नाहीत. पाऊसपाण्याची पाठवणी, आपल्या अलमदेशाला मात्र कला-मंडलातून पोचली होती.*

*हे केवढे उदार, भव्य, भौगोलिक काव्यसत्य आहे!*

*आत्ता या पाऊसपाण्यासंबंधी माझ्यासारखा कवी, केरळीय*

*कलामंडलातील पावसासाठी, स्वागताची आरती अशीच सजवील ना!*

*काही सांगितले नाही*
*तूही मागितले नाही;*
*येता पडवीत पाणी*
*तेही ओशाळले नाही!*

*दिसे अंगण कोरडे*
*नाही लागला सुगावा;*
*अख्ख्या वेळूवेचणीत*
*नाही सापडला पावा!*

*मग एकाएकी कसे*
*आले भरून आभाळ;*
*जस्सा जिवाच्या बोलीने*
*होई जिवाचा कल्लोळ...*

*काय देवाची करणी*
*अस्सा असतो पाऊस?*
*कधी राणीची पालखी*
*कधी राजाचा उरूस?...*

*केरळीय पावसाचा पहिला कैफ इतका निर्मितिधुंद असतो की, त्याला प्रारंभाच्या देहोत्सवाचे भानच उरत नाही. जसे निर्मितीच्या कौतुकातच साऊलचा स्वप्नपुरुष मुक्रर झाल्यामुळे, तिला देहोत्सवाचे टिचले, पिचले भान कधी सुटेपणाने जाणवलेच नाही. त्याच्या निर्मितीच्या प्रभावी लहरीतच, तिचे सारे आयुष्य सद्‌गदून, बेभान होऊन, रंग पुष्करिणीत नाचत नाचत विरत गेले.*

*पण शेवटी याच स्वप्नपुरुषाच्या निर्मितीच्या तंद्रीच्या चढउताराने, तिच्या पायावर चढलेली भूमीची जाणीव, याच स्वप्नपुरुषाने उकरून काढली. प्रकाशाला पर्याय नसतो आणि अंधाराला सावली नसते. या प्रकाश सावलीच्या खिंडीत साऊल सापडली. आणि शेवटचा, निकराचा*

*देहोत्सवाचा प्रयत्न म्हणून, त्याच्यापुढे केरळीय कलामंडलाचे टिपण सादर केले. केवळ फक्त तो आणि मी, मी आणि तो. केरळीय कलामंडलाच्या निस्सीम समुद्रपंथात खरेच, वेगवेगळ्या लाटांवर, वेगवेगळ्या खोल्यांमध्ये राहणार होतो काऽऽय?*

*केवढा निर्लज्ज प्रश्न, पण तेवढाच सलज्ज, शालीन आणि सत्य नाही काय? निर्मितीत बुडालेल्या थांग-अथांगाचे अंतर मिटविण्याचा एकमेव मार्ग म्हणजे, निर्मितीचा महापूर ओसरल्यावर देहोत्सवाने संग तत्त्वाची सांगता करणे.*

*आता हेच बघ ना केशव! देह तत्त्वाची साऊलची शारीरधून, तिच्या एका मैत्रिणीने अलगदपणे ओळखली आहे. साऊलने तिचे नामकरण, आपल्या साऊलवृत्तीप्रमाणेच केले आहे. ती तिला गझलिंग गीता म्हणते. सबब ती संदेशवाहिनीवर, पाऊसकाळात भरभरून गझलांच्या ओळी धाडीत असते, म्हणून ती गझलिंग गीता. साऊलचा छायापुरुष. मंत्रविधीने जोडलेला जोडीदार! केशव, अशाच जोडीदाराला छायापुरुष म्हणायचे?*

*Do you like Keshav! This, my new definition of husband, husbandship? आणि म्हणूनच या छायापुरुषाने, एकदा साऊलच्या संदेश पताकेवर एक घोषवाक्य, जबाबदारीने लिहून दिले. तू कुणालाही संदेश धाड, त्या संदेशाचे परिवर्तन आपोआपच होऊन, त्याचा स्वप्ननायकासाठी मूर्तिमंत शिलालेखच होऊन जातो. तर केशव, आपला मुद्दा होता, गझलिंग गीताचा. नुसतं गॅझल किंवा गझाला जरी झाले असते तर हरिणांतील एका नव्या जातीचे संमोहन, दचकून पुढे आले असते. आणि पुराणातील कांचनमृगाच्या सालीचा मायावी पेच सीतेपुढे उभा ठाकला असता. आणि या पाऊसपाण्यात लक्ष्मणाने ओढलेली खडीसाखरेची रेघ वितळून गेली असती ना!*

*याच पाऊसकाळात साऊलच्या संदेशवाहिनीवर गझलिंग गीताचा अस्सा संदेश आला आहे. तो असा-*

*It's a scientifically proved fact that sugar dilutes into water. You sugar cube! Don't go out in the rain, म्हणजे, साऊल वितळून जाणार! But she is not a sugar cube. She is sugar serene! मिनार वितळतात. स्मारके वितळत नाहीत. And after*

*all Keshav, this is my rain. ग्रेसचा पाऊस आहे हा! केरळीय कलामंडलातून पावसाची देणगी मिळाल्यावर, तिची थेंब शिंपडणी माझ्या निर्मितिप्रदेशात मीच स्वतःहून करतो आहे ना? साऊल! This rain of mine, will never yield you an inch! Of course, it demands your polite pause, halt. to look at the rainbow, raindear!!*

*केशव! काव्यभाषेची तुलना मातृभाषेशीच करता येते. मातृभाषा म्हणजे मायदेशातील भाषा नव्हे. आईच्या दूध पाण्यातून झिरपत झिरपत, कवीच्या कुंडलिनीतून प्रवास करीत करीत, पाठीच्या कण्यातूनच, मेंदूत असलेल्या चंद्रामृताच्या तळ्यात विसर्जित होते, त्या काव्यभाषेला कवीची मातृभाषा म्हणावयाचे.*

*म्हणजे कवी निर्धास्त आणि त्याचा रसडोळस, विदग्ध रसिकही निर्धास्त. केशव, केवढे हे वरदान! मग काय होते केशव, कवी शांतपणे इतरांना म्हणू शकतो, Please, you correct the mistakes of the grammar. Let me attend to the glory of expressions!*

*केरळीय कलामंडलाच्या देहोत्सवाचा प्रस्ताव साऊलकडून समोर येताच, पुन्हा जिवाच्या आकांताने, देहधिप्पाड छातीचा तिचा स्वप्नपुरुष, अधोमुख होऊन आतड्यातून, पोटातून कळवळला. साऊल सैरभैर झाली. केरळीय कलामंडलातून पावसाचे एक सूचन पारव्याच्या रूपाने तिच्या सौधावर उतरले-*

*देह दावणीला बांध*
*जीव उरातून फोड;*
*हळू नाचत येईल*
*तुझ्या अंगणी पहाड...*

*ही शकुन निमित्तांची केरळीय सूचना साऊलने अंगोअंगी लपेटून घेतली आणि प्रस्तावाच्या होकाराची दिशाभूल वाट पाहत राहिली. दिशाभुलीच्या अंतरात स्वप्ननायकाने आपल्या जिवाची काहिली, काहिली करून घेतली. पण उन्नयनाची, उत्थापनाची या घर्षणात एकही ठिणगी उसळलीच नाही.*

*अरे केशव! देहोत्सवाला दोन देहांच्या संमीलनाची नितांत नैसर्गिक गरज असते. हे विश्वाचेही सृजनसूत्र आहे. कलाकृतीचा तर तो प्राणच*

*आहे. पण देहोत्सवाची कळ, देहोत्सवाच्या चैतन्याची कळ, कुठे कशी दाबावी हेच कळत नाही. आणि त्याचे रहस्यगुपित फक्त केरळीय कलामंडलातील पावसाजवळच आहे. ते गुपित त्याच्या संभवामि युगायुगांचा प्राण आहे. आपण केवळ या गुपितांच्या काव्यभव्य शक्यताच पकडू शकतो. मी एक शक्यता पकडली आहे.*

*ती साऊलकडे संदेश म्हणून पाठवून देतो.*

*देह सुकुमार बाई*
*त्याला मायेने सोलावा;*
*ज्याला पुरती वल्कले*
*तोच शोभतो नागवा...*

*शेवटी कित्येक वर्षांच्या माघार-बोळींतून, साऊल आपल्या स्वप्ननायकाच्या भव्य प्रदर्शनाची आरास सावरण्यासाठी त्याच्या दालनात प्रविष्ट झाली. तिच्या संपन्न, लाघवी, सृजनशील मायावैभवाने, नखशिखांत दिपून गेलेला तिचा स्वप्ननायक शुद्ध गमावून बसला. आणि त्याने तिच्या पाठीवर मोरगोंदणीची रंगधून थाप मारली... नऊ महिन्यांच्या गरोदरी मायागुंजनात ती अकस्मात शिरली... तेव्हा सृजनमोक्षाचे सर्व अभिसार निनादत गेले... निनादांतून निखळून पडलेल्या एका विशुद्ध संदेशवाहिनीवर, साऊलच्या ओठांवर थरथरणारे हे आत्ताचे संदेशशब्द मला मोक्षाच्या वाटेचे कोणते नवे परमधाम दाखवीत आहेत?*

*I am the luckiest! The chosen one, hand picked by the God,*

*for you ... I doubt if any one can love like you...*

*Remembered a song heard in London, when I was a child...*

*If the whole world starts loving, the way you start Loving me...*

*साऊलच्या संदेशवाहिनीतील अक्षरांनी सद्गदित होऊन कित्ती, किती दूर निघून गेली असेल ती! थेट डॉ. झिवॅगोच्या बर्फवर्षावातील राहुटीपाशी... क्षीण चंद्रप्रकाश. मधुर उदासीनता. राहुटीच्या खिडकीपाशी उभा असलेला एकटा, उपाशी लांडगा... Yes, Keshav! Since then*

*I have been always trying to offer a dry fish to a hungry wolf. That he should never dare to disturb the sleep of Lara and the melancholy of Dr. Zivago's poetry, because I feel that all the stunts of brain and agonies of the heart must rest in poetry alone!*

*No higher aspiration I carry within me, rather than this!*

❖❖❖

# माझ्या भावनिर्मितीतील प्राचीन सभ्यतेच्या पाषाणलहरी

*जवळजवळ संपूर्ण आयुष्यातच असे पहिल्यांदाच घडून येते आहे की, हिवाळ्याच्या प्रारंभाच्यावेळी- पाऊसकाळ आणि शिशिरकाळ ह्यांच्या ऋतुपरिवर्तनाच्या हस्तांदोलनसमयी- समग्र ताटातुटीच्या उत्कट विळख्याच्या समयी, मी माझ्या राहुटीत-पंथविरामी-पंथविरामाच्या परिसरात नाहीये...*

*मी करवीरवासिनी, देवी जगन्मातेच्या परिसरात, हिवाळी प्रारंभाची पहिलीवहिली शाक्त झुळूक, स्वतःच्या अंगावर शिरशिरवून घेतोय. एक दृष्टीने पाहिले, तर ऋतु परिवर्तनाची माझी आदिम वहिवाट या ठिकाणी तुटली नाही पण विद्ध झाली आहे. आणि करवीरवासिनी जगन्मातेने, ऋतु परिवर्तनाच्या हिवाळी झुळकेची एक लहरवंत, हळुवार जखम माझ्या शाक्त शरीराला शृंगारून दिली आहे. हलक्याफुलक्या वाऱ्यावर झुलणारी उसांची साधी, वेडीबागडी क्षितिजे आणि चौर दृष्टीच्या वेधावर तरंगणारे, जगन्मातेचे भगवे, केशरी रंगविभोर संध्याकालीन आकाश, इचलकरंजीच्या हृदयनाथ मंगेशकरी चहात्यांनी (श्री. दिलीप शेंडे-पतिपत्नी) आपल्या गावाच्या वाटेवर, असलेल्या खिद्रापूरच्या शिवालय मंदिरी, माझी संध्याकाळ मुक्रर करून ठेवली होती. केशव, very strange but at the same time Keshav, very very truthful my dear, whatever divine and great comes before you or covers the identity of your soul, makes you instantaneously depressed and terribly sad. याला कोणीही अपवाद नव्हता. आणि ही उदासीनता जगातील निर्मितिवंतांचे अक्षय मोक्षधाम आहे, हेही इतिहासाने, वैतागाने आदळआपट करून का होईना, कधी टाळ्या पिटीत तर कधी ऊर बडवीत जाहीर केलेले आहे. कदाचित इतिहासाने आजपर्यंत आपल्या पोटात दडविलेल्या मनुष्यजातीच्या निर्घृण, निर्दयी हत्याकांडांची अनंत पापे गुपचुप दडवून ठेवली आहेत, ह्या अपराधीपणाच्या जाणिवेतून हा काळ, निनादी इतिहास प्रतिभेला आणि प्रतिभावंतांना कदाचित असे*

*कुर्निसात करीत असावा! देव जाणे!*

*केशव, तेही जाऊ दे. You are quite aware that I am terribly nostalgic at the point of every season change. तर, यावेळी मी मोजून मापून बोलावयाचे झाले तर, पंथविराम आणि त्याच्या परिसरापासून एक हजार दोनशे सतरा किलोमीटर दूऽऽर दूऽऽर आलो आहे. पण निर्मितिकुळाचा सत्यशील शाक्त असल्याने केशव, तितकाच करवीरवासिनी जगन्मातेच्या जवळ आलो आहेच ना? हा दुरावा आणि ही जवळीक दोन्हीही किती क्रूर, भीषण आणि करुणामय अनुभव आहेत.*

*मुद्दा आहे, ऋतुपरिवर्तनाच्या वेळी मला घेरणाऱ्या उदासीचा! होते काय की, रक्तातील चांदणीचा डंख आणि रक्तातील सर्पिणीचा दंश यांच्यातील चांदणी डंखाचे विदग्ध काहूर आणि सर्पिणी दंशाचा चंदनी डंख, या अनुभवाची बोळवण आपले कवी 'बी' यांनी अशी केली आहे, केशव!*

*चंदन विटपा जसा लपेटा जहरे नागिणीचा......*

*हेच 'बी' कवी महाशय निळीये सारणी वाहे मोतीयांचे पाणी, या ज्ञानेश्वरीय अभंग ओळीचे-निळ्या सारणीमध्ये वाहे मोत्यांचे पाणी, असे सुंदर सुलभीकरण करतात. तात्पर्य, विष आणि अमृत, जहर आणि तेजाब, झुळूक आणि फुंकर, वादळ आणि हवा या भिन्न-अभिन्न जोड्यांच्या आधारावर, जीवनाची मदार सतत पडताळून पाहत पाहत, खरे तर केशव, आपण जीवनाचा कैवार घेणारे तथाकथित जीवनवादी, जीवनाची डागडुजी करत असतो. डागडुजी म्हणजे काय?*

*आतून खिळखिळा झालेला ऐवज सावरणेच ना? अरे केशव! तुम्ही आम्ही माणसे म्हणजे किस झाडकी पत्ती? प्रेषित आणि संतांनी तरी काय केले बाबा? हीच, डागडुजी केली ना! या सतत खचणाऱ्या जीवनाला पुस्ती, दुरुस्तीच जोडली ना? साक्षात ख्रिस्तच तर, आपल्या आगमनाची दवंडी अशी पिटीत आला- I have not come to destroy but to fulfil. याला अपवाद फक्त कलावंतच, प्रतिभावंतच. कवी, ज्याचे पहिले आणि अंतिम कार्य म्हणजे जीवनाचे पूर्णाकृती, पुनर्निर्माण करणे. पण बाबा, केशव, पानाफुलांची, झाडांची आयुष्यभर निगा राखूनही, निर्मितीच्या सुप्तसूत्राचा अंदाज तुला घेता आला नाही. आणि गुलमोहरी*

*हत्येच्या पापाचा धगधगीत कलंक तुझ्या माथ्यावर सटवीने गोंदलाच ना!*

*पूर्णाकृती पुनर्निर्माणाच्यासाठी कलावंताला, जीवनाची समग्र सामग्री कृतज्ञतापूर्वक उचलूनही, जीवनाशीच कायमचे ताटातुटीचे हेतुपूर्ण क्रूर अनुसंधान जुळवावे लागते. अवघड गोष्ट आहे. प्रत्येक ऋतुपरिवर्तनाचे वेळी, माझा नॉस्टेल्जिया केशव, मला माझ्या मूठभर संसाराच्या, मिथिला, माधवी, राघव या त्रिवेणीत अडकलेल्या, राखरांगोळी झालेल्या, विस्कळीत झालेल्या निर्जन पठारावरच आणून सोडत नाही, तर तो मला माझ्या निर्मितिविश्वातील प्राचीन सभ्यतेच्या-असभ्यतेच्या, प्राचीन पाषाणलहरींपाशी आणून उभा करतो- केशव! जीवन जगताना अशी निर्माणसंधी मिळालेली नाही, प्रारब्धाकडून. ज्या छोट्यामोठ्या संधी मिळतात त्या सर्वांचा सदुपयोग, दुरुपयोग केशव, माझ्या भातुकलीतील तुटलेल्या, फुटलेल्या खेळण्याची डागडुजी करण्यातच घालवितो.*

*घोडा, केशव, शर्यतीचा असू दे, अश्वमेधाचा असू दे- शर्यतीत हरून आपल्या पायावर बंदुकीची गोळी टाचणारा असू दे- गतिवेगाच्या मंथनात तो खिंकाळून आपली आयाळ लहरवत नसेल तर ते अश्वकूळ कमअस्सल अवलादीचेच म्हटले पाहिजे. निर्मितीची औकात अशी ओळखता येत नाही. तुमचे छोटेमोठे अश्व, त्यांचे भोळेभाबडे अश्वदूत थांबतात, कधी विसाव्यासाठी, कधी सोसाव्यासाठी, ते फक्त जीवनापाशीच. तर तर ते सुस्वागतम, स्वागतशील संधींचे, आमंत्रित, निमंत्रित, अभिमंत्रित, अगत्य स्वीकारण्यासाठी-*

*सर्प देखणे सावज*
*दिव्य सर्पिणीचा फणा;*
*काय ज्ञानिया ऐकतो*
*घणु असा घुणघुणा?*

*अंध निर्मितीच्या नादी*
*बांध बांधितो आरुणी;*
*जे जे नेकीने सडते*
*त्याची होतेच वारुणी...*

*अफाट गर्जना करणाऱ्या मेघाला, ज्ञानियांच्या राजाने, आपल्या*

*प्रतिभा चमत्काराने घुणुघुणु नाद करायला शिकविले आहे. पण इथे ज्ञानियांचा अश्व जीवनापाशी थांबलेला नाही.*

*एक तर ज्ञानियांच्या अश्वाला त्याचा अश्वदूत नाही आणि श्रीज्ञानेश्वर कुठल्याही अश्वशाळेचे पालक नाहीत. पण निर्मितीच्या गतिलयीचा अश्वघोष या ज्ञानियांचा प्रातिभिक आहे. म्हणजे श्रीज्ञानेश्वर माऊली, त्यांचा अश्व, त्यांच्या प्रातिभिक गतिलयीच्या स्पंदनाचा अश्व, जीवनाच्या पुनर्निर्माणाशी थांबला नाही, केशव, थबकला आहे. This spot is not, a spot of stoppage! This is a lingering spot, where you have to slow down your speed! निर्मितीचे हे रहस्यजाल, निर्मितिसंभवाची ही शाक्तलिपी फार थोड्यांना कळली आहे. मला एका भिल्लाची कथा, सुमित्रेने सांगितलेली, आठवते. ती अशी : भीमक राजय्या नावाचा हा भिल्ल, काळा पाषाण तासलेल्या रंगाच्या आपल्या बालमैत्रिणीला, मोहाच्या फुलांची नजरबंद दारू आणि मोहाच्या फुलांचा नजरनखरा नेहेमीच प्रदान करीत होता. मदिरा प्रवासाच्या या जीवनवाटचालीत, काळ्याशार पाषाणाप्रमाणे तासलेले ते त्याच्या बालमैत्रिणीचे शरीर, मोहाच्या फुलांची दारू आणि मोहफुलांच्या श्रृंगाराने चकचकीत होऊन-*

*शरीराचे देणे घेणे*
*त्याचे द्यावे दान;*
*पायाखाली फुले येता*
*उपटावे तण...*

*या न्यायाने थेट दुसऱ्याच शरीराला जाऊन बिलगावे आणि राजय्या भिल्लाच्या हृदयात पेरलेला सुतळीसुरुंग हळूहळू करपत, करपत जळू लागला. या प्रतारणेला मारण्यासाठी राजय्या आता दुसरे विष आणि दुसरे अमृत शोधणार तरी कसे? निर्माणात डागडुजी संभवते, दुरुस्ती, पुस्ती संभवते. पुनर्निर्माणात असली कुठलीच फारकतीची सोय नसल्यामुळे, ज्या शस्त्राने पोटाच्या भुकेसाठी, ज्या झाडाचे फळ तुम्ही तोडले, त्याच शस्त्राने त्याच फळाला भोसकून, ते फळ जिभेवर ठेवावे लागते, हा निर्मितिविश्वाचा घरंदाज संकेत आहे.*

*खिद्रेश्वराच्या सायंकालीन पाषाणलहरीत मी लपेटला गेलो. आणि माझ्या निर्मितीतील सभ्यतेच्या पाषाणलहरींच्या परीक्षणाची परिक्रमा,*

*उमापार्वतीच्या शंकराच्या साक्षीने, या संधिकालात पुन्हा एकदा सुरू झाली.*

*केशव! खरे सांगायचे झाले तर आत्ता मी जीवनाच्या कक्षेत, परिघात नव्हतोच. जीवनाच्या सौंदर्यानुभवात मी नव्हतो. मी थांबलोही नव्हतो- चालतही नव्हतो. मी फक्त माझ्या प्रातिभिक भाराने तोल जाऊन हलत होतो, डोलत होतो. संध्याकाळच्या केशर भगव्या तिरिपेतून येणारे रंगीत केशर भगवे झोत, बाहेरच्या पाषाणमूर्तीवर रेंगाळत होते.*

*यक्ष आणि यक्षिणी आणि त्यांचे वाहन हत्ती. नवजात यक्षिणीपासून तर नवजात यक्ष, सर्वांचा शृंगार, भावविभाव तसूतसूंत शिल्पबद्ध झाला होता. नवजात यक्षिणींचे वर्णन ते काय करायचे केशव? वृद्धत्वाने जर्जर झालेल्या काही यक्षिणी दाखविल्या होत्या. त्या खरेच वृद्ध झाल्या होत्या का? त्यांचे मांस गळतीला लागले होते, पण गळणाऱ्या मांसातून डोकावणाऱ्या शुभ्र धारदार हाडांनी त्या पाषाणात शुभ्र अंकुरांची नवीन व्यवस्था मांडून दाखवली होती...*

*काय आश्चर्य केशव! विध्वंसकांनी सतराव्या शतकात या खिद्रेश्वराच्या मंदिराची तोडफोड केली. यक्षिणींचे नाक आणि स्तन फोडण्यात आले, ही काही नवलाईची गोष्ट नाही. शूर्पणखेच्या संदर्भात लक्ष्मणाने तरी काय केले केशव! या तर सौंदर्यवती यक्षिणीच होत्या. त्यांची नाके आणि स्तन फोडणार नाही तर विध्वंसक काय करतील? आणि तरीही या खिद्रेश्वराच्या मंदिरातून पूर्णत्वाकडे जाणाऱ्या पुनर्निर्मितीची, जीवनाच्याच पुनर्निर्मितीची परिपूर्ण वाढ दिसत होती. केशव, या ठिकाणी डी.एच. लॉरेन्सच्या हत्तीशृंगारावरची कविता आठवली. The elephant is slow to mate. डी. एच. लॉरेन्स हा फार शहाणा प्रतिभावंत होता. एवढ्या महाकाय, अवजड प्राण्याचा संभोग दाखविणे-तोही पुनर्निर्माणाच्या प्रतिकृतीच्या कलात्मक प्रतीकाने! हत्तीची केवळ संभोगशक्ती नाहीच तर समग्रशक्ती संभोग इंद्रियात नसते, हा साक्षात्कार डी. एच. लॉरेन्सला झाला. त्याच्या समग्र जीवन ऊर्जेचे शक्तिकेंद्र त्याच्या सोंडेत असते. संभोग, सोंडेने तो करीत नसला तरी संभोगाची ऊर्जा तो सोंडेच्या श्वासातून प्राप्त करतो. हे विदग्ध सत्य विध्वंसकांनी ओळखले- आणि विध्वंसकांच्या माथेफिरू लहरीत काही यक्षिणींचे स्तन आणि नाक*

*कापायला विसरून गेले- पण त्यांनी प्रत्येक हत्तीची सोंड मात्र बंदोबस्तात तोडून फोडून ठेवली आहे, खिद्रेश्वरात केशव!*

*पेनिलोप क्रूज ही अश्वसूत्र नटी तुम्ही पाहिली आहे काय? All horses are pretty, या बोलपटात पाहा. जरा पाहा तर! आगगाडीच्या ताटातुटीच्या विरहक्षणी, ती अस्से सुनीत आळवीत, जीवनाचा, आगगाडीतील, डोंगरदरीच्या, खेड्यांचा, प्रियकराच्या खोगिरात अडकलेल्या काट्याचा, खरेच अस्सा अस्साच निरोप घेतेय :*

*I love paradox and so I send*
*white, yorkshire roses carved in sombre jet.*
*There summer frailty fixed here without end*
*A life in death it is not funeral yet...*

*निर्मितीच्या प्राचीन सभ्यतेच्या जवळ, जीवनाच्या पुनर्निर्माणाची कुठलीही नैतिक संहिता मांडून ठेवलेली नसते. त्यामुळे कलावंत प्रथम सर्वार्थाने ननैतिक होतो. And from this point he raises all his ethical cries to the sky. भीमक राजय्या भिल्लाने, प्रतारणा केलेल्या आपल्या साजणीला अमृताने जगविले नाही आणि विषाने मारले नाही. तो तिला मोहफुलांची दारू नेमाने पाजत राहिला. त्याची ही भिल्लीण स्वामिनी, आपल्या शरीरदानाचे हे रहस्य, आपल्या भिल्ल स्वामीला माहीतच नाही, या अज्ञात गुपिताला, मोहफुलांचा शृंगार चढवित राहिली.*

*साऊलच्या संदेशवाहिनीवर माझ्या ऋतु परिवर्तनाची चवकशी करणारा संदेश येऊन उतरला आहे.*

*उत्तर म्हणून मी काय काय धाडले, एवढेच मला आत्ता खाली नमूद करता येईल-*

*I had always seen my horses roaming at the top of their speed, only through my vision, but none of them ever stopped at the stonebound blind, an old nymph who was trying silently to die in the lyrical conception of marble granite....*

*साऊलच्या सुनसान आत्मपरीक्षणाची ही नवी नांदी तर नसेल ना?*

❖❖❖

# गोंदणगावातील मंत्रधून

*सूर्य सकाळचा असो, मध्यान्हीचा असो की संध्याकाळचा असो, गोंदणगावातला त्याचा हा त्रिविध प्रवास मी कित्येक वर्षे पाहत राहतो तरी मला त्यामागील स्वप्नसरावाच्या लयतत्त्वाचा थोडासाही मागमूस लागला नाही. म्हणजे असे की, हे गोंदणगाव अर्धवर्तुळाकार पहाडीने व्यापलेले. ही अर्धवर्तुळाकार पहाडी, दाट झाडांची आणि तितक्याच दाट झुडपांची. फक्त उजव्या वर्तुळ छेदाला पाण्याचा प्रवाह निनादवत होता. एखाद्या जुनाट घराला फक्त समोरचेच दार असावे असा काहीसा गोंदणगावचा दर्शनी देखावा होता. झाडी, पाण्याचा प्रवाह, आणि अर्धवर्तुळाकृती पहाडी, यामुळे सूर्याची विविध दर्शनेही काहीशी स्वप्न तुटलेल्या दरीतील छाया-प्रकाशांच्या मंथर खेळासारखी वाटायची. त्यात हेलकावणाऱ्या मनाला सोबत आणि दिलासा जो होता तो फक्त प्रवाह पाण्याच्या नादवलयांचा. मंथरा आणि राधा याच गोंदणगावच्या, दोन नेकीच्या सुदृढ, काळ्या शिसवी रूपाच्या गोंदणप्रौढा होत्या.*

*हा गोंदणगाव त्याच जातीजमातीच्या लोकांचा होता आणि अनेक वर्षांच्या परंपरेने या अर्धवर्तुळाकृती पहाडीत पाचपन्नास चिमुकल्या घरांचा ऐवज कर्मफलाची अधिसत्ता सांभाळून जगत होता. त्या त्या वेळी मला प्रश्न पडे तो या गावाच्या नावातील लयपूर्ण फिरकीचा. हे अपूर्व दुःखभेदी आणि लडिवाळ नाव कुठून वाटचाल करीत आले असेल?*

*थोडा शोध घेतल्यावर अगदी मागे जाऊन या गावाच्या इतिहासपत्रिकेत काही नोंदी तोंडीतोंडीच गोंदण प्रौढांच्या वृद्ध नवऱ्यांकडून मला मिळाल्यात. गोधूली, गोधनी, गोंदणी, गोठणी, असा प्रवास करीत या नावाचे गोंदणगाव हे रूपांतर स्थिर झाले असावे. गोंदणप्रौढांचे नवरे विशिष्ट वनस्पती शोधून त्यांचे काढे आणि रस काढीत. त्याबरोबरच झाडी-पहाडीतील भिलाव्यांचे-बिब्यांचे ढीग मंथरा-राधा या नेतृत्वसंपन्न गोंदणप्रौढांच्या पुढे आणून ठेवीत. सौम्य विषांच्या रसात अमावास्येच्या*

*रात्री भिजवून ठेवलेल्या सुया भिलाव्याच्या हृदयात खुपसण्यासाठी राधा आणि मंथरा सदैव सज्ज ठेवीत.*

*संध्याकाळचा मलूल सूर्य प्रवाहपाण्यावर रंगीत वर्तुळ रेखाटण्या अगोदरच सुमित्रा लगबग घाईने पायवाट तुडवीत गोंदणगावच्या वेशीवर यायची. मावळत्या सूर्याचा एखादा भरजरी किरण चुकून तिच्या डोळ्यांत उतरायचा, तेव्हा सुमित्रेच्या डोळ्यांतील जुनीच जुनी प्रतिबिंबांची माळ तुटून सैरभैर झाल्याचा भास व्हायचा. तिच्या गोऱ्यापान केशरकातडीवर एक तगमगती ओल मावळत्या सूर्यकिरणांत चमकून जायची आणि तिच्या सडपातळ हाताबोटांवर हिरवे कंच उगवलेले नसांचे (शिरांचे) गोंदण जणू काही राधा-मंथरेला हाकेच्या शिवाय खुणावते आहे असे भासायचे. बाजूला एक छोटासा पार. खडबडीत दगडांचा. आणि त्याच्या बाजूला जुनाट, वृद्ध पिंपळ.*

*पारावर गोंदणप्रौढांच्या नवऱ्यांनी झाडीत धुंडाळून आणलेली वनस्पती आणि भिलाव्यांचे ढीग हे सुमित्रेसाठी जसे विश्रांतिस्थळ होते, तसाच तो गोंदणगावच्या अंतःपुरातील प्रवेशही होता. एव्हाना अंधार मुळूमुळू रडत येतोय असा भास व्हायचा. आणि घरून निघालेले तिचे पाऊल, गोंदणगावातील प्रवेशांची, वाटांची, आणि सुमित्रेच्या पावलांची, स्वप्नातील सामग्रीप्रमाणे, सरमिसळ होऊन जायची. आणि या चिमुकल्या हृदयभंगात कोण, कुठले, कुठला गाव, कुठली राधा, कुठली मंथरा, कसले भिलाव्यांचे ढीग आणि सौम्य विषांत निवांत निजलेल्या सुयांच्या चांदणरेखा.....?*

*सुमित्रा आपल्या तुडुंब डोळ्यांनी शेवटचा आधार म्हणून खिन्नपणे वृद्ध पिंपळाकडे बघत राहायची.*

*बूढा पीपल घाट का बतियाए दिनरात*
*जो भी गुजरे पाससे, सरपर रख दे हाथ*
*घर को खोजे रातदिन घर से निकले पाँव*
*वो रास्ताही खो गया जिस रास्ते था गाँव....*

*सुमित्रेच्या हृदयात शिरलेल्या या पिंपळसंदेशाने तिच्या गोऱ्या हातावरील निळ्या नसा (शिरा) गोंदणसुयांप्रमाणे विद्धेषाने चित्कारून उठायच्या, कारण मंथरा आणि राधा यांनी सुरू केलेली गोंदण टिंबांची*

(शा.म.मु.) एन-२७५--९ (११००--१-२०२४)

*धून तिच्या कानी यायची. सुई, तिची मंत्रधून, माझ्या देहकातडीच्या शिवाय, राधामंथरेनी सुरूच कशी केली? त्या दोघींच्या काळ्या शिसवी गळ्यांमध्ये आपली अणकुचीदार नखांची बोटे कचकचून रुतवावीत असे तिला वाटले. इतकी दीर्घ रुतवावीत की गळा कुस्करून, कुस्करून त्याची भुकटीच होईल. म्हणजे गोंदण क्रियेची मंत्रधून गळ्यातून उमलणारच नाही. गोंदणाची टोचणी आणि गोंदणमंत्राची धून यांवर केवळ आपल्या गोऱ्या कातडीचा पहिला आणि शेवटचा निसर्गदत्त अधिकार आहे, अशी सुमित्रेची बलवान जीवनेच्छा होती. सुमित्रेच्या विद्वेषी पावलांचा वेग वाढला.*

*या गोंदणखेळात आपल्याशिवाय दुसरे कुणीही असू नये. पहिल्या स्वप्नाच्या रुजवणीनंतर दुसरे स्वप्न गोंदणगावात रुजायलाच नको. आपणच पहिले आणि शेवटचे राहायला हवे. शरीर आत्म्याच्या जिवलग मिठीप्रमाणे, स्वप्नभंगाचे आणि स्वप्नडंखाचे, कुठल्याही सूक्ष्मातिसूक्ष्म आकाराचे अंतर सुमित्रेला नको होते. पौर्णिमा-अमावस्येचे प्रमाद-प्रहर जुळवून सुमित्रा राधामंथरेच्या समोर विशिष्ट देहांच्या जागा गोंदवून घ्यायची. तिच्या पश्चात राधामंथरेनी गोंदविलेली शरीरे सुमित्रेच्या अदमासात कशी बरे उगवणार? या तालात, नादात सुमित्रेची पावले झरझर पडू लागली. आणि राधामंथरेच्या गोंदणगीताचे सूर तिच्या कानांत घुसू लागले.*

*रंग उधाणाच्या सरी*
*बाई! घरंदाज पोरी;*
*केशरांच्या कातडीत*
*सुई झाली गोरीमोरी...*
*गंगाप्रवाहांचे नीळ*
*त्यांच्या डोळ्यांत काजळ;*
*तरी टोचणीची सुई*
*होइ दुःखाने व्याकूळ....*

*आज कित्येक वर्षांनी, अशी माझ्या बालपणाची उलथापालथ होते आणि केशव नेमका त्याचवेळी म्हणतोय की, बघा! हिवाळा शेवटी पानगळीच्या वैभवाने स्थिर झालाच ना!*

*Suddenly I felt a chill in my brain and I*
*Shivered from inside and felt like crying.*

*पण माझ्या गळ्यातून आवंढा निघत नव्हता आणि तोंडातून शब्द बाहेर फुटत नव्हता. मी कोणत्या आकांतविभोर पाचोळ्याच्या राशीतून हा संध्याभीतीचा प्रवेश पाहतो आहे, असा भास झाला.*

*हे भय नेहमीच्या सरावाचे नव्हते. याची जातकुळी - Is it reminding me of my basic position? My basic position is to retain my embryo pattern....*

*आत्ता मला साऊलचे पहिल्या स्वप्नाच्या पायाभरणीसाठी गोंदविलेले हात आणि नादावलेली तिची विषण्ण पावले दिसू लागलीत.*

*जर एखादा क्षण अकस्मात परिपूर्ण होऊन तुमच्यासमोर आला तर? साक्षात्कारासारखा? तर त्याला परिपूर्ण क्षणाचेच उत्तर द्यायला नको का? परिपूर्ण क्षणाचे उत्तर म्हणजे साऊलने रचलेल्या तिच्या जातिवंत, जिवंत पहिल्या स्वप्नाची जपणूक करणे. इथे दीर्घ, प्रदीर्घ युगांची भाषा कशी बरे वापरता येईल? कदाचित असे परिपूर्ण क्षण सांधूनच युगांची सृजनभाषा निर्माण होत असली पाहिजे!*

*केशवने हिवाळा स्थापित झाल्याची राजमुद्रा अग्नीतून भाजून काढलेल्या नाण्याप्रमाणे माझ्या तळहातावर जपून धरली.... तरीच आत्ताशा माझ्या फोडणीत मोहरी, साध्या मंदजाळ आचेनेही तडफडून तडकते. तिच्यात परतून काढलेला भाताचा सुजाण घासही माझ्या गळ्यात अडकून पडतो...*

*आत्ता तर संध्याकाळ खरोखरच सद्गदित होऊन आली आहे. भय वाटते की, गोंदणगावच्या वृद्ध पिंपळाकडून हिवाळ्याचा एखादा जुनाट संदेश घेऊन गोंदणप्रौढांचे नवरे माझ्या दिशेने तर येत नाहीत ना? सृजनभाषा गवसली तर तेवढ्याने खरोखरच सृजनाचा ठाव घेता येतो? मग गोंदण सुऱ्यांच्या टिंब टिंब रक्तथेंबी जखमांच्यासाठी चटावलेल्या या देहाचे करायचे तरी काय?*

*कपाळावर चंद्रकोर, पाठीवर मोरपिसारा, स्तनांच्या पोकळीमध्ये स्वस्तिक आणि मस्तकाच्या ललाटबिंदूवर बहिरीससाण्याच्या मादीची खूण, ही राधामंथरेच्या गोंदणांची चित्रे. रंग एकच हिरवा, तेजस्वी, कंच.*

*हळदुलांना पाऊल ठेवायला सुईच्या टिंबाएवढीही जागा नाही. कारण देहच केशरगौर. फक्त गोंदणाकृतीचे तसूभरही विघटन होऊ नये म्हणून औषधोपचारासाठी हळदशेकणीची फुंकर.*

*कुठलाही सृजनगंध लाभलेला अनुभव पाठीचा नसतो आणि पोटाचा नसतो. तो मुळात निरंगी आणि निराकार असतो. त्याला एखाद्या झाडाला फांद्या फुटाव्यात, सजीव गर्भाला अवयव फुटावेत, त्याप्रमाणे त्या अनुभवाचे चित्र, कृती आणि आकारबंधामध्ये रूपांतर होत जाते आणि हा निरंगी अनुभव स्वतःच आकाराचा निराकार स्वामी आहे, असा भास होऊ लागतो.*

*सुमित्रेची आठवण इथे होते ती अशासाठी की, ती गोंदणतंत्राचे आणि गोंदणमंत्राचे तसूभरही विघटन होऊ देत नाही. ते झाले असे वाटते न वाटते तोच, तिच्या सर्व देहकळांचे सुईभिजणीच्या तीव्र विषांमध्ये रूपांतर होते. साऊलच्या पहिल्या स्वप्नाचा स्वीकार राधामंथरेच्या गोंदणमंत्राने करता येईल का? की त्यांच्या गोंदणगावातील मंत्रधून आपुलिया गळी गोंदवून करता येईल काय? साऊलच्या पायाभरणीच्या स्वप्नात, माझ्या असण्याचा बेमालूम साक्षात्कार तिला झाल्यासारखा वाटतो. माणसाच्या पहिल्या देहगोंदणात तिच्या स्वप्ननायकाने तिला दिलेला सृजनाचा विश्वात्मक दिलासा माझ्या साक्षात्कारात कसा बरे उगवणार? कारण ते गोंदण स्वप्ननायकाच्या स्वप्नांची निरंकुशता सिद्ध करण्यासाठी, आपल्या देहाला दिलेला आत्मविलेपनाचा दैवी दिलासा होता. तो आहे किंवा नाही हा स्वप्नमयूरनृत्याचा अलौकिक विभ्रम हेच तिच्या स्वप्नशीलाचे अंतिम चरित्र आहे. पण हे चरित्र तडकले आहे, अशा सौमित्रीय भ्रमाने उसळलेला विद्वेष, माझ्या साक्षात्कारी संधिप्रकाशात साऊल तपासून तर पाहत नाही ना?*

*कुणास ठाऊक! खरे तर असे आहे की, देशांतराचा पक्षी कमी तडफडतो कारण हजारो मैलांचे अंतर त्याला पादाक्रांत करायचे असते. आपल्या मूळ स्वप्नभूमीच्या कुशीत पहुडण्यासाठी तडफडण्यातच जर देशांतराच्या पक्ष्याने आपले संपूर्ण बळ लुळेपांगळे करून घेतले, तर मूळ स्वप्नभूमीच्या रस्त्यात कोणत्या पंखांच्या बळावर तो उडत जाणार?*

*श्रावणात पाऊस आणि ढग, भ्रमाविभ्रमांचे खेळ खेळत असतात,*

*तशी काहीशी माझी अवस्था झाली. साऊलचा ओंजळीत घेतलेला चेहेरा, तिची सुईगोठणीची वीण उसवितो की काय असा भास होऊ लागला. साऊलचे नक्षत्ररमल जर असे, तर तिने आपल्या मुक्तीचा मार्ग शोधून ठेवलेला दिसतो. पण माझे काय? श्रावणातील रंगबदलत्या ढगांसारखे? Can there be any alternative to this situation?*

*साऊल might suggest the cloud of August, but cloud of August is whimsical. Again she might suggest a rainbow! But my dear Keshav! Rainbow is not whimsical.*

*Rainbow is lyrical!*
*गोऱ्या कातडीत जेव्हा*
*रुते गोंदणाची सुई;*
*कळवळून ओरडे*
*तिच्या अंगाईत आई!*
*तिला कळेना गोंदण*
*भरकटली भरारा;*
*आता तिच्या दारी आला*
*नव्या गोंदणाचा वारा.....*

❖❖❖

# स्मरणशाळेतील विस्मरणाच्या भयाचे दान

*महर्षी व्यासांपासून श्रीज्ञानेश्वरांपर्यंत, श्रीज्ञानेश्वरांपासून तर महाकवी रिल्केपर्यंत, रिल्केपासून तर मर्ढेकरांपर्यंत सर्वच प्रतिभावंतांनी आपापले विश्वार्त आपआपल्या कळवळ्याने कृतार्थ, सार्थ, अमर करण्याचा प्रयत्न केला. पण या कळवळ्याच्या विश्वार्त रीतीतून शरीराच्या जडणघडणीला निरंतर लागणारी बेलगाम वाळवीची कुळे, त्यांना शोधता आलीच नाहीत. मरणाच्या अटळ कैवाराने या वाळवी कुळांचा शोध घेणे निराळे, आणि शरीराची शारीर बांधणी, शरीराच्या आतील भावमत्त मयूराच्या संगनमताने चाचपडून, चाचपडून, आषाढ धर्माप्रमाणे तिला नखशिखांत देखणीच ठेवत जाणे, तशीच ती राखत जाणे, या मोहाचे उद्दीपन कुठल्याही कलावंताला सांभाळता आलेले नाही. याचे सर्व धीरगंभीर श्रेय, आपण मृत्यूला देऊन मोकळे होऊ शकतो. खरे तर मृत्युची सार्वभौम अटळता लक्षात घेतल्यावर असे श्रेय मृत्युला देणारे आपण कोण? असाही एक चिमुकला प्रश्न आपल्या कवटीचे कोरीव काम करतच राहतो. याला माझी तथाकथित निर्मितिव्यवस्था आणि केशवचे उद्यानमंत्रही अपवाद नाहीत.*

*समजा माझ्या कवितेचा एखादा चरण अतीव साहसाने केशवने, अडगळीतील प्रेयसीचे पत्र अलगदपणे, कोऱ्या, हळुवार हाताने उलगडून पाहावे, त्याप्रमाणे माझ्याचसमोर असाच धरला तर...*

*उद्यान भंगातल्याही फुलांनी*
*जरी तारका अंगणी पेरल्या;*
*गर्भाशयातून ज्या हाक देती*
*तश्याच्या तश्या दे मला बाहुल्या...*

*पश्चात्तापाच्या कळवळ्याने पुनीत होऊन केशव, त्याच्या बेमालूम वृक्षहत्येच्या पापाची नजर माझ्याच कवितेच्या चरणाने सजवू पाहतोय. पण केशवने, माझ्या कवटीच्या प्रार्थनेतील पहिला चरण उचललाय कुठे? गर्भाशयातून हाक देणाऱ्या जश्याच्या तश्या बाहुल्यांची पेरणी*

*त्याला, या आत्ताच्या वसंतोत्सवात आपल्या उद्यानशाळेत करावयाची आहे! (केशवने, येणाऱ्या प्रत्येक वसंतोत्सवासाठी अशा तरुलतांच्या थेट गर्भाशयातून येणाऱ्या, बीज बाहुल्यांची कितीही रोवणी, पेरणी केली तरीही वृक्षहत्येच्या पापापासून तिळभर तरी मुक्ती त्याला मिळणार आहे का?) एका वृक्षाच्या हत्येला नव्या सृजन बाहुलीच्या पेरणीने जर शह देता आला असता तर, All the greatest ethical cries would have died long back within a fraction of moment.*

*दीप जळतो, हे तर धादांत सत्य आहे. त्याला तेलाचा स्नेह लागतो. हेही सत्यच आहे. आणि तळहातावर नेकीने वळलेली रुईची वात, हा दिव्याचा ज्वलंतमंत्र आहे. पणतीच्या या चिमुकल्या भातुकलीत एखादा किडा, एखादे रेशमी पैलूचे उड्डाण पाखरू त्या ज्योतीवर झेपावले की त्याची झेपावण्याची तऱ्हा ती जळती ज्योत इवलीशीही घायाळ न करत, त्याची मोक्षराख भिरकावून देते...*

*आणि मग या जळणाऱ्या दीपिकेचे, सर्व कवी, कलावंत युगानुयुगे, आळवून आळवून मंथन करीत जातात. पण या दीपिकेने आपल्या नेत्रकटाक्षाने उडविलेली, त्या यःकश्चित किड्याची चिमूटभर राख, जर स्वतःच तडफडता स्वयंभू आकार धारण करून तिच्या प्रकाशाच्या दूरच्या कोपऱ्यात उभी राहून हे मोक्षराखेचे सूत्र गुणगुणू लागली तर...*

*गर्मिये शम्मा का अफसाना सुनाने वालो,*
*रक्ष देखा नहीं तुमने अभी परवानेका...*

*इथे केशवने, माझ्या कवितेतून गोळा केलेल्या तरुलतांच्या बीज बाहुल्यांसाठी, मी एक नवी संहिता त्याच्यापुढे ठेवीत आहे.*

*कवितेत अर्थांतरन्यास जेव्हा*
*प्रभूच्या दयेतूनही कोसळे;*
*या संहितेला नवे शील द्याया*
*पुन्हा धाड तू वाळवीची कुळे...*

*रेशीमकिड्याच्या राखेत, जळणाऱ्या दीपिकेला जर खरेच वाळवीचा सुगावा लागला तर तिच्या ज्वलनमंत्राचे मोक्षधाम तिच्या अवतीभवतीच्या परिसरातच तिच्या जिवाची माहेर पाठवणी करण्यासाठी सज्ज होऊन बसले होते, हा जगड्व्याळ निर्मिति- विश्वाचा शुभसंकेत तिला सापडणार*

*नाही का?*

*जगातील सगळ्या स्मरणशाळांची बांधणी, त्यांचे शिल्प आणि त्यांच्या आत तळमळणाऱ्या अनेक रहस्य सत्यांची जर आपण पाहणी काळजीपूर्वक केली तर असे दिसून येते की, स्मरणशाळेतील पोथीच्या अक्षरांच्या तसून तसूनमध्ये विस्मरणाचे एक कराल भय मोठ्या शिताफीने लपून बसले आहे.*

*स्मरण नेहमीच करुणासंपन्न आणि दयाघन असते. आणि हे स्मरण माणसाची, त्याच्या सुखदुःखाची कमान, लयबद्ध, अर्धवर्तुळाकृती, जोडसांधणीने नेहेमीच तोलून धरत असते. एवढेच नव्हे, तर चार प्रकाशाचे किरण आणि दहा पाऊसशिंपडणीचे थेंब यांच्या मायावी संगनमताने, या अर्धवर्तुळाकृती जोडबांधणीला, इंद्रधनुष्याचे सात रंग ती बहाल करीत असते. इथेच एक मयसभा, विस्मरणाच्या मदतीने हळूहळू अदृश्य सावल्यांचे अधांतर अधोरेखित करीत असते. आपल्या स्मरणशाळांना याचा दूरान्वयानेही सुगावा लागत नसतो. आणि मग हे स्मरणशाळेतील विस्मरणाचे अणुपरमाणू तुमच्यासमोर तुमच्या स्मरणशाळांना एका क्षणात उद्ध्वस्त करून टाकत असतात. माणूस तरीही एका कफल्लक लाचाराची दीक्षा ओरबाडीत म्हणतोच- Man is unpredictable than anything else on the earth. बांधलेले, उभारलेले इतिहासाचे, वर्तमानाचे सर्व कालखंड असे धडाधड आपल्या नजरेसमोर कोसळत जातात. पण तरीही हाच माणूस सृजनशीलतेचा जोगवा मागत स्मरणशाळेतील हेच छिनाल, तत्त्वहीन, विस्मरणाच्या भयाचे दान मिरवत, मिरवत जगत असतो.*

*साऊलने आपल्या स्वप्ननायकाकडे एक सुंदर इच्छा नोंदविली होती. अरे! तू माझ्या चित्रांना मूठमाती देऊन, त्या स्वस्तिकवाल्या आर्यांच्या देशी जातो आहेस, तर बाबा, माझे एक वेडेबागडे काम तू करशील काय? निरुत्तरित, त्याच्या भेदक डोळ्यांवर साऊलने आपल्या कामाची छोटीशी डहाळी थेट खोचूनच दिली.*

*काम साधे, हिटलरचे एखादे पेंटिंग, चित्र मिळाले, तर माझ्यासाठी घेऊन ये. साऊलने स्वप्ननायकाला, हिटलरची चित्रे आणायला का सांगितली, याचे कारण साऊलने तिच्या सौधावरील लंगड्या*

*पारव्याच्याप्रमाणे आपल्या पदरात, माझ्यापासून अजूनही दडवून ठेवले आहे. मीही जरी तिला प्रत्यक्ष विचारले नाही, तरी तिच्या इच्छेचा कोंभ माझ्या आतडीत उगवून गेलाच ना!*

*अग्निपूजक आर्यांनी आपल्या श्रेष्ठत्वाच्या बेगुमान वैभवासाठी ज्यू नावाच्या मानवीवंशाचा नायनाट करण्याचा प्रयत्न, हिटलरच्या नेतृत्वाने धारण केलेला. मग हे सृजनशीलतेचे बीज त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या कुठल्या निवांत कोपऱ्यात तग धरून बसले होते? साऊलच्या इच्छेच्या कोंभाचा माझ्या पिंडातून उगवलेला हा चौकशीचा, साधा पण पक्का, मजबूत कौल आहे. कदाचित आपल्या चित्राकडे स्वप्ननायकाने ढुंकूनही पाहिले नाही म्हणून विव्हळ झालेली, आत्मवैभवाच्या अहंकाराने बेगुमान झालेली, साऊल नावाची जखमी पक्षीण, कदाचित क्रूरकर्मा हिटलरच्या चित्रातून हत्याकांडाचा नवा मंत्र धुंडाळून, आपल्या स्वप्ननायकाचे भेदक डोळे बरबाद करण्यासाठी, स्वतःच वाळवीची कुलस्वामिनी तर होऊ पाहत नसेल ना? या जाणिवेने माझ्या हृदयात मला न पेलवणारे उत्पाताचे थरार कोसळू लागलेत.*

*कलाकाराचा सृजनमंत्र आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या स्वस्तिक बांधणीत सदैव वागविणारा हा हिटलर, आयुष्यभर ज्यूंचे शिरकाण करण्यासाठी कलाकाराचा अंतर्यामीचा पेहराव उतरून, अकस्मात रझाकाराचा रक्तरंजित झगा पेहरूच कसा शकतो, हा माझा सवाल आहे.*

*सृजनशीलतेच्या सौंदर्यविश्वाचा एक प्रतिनिधी म्हणून हा माझा फुटलेला हंबरडा आहे. जीवनातील सर्व भावांच्या आणि अभावांच्या जोड्या, जगताना-जीवनाला नेहमीच विनाशाच्या गर्तेत ढकलत असतात. त्यामुळे जीवन नेहमीच अपुरे, विनाशी असे विवर्ताचे जिणे जगत असते. फक्त कलावंतच आपल्या आत्माविष्काराच्या वेदीवर रोज तपासणी करीत असतो आणि यातूनच तो भावा-अभावांच्या जोखडाखाली गुदमरणाऱ्या जीवनाची सोडवणूक करून त्याच जीवनाची पुनर्निर्मिती करीत असतो, पुनर्निर्माण करीत असतो. यात त्याने भाव-अभावांच्या संगोपनासाठी वापरलेली सगळीच्या सगळी गृहीते, रद्द केलेली असतात. आणि म्हणून कलाकृतीत अवतरलेले जीवन हे पूर्णत्वाच्या काठाशी, एखादे गाव निवांतपणे निजले असावे तसे सौंदर्यसंपन्न दिसत असते.*

*सृजनात गृहीताला स्थानच नाही, तर हिटलर नावाचा पेंटर, कलाकार एका वंशाच्या तमाम हत्यांचे, निर्वंश करणारे क्रौर्य सांभाळू कसा शकतो? खरेच! वंशहत्येच्या या रणधुमाळीत, चित्रकार जगन्मित्र कुठेच झाकून ठेवलेला नाही. वंशाचा निर्वंश करण्याचे भीषण स्वप्न ज्यावेळी हिटलर साकार करू लागला तेव्हा या कलंदर मित्राने हिटलरच्या अविच्छिन्न, प्रभावी पिंडाचा त्याग केला.*

*मला तर केशवा, असेही वाटते की, हिटलर स्वतःच आपल्यातील चित्रकार, कलावंताच्या निर्विघ्न, करुणासंपन्नतेला आतून आतून पार भिऊन गेला असला पाहिजे. आधुनिक जगाला आकार देणाऱ्या त्या तीन ज्यूंचे चेहरे त्याला जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी भेदरवून, भेदरवून हैराण करीत असले पाहिजेत. आईन्स्टाइन कार्ल मार्क्स, आणि सिगमंड फ्रॉइड. ही फार देखणी माणसे नव्हती. पण त्यांचा आणि मानवतेचा विश्वार्त कळवळा, त्यांच्या देहाच्या रंध्रारंध्रांत सृजनशीलतेने असा काही गहिवरला होता की, त्यातून तमाम दुनियेच्या भविष्याची सौंदर्यसूचक चाहूल लागत होती. हे सृजनशीलतेचे सूचक आव्हान दिसताच गृहीतावर उभी केलेली हिटलरची प्रतिमा तात्काळ नष्ट झाली.*

*साऊलच्या स्वप्ननायकाने हिटलरची चित्रे आणलेली नाहीत. त्यामुळे साऊलचे संधान, अनुसंधान अकस्मात शिल्प झालेल्या मूर्तीप्रमाणे तिथेच उभे आहे.*

❖❖❖

# प्रकाशित साहित्य

| कवितासंग्रह/ललितलेख | वर्ष | प्रकाशन प्रकार |
|---|---|---|
| १) संध्याकाळच्या कविता | १९६७ | पॉप्युलर प्रकाशन |
| २) राजपुत्र आणि डार्लिंग | १९७४ | अमेय प्रकाशन |
| ३) चंद्रमाधवीच्या प्रदेशात | १९७७ | पॉप्युलर प्रकाशन |
| ४) सांध्यपर्वातील वैष्णवी | १९९५ | पॉप्युलर प्रकाशन |
| ५) सांजभयाच्या साजरी | २००६ | पॉप्युलर प्रकाशन |
| **ललित लेखन** | | |
| १) चर्चबेल | १९७४ | पॉप्युलर प्रकाशन |
| २) मितवा | १९८७ | पॉप्युलर प्रकाशन |
| ३) संध्यामग्न पुरुषाची लक्षणे | २००० | पॉप्युलर प्रकाशन |
| ४) मृगजळाचे बांधकाम | २००३ | पॉप्युलर प्रकाशन |
| ५) वाऱ्याने हलते रान | २००८ | पॉप्युलर प्रकाशन |
| ६) कावळे उडाले स्वामी | २०१० | पॉप्युलर प्रकाशन |
| ७) ओल्या वाळूची बासरी | २०१२ | पॉप्युलर प्रकाशन |
| ८) बाई! जोगिया पुरुष | २०१२ | पॉप्युलर प्रकाशन |

**अप्रकाशित** - लाटांचे देऊळ...

**इतर प्रकाशित साहित्य**

✦ संध्यासूक्तांचा यांत्रिक, फाऊंटन, मुंबई-२००४

✦ साजणवेळा, शब्दवेध, मुंबई १९९८.

✦ सांध्यपर्व, माधवी वैद्य, मुंबई.

✦ प्रसिद्ध संगीतकार हृदयनाथ मंगेशकरांनी कवी ग्रेस यांच्या अनेक कवितांना चाली देऊन त्याचे सुगम गाण्यांत रूपांतर केले आहे.

निवडुंग सिनेमा ''वाऱ्याने हलते रान'' - गीत.

महाश्वेता दूरदर्शन मालिका ''भय इथले संपत नाही.' - शीर्षकगीत.

**रंगमंचीय सादरीकरण-**

सुप्रसिद्ध संगीतकार हृदयनाथ मंगेशकर यांच्यासोबत काव्यगायन आणि विवेचन अशा द्विदल कार्यक्रमाचे सादरीकरण कवी ग्रेस यांनी २००८ मध्ये सुरू केले. याचा पहिला प्रयोग इचलकरंजी येथे झाला.

पूर्वीच्या अल्फा टीव्हीने मराठी - आताच्या झी मराठीनेदेखील ग्रेस कवीवर पूर्ण तीन तासांचा कार्यक्रम सादर केला.

**समीक्षात्मक लेखन**

✦ ग्रेस-अंबर फुलांचे दिवे - डॉ. चं. वि. जोशी

या ग्रंथाला मसापचा २०१७ सालचा पुरस्कार मिळाला.

✦ ग्रेस आणि दुर्बोधता - डॉ. जयंत परांजपे

✦ ग्रेसच्या कविता - धुक्यातून प्रकाशाकडे - श्रीनिवास हवालदार या ग्रंथाला मध्य प्रदेशातील मराठी साहित्य अकादमीच्या म. प्र. संस्कृती परिषद भोपाळ यांनी 'राजकवी भास्कर रामचंद्र तांबे' हा पुरस्कार दिला. (२०१८)

✦ ग्रेसच्या कविता - धुक्यातून प्रकाशाकडे (उत्तरार्ध) श्रीनिवास हवालदार (२०१६)

✦ दूरस्थ ग्रेस - कवी ग्रेस यांना न लिहिलेली पत्रे. श्रीनिवास हवालदार. (२०१८)

✦ धुके आणि शिल्प - त्र्यं. वि. सरदेशमुख (१९८५)

✦ ग्रेसविषयी - डॉ. अक्षरकुमार काळे (२००९)

✦ रचनेच्या खोल तळाशी - डॉ. नंदकुमार मुलमुले

**पुरस्कार व गौरव**

✦ गौरववृत्ती (फेलोशिप), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००५

✦ जी. ए. कुलकर्णी सन्मान पुरस्कार, पुणे, २०१०.

✦ जीवनव्रती पुरस्कार, विदर्भ साहित्य संघ, नागपूर, १९९७.

✦ दमाणी पुरस्कार, सोलापूर.

✦ नागभूषण पुरस्कार, नागपूर, २०१०.

✦ महाराष्ट्र शासन उत्कृष्ट वाङ्मयनिर्मिती पुरस्कार.

✦ मारवाडी संमेलन पुरस्कार, मुंबई.

- ✦ वाग्विलासिनी पुरस्कार, दीनानाथ मंगेशकर प्रतिष्ठान, पुणे.
- ✦ विदर्भ गौरव पुरस्कार, कृषी विकास प्रतिष्ठान, नागपूर.
- ✦ विदर्भ भूषण पुरस्कार, नागपूर २०११.
- ✦ सहकार महर्षी साहित्य पुरस्कार, सोलापूर.
- ✦ साहित्य अकादमी पुरस्कार, २०११.

**अधिक अभ्यासासाठी**


- ग्रेस यांचे काव्यशास्त्र - प्रा. वसंत आबाजी डहाके, 'उद्याचा मराठवाडा' दिवाळी अंक, २०१२.
- ग्रेस यांच्या कवितेविषयी थोडेसे - प्रा. म. सु. पाटील, 'परिवर्तनाचा वाटसरू' १६ ते ३१ मे २०१२.
- 'तू'ची अमूर्तता : संध्याकाळच्या कविता - डॉ. प्रभा गणोरकर, 'विशाखा' दिवाळी अंक २०१२.
- ग्रेसची कविता : कूळ आणि मूळ - प्रा. नारायण कुलकर्णी-कवठेकर, 'युगवाणी' जुलै/ऑगस्ट/सप्टेंबर २०१२.
- ग्रेस : चंद्रकुळातील पक्षी- प्रा. नारायण कुलकर्णी कवठेकर, 'उद्याचा मराठवाडा' दिवाळी अंक २०१२.
- ग्रेस यांची कविता - डॉ. बाळकृष्ण कवठेकर, वाङ्मयीन चर्चा आणि चिकित्सा, नवसाहित्य प्रकाशन, बेळगाव, पहिली आवृत्ती १९७८.
- फिनिशियन सौंदर्यदेवता इस्तरुख्त आणि ग्रेस यांच्या दिव्यात्म प्रेमदेवता - डॉ. मधुकर वाकोडे, 'युववाणी' एप्रिल/मे/जून २०११.
- आत्मशोध - 'राजपुत्र आणि डार्लिंग'चा - डॉ. चंद्रकांत पांढरीपांडे, 'विशाखा' दिवाळी अंक २०१२.
- ग्रेस यांची कविता - डॉ. रणधीर शिंदे, 'मुक्तशब्द' दिवाळी अंग २०११ मधील 'ग्रेस आणि महानोर रोमँटिक जाणिवेचे दोन आविष्कार' या लेखातील काही भाग.
- ग्रेस : कविता आणि काव्य - डॉ. माधवी देसाई, 'युगवाणी' जुलै/ऑगस्ट/सप्टेंबर २०१२.
- ग्रेसची प्रेमकविता : पापसंकल्पनेकडून सौंदर्यशिल्पाकडे - प्रा. देवानंद सोनटक्के, 'युगवाणी' जुलै/ऑगस्ट/सप्टेंबर २०१२.

■ दृश्यकला आणि ग्रेस यांची कविता - शशिकांत सावंत, 'युगवाणी' जुलै/ऑगस्ट/सप्टेंबर २०१२.
■ ग्रेस यांचे ललितबंध - डॉ. प्रभा गणोरकर, 'युगवाणी' जुलै/ऑगस्ट/सप्टेंबर २०१२.
■ ग्रेस यांचे ललितबंध : आठवणींचा लावण्यझुला - डॉ. सतीश बडवे, 'उद्याचा मराठवाडा' दिवाळी अंक २०१२.
■ सांध्यपर्वातील सृजनशोक - मनोहर सोनवणे, 'विशाखा', दिवाळी अंक २०१२.
■ मृगजळाचे बांधकाम : स्वरूप आणि सौंदर्य - डॉ. माधवी देसाई, 'विशाखा', दिवाळी अंक २०१२.
■ देवी - डॉ. मधुकर वाकोडे, 'तरुण भारत' दिवाळी अंक १९९७.
■ ग्रेसच्या दोन कवितांचे रसग्रहण - डॉ. निशिकांत मिरजकर, 'युगवाणी' जुलै/ऑगस्ट/सप्टेंबर २०१२.
■ गाव - डॉ. शिरीष गोपाळ देशपांडे, 'कवितारती' मार्च/एप्रिल २०१२.
■ आई - डॉ. मनोज तायडे, 'आस्वादनामा' स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जून २००२.
■ घात : एक छंदास्वाद - डॉ. शुभांगी पातुरकर, 'युगवाणी' जुलै/ऑगस्ट/सप्टेंबर २०१२.
■ इराणी संगीतीच्या प्रतिमा - प्रा. देवानंद सोनटक्के, 'सर्वधारा' जुलै/ऑगस्ट/सप्टेंबर २०१२.
■ यात्रेतील आदिमातेचा शोध - ग्रेस यांची शुभा गोखले यांनी घेतलेली मुलाखत, 'युगवाणी' जुलै/ऑगस्ट/सप्टेंबर २०१२.
■ रांगोळी टिंबांची कहाणी - ग्रेस यांची डॉ. नंदकुमार मुलमुले यांनी घेतलेली मुलाखत, 'युगवाणी' जुलै/ऑगस्ट/सप्टेंबर २०१२.

✶ ✶ ✶

## संदर्भ ग्रंथ

१) ग्रेस नावाचं गारूड, संपादन-प्रवीण बर्दापूरकर, विजय प्रकाशन
२) ग्रेस वेदना आणि वेदना, संपादन-अजय देशपांडे, विजय प्रकाशन
३) ग्रेस आणि दुर्बोधता - जयंत परांजपे, विजय प्रकाशन
४) ग्रेस यांची कविता... - परीक्षणे अनेक प्रश्न - वसंत पाटणकर

✶ ✶ ✶

## -: सौजन्य आणि आभार :-

१) पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
२) 'मितवा' ग्रेस (१९८७), पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

❖❖❖